



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय

▪ अमरावती, रविवार ३ मे २०२६ ▪ मूल्य ४.०० ▪ पृष्ठे १०+४





# बारावी परीक्षेचा निकाल जाहीर

## कोकण अव्वल तर लातूर पॅटर्न 'फेल'

**पुणे /प्रतिनिधी-**बारावी परीक्षेत यंदा देखील मुलींनी बाजी मारली आहे. कोकण विभाग पहिला तर लातूर पॅटर्न सर्वांत शेवटी गेला आहे. बारावीचा निकाल एकूण ८९.७९ टक्के लागला असून, कोकण विभाग अव्वल तर लातूर विभागाचा सर्वांत कमी निकाल लागला आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नउ विभागीय मंडळांमध्ये जी परीक्षा घेण्यात आली त्यात कोकण विभागाचा ९४.१४ टक्के, पुणे विभागाचा ९१.२५ टक्के, अमरावती विभागाचा ९०.९२ टक्के, नाशिक विभागाचा ९०.७२ टक्के, मुंबई विभागाचा ९०.०८ टक्के, कोल्हापूर विभागाचा ८९.९७ टक्के, छत्रपती संभाजीनगर विभागाचा ८८.८६ टक्के, नागपूर विभागाचा ८८.६७ टक्के आणि लातूर विभागाचा ८४.१४ टक्के निकाल लागला असून एकूण निकाल ८९.९७ टक्के एवढा लागला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ आज, शनिवार, २ मे २०२६ रोजी बारावी परीक्षेचा निकाल जाहीर केला. विद्यार्थी आपला निकाल मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर पाहू शकतील; तसेच, निकालाची लिंक सक्रिय होताच त्यांचे गुणपत्रक त्वरित उपलब्ध होईल.



**निकाल तपासण्यासाठी अधिकृत वेबसाइट्स : विद्यार्थ्यांना महाराष्ट्र HSC निकाल २०२६ खालील अधिकृत वेबसाइट्सवरून तपासता येईल.** ▪ https://mahahsscboard.in ▪ mahresult. nic. in ▪ https://results.digilocker.gov.in ▪ https://hscresult.mkcl.org ▪ https:// esults.targetpublications.org ▪ https:// results.navneet.com **याशिवाय, डिजीलाकर आणि एसएमएस सुविधेद्वारेही निकाल पाहता येणार आहे. डिजीलाकरनं आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून निकाल लवकरच जाहीर होणार असल्याचे संकेत दिले होते.**

गेल्या वर्षी हे निकाल ५ मे रोजी जाहीर करण्यात आले होते; मात्र या वर्षी, निकाल तीन दिवस आधीच प्रसिद्ध केला जातोय. विद्यार्थ्यांसाठी हा निकाल अत्यंत महत्त्वाचा आहे. लाखो विद्यार्थी गेल्या अनेक दिवसांपासून निकालाची आतुरतेने वाट पाहत होते. बोर्डाने सर्व तयारी पूर्ण करून, निकाल प्रक्रिया पारदर्शक आणि वेळेवर पूर्ण करण्यावर भर दिला आहे.

### अमरावती विभाग तिस-या स्थानी; 90.92 टक्के निकाल

# 90 टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणा-या विद्यार्थ्यांची संख्या घटली

**मुंबई/प्रतिनिधी-**राज्य मंडळाने जाहीर केलेला बारावीच्या निकालामध्ये उत्तीर्णांच्या प्रमाणात यंदा २ टक्क्यांनी घट झाली आहे. तसेच ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणा-या विद्यार्थ्यांची संख्याही घटली आहे. त्यामुळे यंदाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना चांगले महाविद्यालय मिळण्याची अपेक्षा वाढल्या आहेत. अनेक नामांकित महाविद्यालयांचे प्रवेश पात्रता गुण (कट ऑफ) कमी होण्याची शक्यता आहे. यंदा ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणा-या विद्यार्थ्यांची संख्या ७ हजार ५१० म्हणजेच ०.५ टक्के तर ४५ ते ६० टक्के गुण मिळविणा-या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे ४०.५८ टक्के आहे. त्यामुळे यंदा राज्यातील बहुतांश महाविद्यालयांना विद्यार्थी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यंदा राज्य शिक्षण मंडळाने बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च या दरम्यान घेतली होती. गेल्या वर्षीही याच सुमारास ही परीक्षा झाली होती. ५ मे रोजी निकाल जाहीर झाला होता.

यंदा राज्य शिक्षण मंडळाने २ मे रोजीच निकाल जाहीर केला आहे. यंदा बारावीच्या परीक्षेला राज्यभरातून १४ लाख ४४ हजार ७१३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यातील १४ लाख ३३ हजार ५८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यातील १२ लाख ८६ हजार ८४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीमध्ये मिळविणा-या विद्यार्थ्याचे प्रमाण ९.९६ टक्के इतके आहे. यामध्ये ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणा-या विद्यार्थ्यांची संख्या ७ हजार ५१० इतके आहे. ८५ ते ९० टक्के २३ हजार ९६४, ८० ते ८५ टक्के ४५ हजार २८६, ७५ ते ८० टक्के गुण मिळविणा-या विद्यार्थ्यांची संख्या ६७ हजार ४९१ इतकी आहे. यातील विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांचा कल व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे अधिक असतो.

▪ **यंदा राज्यभरात एकूण 15,32,487 विद्यार्थ्यांची नोंदणी**
▪ **विज्ञान शाखा: 7,99,773 विद्यार्थी**
▪ **कला शाखा: 3,80,692 विद्यार्थी**
▪ **वाणिज्य शाखा: 3,20,152 विद्यार्थी**

त्यामुळे यंदा महाविद्यालयांच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये कटऑफमध्ये घसरण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. वाणिज्य शाखेतील प्रवेशासाठी दरवर्षी अटीतटी असते. तेथेही स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याकडे कल वाढला आहे. मात्र यंदा वाणिज्य शाखेतीलही ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणा-या विद्यार्थ्यांचे प्रमाण घटल्यामुळे नामांकित महाविद्यालये, स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रमांनाचे कट ऑफ गुण साधारण दीड ते दोन टक्क्यांनी कमी होउ शकतील.

**पालकांचं पालकत्व : हवी सहअनुभूती!**

यंदा बारावीच्या निकालामध्ये दोन टक्क्यांनी घट झाली असली तरी, ६० ते ७५ टक्के गुण मिळविणारे विद्यार्थी ३ लाख ६२ हजार ३३ इतकी आहे. तर ४५ ते ६० टक्के गुण मिळविणा-या विद्यार्थ्यांची संख्या ५ लाख ८१ हजार ५१९ इतकी आहे. परिणामी यंदा महाविद्यालयांमधील कटऑफ खाली घसरण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# धामणगाव येथे भीषण आग

## निम्म्या गावाची राखरांगोळी, अनेक जनावरांचा मृत्यू

**नागपूर/प्रतिनिधी-** जिल्ह्यातील भिवापूर तालुक्यातील धामणगाव विद्यामंदिर येथे भीषण आगीत निम्म्या गावाची राखरांगोळी झाली. या आगीत शेतक-यांच्या गोठ्याला बांधलेली जनावरे दगावली असून अनेकांची घरे जळाल्याने संसार उद्ध्वस्त झाले. त्यामुळे शेतक-यांचे मोठे नुकसान झाले असून जिल्ह्यातून सर्वच भागातून अग्निशमन बंब पोहोचले असून आगीवर नियंत्रणाचे प्रयत्न सुरू आहे.



धामणगाव विद्यामंदिर या गावाला लागूनच शेती आहे. शेतीमध्ये एका व्यक्तिने पालापाचोळा जाळला. सायंकाळी आलेल्या सोसाट्याच्या वा-याने जळालेला पालापाचोळा गावापर्यंत पोहोचला. उन्हाळा असल्याने अनेकांनी घरासमोर लाकडे जमा गोळा केली होती. त्यामुळे आगीने वेग घेतला. बघता बघता निम्म्या गावातील मातीची व कवेलू घरांना आगीने कवेत घेतले. घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार अचानक लागलेल्या आगीने काही वेळातच भीषण रूप धारण केले व वा-याच्या वेगामुळे आग झपाट्याने संपूर्ण गावात पसरली अनेक कुटुंबांना आपले संसार वाचवण्यास वेळच मिळाला नाही. घरातील धान्य, कपडे व इतर जीवनावश्यक साहित्याची जळून राखरांगोळी झाली.या आगीत गायी, बैल, शेळ्या आदी जनावरेही मोठ्या प्रमाणात मृत्यूमुखी पडल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे शेती व्यवसायावर अवलंबून असलेल्या नागरिकांचे आर्थिक नुकसान प्रचंड झाले आहे. अनेक कुटुंबे अक्षरशः उघड्यावर आली असून त्यांच्यासमोर निवारा व अन्नाचा प्रश्न निर्माण झाला आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन व अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते. ग्रामस्थांनीही स्वतःच्या परीने आग विझवण्याचा प्रयत्न केला. दरम्यान या घटनेमुळे संपूर्ण गाव हादरले असून तातडीने पंचनामा करून बाधित कुटुंबांना आर्थिक मदत देण्याची मागणी केली जात आहे.

# ऊपवर्गीकरणाचा निर्णय न्यायालयाच्या दिशानिर्देशानुसारच होणार

**नागपूर/प्रतिनिधी-** राज्य शासनाने अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. काहींकडून याचे समर्थन होत असून काहींकडून याचा विरोध होत आहे. समर्थक व विरोधकांकडून आंदोलनेही करण्यात येत आहे. हे उपवर्गीकरण संवैधानिक नसल्याचाही आरोप होत आहे. तर न्या. अनंत बदर समितीचा अहवाल प्रसिद्ध न करताच सूचना व आक्षेप मागवण्यात येत असल्यानेही टीका होत आहे.उपवर्गीकरण कोणत्या प्रकारे करण्यात आले, अ,ब,क,ड मध्ये कोणत्या जातीचा समावेश करण्यात आला असून कोणत्या गटाला किती आरक्षण देण्यात आले, अशी विचारणाही होत आहे. दरम्यान बदर समितीच्या अहवालावर सूचना व आक्षेप घेण्यासाठी देण्यात आलेली मुदत ३० एप्रिलला संपली. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली आहे.

नागपुरात त्यांनी आज विविध शासकीय बांधकामांना भेटी देउन पाहणी केली. यावेळी पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले, अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण हे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार होत आहे. सरकारने यावर न्या. बदर समिती नियुक्त केली होती. या समितीचा अहवाल सादर झाला आहे. काहींनी यावर सूचना व हरकत घेण्याची भाषा केली. त्यामुळे त्यावर सूचना व आक्षेप मागवण्यात आले आहे. ते सर्व ऐकूण घेण्यात येणार आहे. या उपवर्गीकरणासंदर्भात काही दिशानिर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहे. त्यादिशानिर्देशानुसारच निर्णय होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.



**शिवसेनत बोलण्याचा अधिकार फक्तशिंदेंना-** पुढील निवडणुका भाजप, शिवसेना वेगवेगळ्या लढतील, असे वक्तव्य शिवसेनेच्या मंत्र्यांकडून देण्यात येत आहे. त्यावर फडणवीस म्हणाले की, शिवसनेत बोलण्याचा अधिकार फक्त एकनाथ शिंदेंना आहे. त्यांनी वक्तव्य केल्यावरच माल विचारा, नाही तर प्रवक्त्यांना विचारा, असे ते म्हणाले.

**कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांची किव करावीशी वाटते**

अनेक निवडणुकांमध्ये कॉंग्रेसला माघार घ्यावी लागली, यावर बोलतना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कॉंग्रेस पक्षाची महाराष्ट्रातील परिस्थिती ही अतिशय नाजूक आहे. तो त्यांचा पक्ष आहे. त्यासंदर्भात त्यांनीच कारवाई करावी. पण एक बाहेरचा व्यक्ती म्हणून मी पाहतो, त्यावेळी इतक्या जुन्या पक्षाची अवस्था पाहूण निश्चितपणे त्यांच्या कार्यकर्त्यांची किव करावी, अशीच परिस्थिती असल्याचे ते म्हणाले.

**शासकीय कामात त्रुटी-**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, क्रीडा संकुलाच्या कामांची पाहणी केली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, काम चागंले होत आहे. परंतु कामात काही त्रुटी आहेत. त्या अधिका-यांच्या निर्देशनास आणून देण्यात आल्या. त्या त्रुटी पूर्ण करून रुग्णांना दर्जेदार चिकित्सा मिळाली पाहिजे. महाविद्यालयाचे बांधकाम चांगलेच झाले पाहिजे, असा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

**सरकारी रुग्णालयात चांगले डॉक्टर**

महात्मा फुले जनआरोग्य योजना शासकीय रुग्णालयातही सुरू करण्यात आली आहे. यावर फडणवीस म्हणाले की, आम्ही अतिशय उचित निर्णय घेतला की महात्मा फुले योजना हे आमच्या सरकारी रुग्णालयांनाही लागू केली. कारण सरकारी रुग्णालयात चांगले डॉक्टर्स आणि व्यवस्था आहे. हे लागू केल्यामुळे त्यांनाही दोन पैसे मिळतात. त्यातील काही पैशांचा खर्चासाठी वापर होतो. खासगी लोकांच्या भरोशावर योजना चालवणे योग्य नाही, असे ही ते म्हणाले.

# लाचखोर महिला अधिकारी अटकेत

**पुणे :** शहर पोलिस दलात अत्यंत खळबळजनक घटना समोर आली आहे. पुणे पोलिस आयुक्तालयात एका महिला पोलिस अधिका-याला २८ लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. वैशाली तोटेवार असे या महिला सहाय्यक पोलिस निरीक्षकाचे नाव असून, त्या पुणे आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत होत्या. थेट पोलिस आयुक्तालयाच्या परिसरात ही कारवाई झाल्याने पोलिस दलात एकच खळबळ उडाली आहे. वैशाली तोटेवार यांची नुकतीच लोहमार्ग (रेल्वे) पोलिस मुंबई येथे बदली झाली होती. इतकेच नव्हे तर त्यांना पुणे शहर पोलिस दलातून कार्यमुक्त देखील करण्यात आले होते. मात्र, बदली होउनही आणि पदभार सोडलेला असतानाही त्यांनी २८ लाखांची मोठी रक्कम स्वीकारण्याचे धाडस केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.आर्थिक गुन्हे शाखेच्या एका प्रकरणाच्या तपासा दरम्यान एकूण ३० लाख रुपयांची मागणी झाली होती. त्यापैकी २ लाख रुपये आधी स्वीकारण्यात आले होते.

# राज्यात ऊष्णतेच्या लाटेचे संकट

## अनेक भागात ऊष्णतेचा अलर्ट जारी

**मुंबई / प्रतिनिधी-** मुंबईसह राज्यभरातील तापमानात सातत्याने बदल होत आहेत. गेल्या काही दिवसांपासून तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे राहिले आहे. अशात आता भारतीय हवामान विभागाने मोठा इशारा देत राज्यात उष्णतेचा अलर्ट जारी केला आहे. तसेच, मुंबईसह कोकण, मराठवाडा आणि



विदर्भात आजपासून उन्हाच्या झळा अधिक तीव्र असल्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यामध्येच काही भागात पावसाचाही अंदाज वर्तवण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ५ मे पर्यंत मुंबईत उष्णतेचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्यातील जवळपास जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे नोंदवले गेले. आज उष्णतेत वाढ होण्याचा अंदाज आहे. या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून नागरिकांना काही सूचना जारी करण्यात आल्या आहेत. कधी उष्णता तर कधी पाउस यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. यासोबतच गेल्या काही दिवसांपासून उष्माघाताच्या रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ होत आहे. मुंबईसह कोकणात उष्ण आणि दमट हवामान कायम आहे. हवेतील आर्द्रता ७०-८० टक्क्यांवर राहील. कमाल तापमान ३३-३७ अंशांच्या दरम्यान राहील, असाही अंदाज वर्तवला आहे. मध्य महाराष्ट्रातील पुण्यासह सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापुरात उष्णतेचा पारा चढलेला आहे.

# 54 लाख महिला यादीतून बाहेर

## ई-केवायसीनंतर लाडक्या बहिणींना मोठा धक्का! ; 1500चा लाभ कायमचा बंद

**मुंबई/प्रतिनिधी-** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना ई-केवायसी करणे बंधनकारक केले होते. मात्र, काही लाभार्थ्यांनी ई-केवायसी करताना चुकीचा पर्याय निवडला होता. त्यानंतर या लाभार्थ्यांना दुरुस्तीसाठी मुदत देण्यात आली. या ई-केवायसी दुरुस्तीला ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ सुद्धा देण्यात आली. म्हणजेच ज्या महिलांना ई-केवायसी करायची आहे त्यांनी ३० एप्रिलपर्यंत दुरुस्ती करणे अनिवार्य होते. आता ही मुदत संपली असून एक मोठी माहिती समोर आली आहे.

माध्यमांमध्ये आलेल्या वृत्तानुसार, ई-केवायसी दुरुस्ती करण्याची मुदत संपल्यानंतर आता १ कोटी ८९ लाख महिला या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरल्या आहेत. मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत ६८ लाख महिलांनी आपली ई-केवायसी दुरुस्ती केली नव्हती. तर आता एप्रिलमध्ये १४ लाख लाभार्थी महिलांनी ई-केवायसीमध्ये दुरुस्ती केली आहे. या महिलांनी आधी चुकून सरकारी कर्मचारी आहोत असे नोंदवले होते. पण आता त्यांनी दुरुस्ती केल्याने त्या योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत. म्हणजेच ५४ लाख महिलांनी दुरुस्ती न केल्याने त्या अपात्र ठरल्या आहेत. मात्र, सरकारकडून अद्याप अधिकृत आकडेवारी जाहीर



करण्यात आलेली नाही.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी नव्याने नोंदणी प्रक्रिया बंद करण्यात आलेली आहे. मात्र, ई-केवायसी करताना काही त्रुटी राहिल्यास त्या दुरुस्त करण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता ही मुदत संपली असून ज्या महिलांनी ई-केवायसीच केली नाही किंवा ई-केवायसीमध्ये दुरुस्तीच केलेली नाही अशा महिलांचा १५०० रुपयांचा लाभ आता कायमचा बंद झाला आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत अधिक माहितीसाठी महिला व बाल विकासाच्या १८१ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. या क्रमांकावर तुम्ही संपर्क साधून आपली तक्रार दाखल करू शकता. तसेच आपल्या मनातील प्रश्नांची उत्तरे मिळवू शकता.

# निवडणूक कर्मचा-यांची नियुक्ती नियमानुसार

## सिब्बल यांचा युक्तिवाद निष्फळ ममतांना धक्का

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीसाठी केंद्रीय कर्मचा-यांच्या नियुक्तीला विरोध केला होता. तसेच मतमोजणीसाठी केंद्र सरकार आणि केंद्रीय पीएसयू कर्मचा-यांची नियुक्ती करण्याविरोधात सर्वोच्च न्यायालात याचिका दाखल केली होती. मात्र अशा प्रकारे नियुक्ती करणे हे नियमांच्या विरोधात नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले. तसेच पश्चिम बंगालच्या मतमोजणीसंदर्भात निवडणूक आयोगाने घेतलेल्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. या खटल्यात ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी ममता बॅनर्जींच्या बाजूने युक्तिवाद केला. मात्र त्यांचा युक्तिवादनी निष्प्रभ ठरला. संपूर्ण देशाचे लक्ष लागून असेल्या पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीसाठी अत्यंत चुरशीने ९० टक्क्यांहून अधिक मतदान झाले आहे. यावेळी कडेकोट सुरक्षा व्यवस्था असल्याने आधीच्या निवडणुकांच्या तुलनेत हिंसाचार फार कमी झाला असला तर सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि मुख्य विरोधी पक्ष असलेल्या भाजपामध्ये मोठ्या प्रमाणात आरोप प्रत्यारोप होत आहेत.




# दानवे, सिद्दीकी, नीलम गो-हेंच्या संपत्तीत मोठी वाढ

**मुंबई/प्रतिनिधी-** विधान परिषदेच्या उमेदवारांच्या संपत्तीत लक्षणीय वाढ झाल्याचे समोर आले आहे. नीलम गो-हे, अंबादास दानवे यांच्या कुटुंबाची संपत्तीही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. राष्ट्रवादीचे झिशान सिद्दीकी यांची संपत्ती अवघ्या दोन वर्षांत चौपट झाल्याचे स्पष्ट झाले. ३० एप्रिल हा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता. १२ मे रोजी निवडणूक होणार असून त्याच मतदानाच्या दिवशीच संध्याकाळी मतमोजणी होणार आहे.या निवडणुकीत ठाकरे गटाकडून अंबादास दानवे, तर शिवसेना शिंदे गटाकडून नीलम गो-हे, बच्चू कडू आणि राष्ट्रवादीकडून झिशान सिद्दीकीला उमेदवारी देण्यात आली आहे. दरम्यान या उमेदवारांबाबत मोठी माहिती समोर आली आहे.

शिवसेनेकडून पुन्हा उमेदवारी मिळालेल्या नीलम गो-हे आणि ठाकरेंच्या पक्षाचे उमेदवार अंबादास दानवे यांच्या संपत्तीत वाढ झाली आहे. तर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार झिशान सिद्दीकी यांची संपत्ती अवघ्या दोन वर्षांत तब्बल चारपट वाढल्याचे दिसून आले आहे.विधान परिषदेच्या विद्यमान उपसभापती नीलम गो-हे यांच्या संपत्तीत गेल्या सहा वर्षांत दहापट वाढ झाल्याचे समोर आले आहे. नीलम गो-हे यांच्याकडे २०२० साली १.५७ कोटी रुपयांची जंगम मालमत्ता होती तर स्थावर मालमत्तेचे मूल्य सहा कोटी रुपयांच्या घरात होते. तर आता (२०२६ साली) नीलम गो-हे यांची



जंगम मालमत्ता ११.६६ कोटी रुपये झाली आहे. त्यांनी स्थावर मालमत्तेत ७.६९ कोटी रुपयांची स्वअर्जित तर १२.७६ कोटी रुपयांची वडिलोपार्जित मालमत्ता जाहीर केली आहे. गो-हे यांच्याकडे टोयोटा

तर शिवसेना ठाकरे गटाकडून अंबादास दानवे यांना पुन्हा उमेदवारी दिली असून त्यांच्या संपत्तीतही भरघोस वाढ झाल्याचे दिसून आले आहे. २०१९ साली दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार दानवे यांची कुटुंबाची मिळून ६३.७८ लाख रुपयांची जंगम संपत्ती होती.मात्र आता पुन्हा उमेदवारी मिळाल्यानंतर दानवे यांनी गुरुवारी प्रतिज्ञापत्र दाखल केले. त्यानुसार, (२०२६ साली) दानवे यांच्या कुटुंबीयांची मिळून २.३६ कोटी रुपयांची जंगम संपत्ती तर ५.०६ कोटी रुपये किमतीची स्थावर मालमत्ता आहे.

**सिद्दीकी यांच्या संपत्तीत चौपट वाढ-**राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाकडून झिशान सिद्दीकी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. झिशान सिद्दीकी यांनी २०२४ मध्ये विधानसभा निवडणूक लढवली होती, तेव्हा ५.२० कोटी रुपयांची जंगम मालमत्ता व ३१.६९ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता असल्याचे, त्यांनी त्यावेळी जाहीर केले होते. तर आपल्यावर ८.७७ कोटी रुपयांचे कर्ज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले होते. मात्र २०२६ मध्ये त्यांच्या संपत्तीत २ वर्षांत जवळपास चौपट वाढ झाल्याचे दिसून आले आहे. सिद्दीकी यांनी २१.१७ कोटी रुपयांची जंगम मालमत्ता जाहीर केली आहे

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मारहाण, लूटप्रकरणी आरोपी अटकेत

**-रोख रक्कम व मोबाईल जप्त**

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुन्या वादातून झालेल्या मारहाण व लूटप्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक करून त्याच्याकडून रोख रक्कम व मोबाईल असा एकूण २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी दर्शन बाबाराव नांदेडकर (वय २६, रा. राजुरा, ता. जि. अमरावती) यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अभिषेक बबन पंचोरे (वय २६, रा. राजुरा, अमरावती) याच्याशी फिर्यादीचा घोडे नाचविण्याच्या व्यवसायातून जुना वाद असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० एप्रिल २०२६ रोजी रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास फिर्यादी आपल्या बोलेरो वाहनातून घोडा घेऊन अर्जुननगर येथे गेला असता आरोपी तेथे मद्यधुंद अवस्थेत आला व घोड्याच्या कारणावरून वाद घालत त्याने टोकदार वस्तूने फिर्यादीच्या डोक्यावर प्रहार करून जखमी केले. त्यानंतर फिर्यादी बडनेरा येथील साहिल लॉन येथे कार्यक्रमासाठी गेल्यावर आरोपी त्याच्या मागोमाग तेथे पोहोचला. तेथेही त्याने पुन्हा वाद घालत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली तसेच बोलेरो वाहनाची काच फोडून नुकसान केले. याशिवाय फिर्यादीकडील १० हजार रुपये व 'ओप्पो' कंपनीचा मोबाईल हिसकावून नेल्याची तक्रार आहे. गुन्ह्याचा तपास सुरू असताना गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने आरोपीचा शोध घेत मार्डी रोड परिसरातून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून गुन्ह्यातील १५ हजार रुपये किमतीचा मोबाईल व ८ हजार रुपये रोख असा एकूण २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, क्राईम पोलीस निरीक्षक विजया पंधरे व प्रशासन पोलीस निरीक्षक समाधान वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत डीबी पथक प्रमुख पोउपनि. सागर ठाकरे यांच्यासह पोलिस कर्मचारी प्रकाश मेश्राम, निलेश जुनघरे, अमोल यादव, विनोद मालवे, आशिष ठाकरे, सिद्धार्थ शृंगारे व सचिन गौरखेडे यांनी सहभाग घेतला.

# तक्षशिला महाविद्यालयाची बारावीच्या परीक्षेत उत्तुंग भरारी; निकाल ९०.७५ टक्के!

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात आलेल्या बारावीच्या (एएण) परीक्षेचा निकाल आज (दि.२) जाहीर झाला असून श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित अमरावती येथील तक्षशिला महाविद्यालयाने यंदाही आपल्या यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९०.७५ टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी विविध शाखांमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.



महाविद्यालयाने सर्वच शाखांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. यात प्रामुख्याने विज्ञान शाखेने बाजी मारली आहे. विज्ञान शाखा ९४.७३इ, वाणिज्य शाखा ९०.९०इ,आणि श्ण्न्र विभाग ८८.८८इ तर कला शाखेचा ८५.००इ निकाल लागला आहे. विविध शाखांमधून अनेक विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य मिळवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. वाणिज्य शाखेत नाविन्य उमाळे (८०.८३इ) याने प्रथम क्रमांक पटकावला, तर वैभवी सूर्यवंशी (७०.८३इ) हिने द्वितीय क्रमांक मिळवला. कला शाखेत सानिया मांजरे (६८.५०इ) हिने प्रथम, तर अल्फिया चौधरी (६७इ) हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. श्ण्न्र विभागात साहिल मसराम याने ६४.३३इ गुणांसह यश मिळवले. विज्ञान शाखेत रीमल मोनावाले हिने ६०.५०इ गुण मिळवून यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माधुरी फुले आणि उपप्राचार्य प्रितेश पाटील यांच्यासह सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांच्या घरी जाऊन अभिनंदन केले आहे. या यशात डॉ. रुपेश बेलसरे, डॉ. आनंद देशमुख, महेंद्र भगत, प्रा. सचिन कुमरे, प्रा. निरूपमा भोरे आणि प्रा.मोनाली पाटील,प्रा. निलेश गणगणे, प्रा. सुभाष मुंडे, प्रा. समीर चौधरी, प्रा. ममता कळमकर, प्रा.ज्योती नवलकर यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# २.०४ लाखांचा अवैध देशी-विदेशी दारू साठा जप्त

## गाडगेनगर पोलिसांची धडक कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने महाराष्ट्र दिनी (१ मे) धडक कारवाई करत विलासनगर परिसरातून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या साठवून ठेवलेला देशी-विदेशी दारूचा साठा जप्त केला. या कारवाईत एकूण २ लाख ४ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, सकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास डी.बी. पथकाने विलासनगर येथील अशोक महावीर पटेल (वय ६०, रा. विलासनगर, अमरावती) यांच्या घरी छापा टाकला. यावेळी घरात विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात देशी-विदेशी दारूचा साठा बाळगलेला आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या साठ्यात रॉयल स्टॅग, ऑफिसर्स चॉइस ब्ल्यू, रॉयल चॅलेंज, इम्पेरियल ब्ल्यू, मॅकडॉवेल्स, आयकॉनिक, मुंबई माल्ट, बी७ स्टर्लिंग रिझर्व्ह, मॅजिक मोमेंट्स यांसारख्या विविध ब्रँडच्या दारूच्या बाटल्या तसेच ट्युबॉर्ग व किंगफिशर बिअरचा समावेश आहे. या सर्वांचा एकत्रित अंदाजे २,०४,८१० रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई), ६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, क्राईम पोलीस निरीक्षक विजया पंधरे व प्रशासन पोलीस निरीक्षक समाधान वाठोरे यांच्या नेतृत्वात पार पडली. कारवाईत डी.बी. पथक प्रमुख पोउपनि सागर ठाकरे यांच्यासह पोलिस कर्मचारी अशोक वाटाणे, भारत वानखडे, राजेश गुरेले, आशिष ठाकरे, सुशांत प्रधान, मतीन शेख, धनराज कुमरे, महेश शर्मा, राज देविकर, निरज ठाकूर व रंजीत कडू यांनी सहभाग घेतला.

# विधानपरिषदेचे उमेदवार माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांचे जुळया नगरीत जल्लोषात स्वागत



**अचलपूर/प्रतिनिधीः-** माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या शिवसेना प्रवेशानंतर आणि विधान परिषदेची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आज त्यांचे अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात आगमनावेळी कार्यकर्त्यांनी जल्लोषात स्वागत केले. विधानपरिषदेची उमेदवारी शिवसेना पक्षाकडून जाहीर झाल्यानंतर प्रथमच जुळ्या शहरात दाखल होताच माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांचे ठिकठिकाणी फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणाबाजी करत भव्य स्वागत करण्यात आले. मुंबईहून परतताना बच्चू कडू यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रायगडावरील समाधीचे दर्शन घेतले. त्यानंतर अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात पोहोचताच कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. मोठ्या संख्येने उपस्थित समर्थकांनी बच्चू कडू यांच्यावर पुष्पवृष्टी करत त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना बच्चू कडू यांनी आपल्या नव्या राजकीय प्रवासाची सुरुवात जनतेच्या आशीर्वादाने होत असल्याचे सांगितले. 'शिवसेनेच्या माध्यमातून जनतेच्या प्रश्नांसाठी अधिक प्रभावीणे लढणार,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी माजी नगरसेवक बल्लू जवंजाळ,संजय तट्टे,अनिल पिंपळे , गोपाल खोलापुरे,नितीन आखुड,बंटी ककरानीया,माणिक देशपांडे, मंगेश हुड,दीपक भोरे , किशोर बद्रटीये, प्रीतेश अवघड ,आतिश सुंडेवाले, लकी चौबे,भूषण घडेकर, बादल डकरे असंख्य प्रहार सामाजिक संघटना व शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते ,पदाधिकारी उपस्थितीत होते.

# सातूर्णात महिलेचे मंगळसूत्र लंपास

## दोघांविरुद्ध गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या सातूर्णा परिसरातील दिल्ली पब्लिक शाळेजवळ दुचाकीवरून आलेल्या दोन बदमाश्यांनी पायदळ घरी जाणाऱ्या महिलेचे १ लाख ५० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र हिसकावून पळ काढल्याची घटना शुक्रवार १ मेच्या रात्री ९ वाजता सुमारास घडली आहे. या प्रकरणात पोलिसांनी महिलेच्या तक्रारी वरून दोन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार पीडित ५५ वर्षीय महिला शुक्रवारीं रात्री नऊ वाजता कामावरून घरी जात होती. दिल्ली पब्लिक स्कूल मार्गावर विरुद्ध दिशेने दुचाकी वर येणाऱ्या दोन हेल्मेट धारी बदमाश्यांनी तिच्या गळ्यातून १.५० लाख रुपाये किमतीचे मंगळसूत्र झपटले आणि पळ काढला. महिलेने आरडाओरडा केला तर परिसरातील नागरिक धावून आले. त्यांनी याची माहिती तात्काळ राजापेठ पोलीसना दिली. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलीसांसह गुन्हे शाखेचे पथक येथे दाखल झाले. त्यांनी परिसरातील निरीक्षण केले आणि तेथील सीसीटीव्ही फुटेज तपासले. फुटेच्या आधारावर पोलीस पुढील तपास करत आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत रेमंड कर्मचा-याचा मृत्यू

## अर्जुन नगर टी पॉईंट वर अपघात

**अमरावती/प्रतिनिधीः-** अज्ञात वाहनाच्या धडकेत रेमंड कंपनीमध्ये कार्यरत कर्मचारा-याचा मृत्यू झाल्याची घटना गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या अर्जुन नगर टी पॉइंट परिसरात घडली. गौतम कुमार सिंग असे मृत कर्मचारीचे नाव आहे. माहिती नुसार गौतम कुमार सिंग नांदगाव पेठ एमआयडीसी मध्ये रेमंड कंपनीमध्ये कार्यरत होते. कंपनीचे प्रोजेक्ट सक्सेस झाल्यामुळे कार्यक्रमाचे आयोजन मधुसूदन कॉलनी येथील नाईक हाऊस मध्ये करण्यात आले होते. गौतम कुमार या कार्यक्रमात गेले होते आणि तेथून आपली दुचाकी एम एस २७ एक्यू ९८१२ ने परत घरी येत असताना अर्जुन नगर टी पॉईंट वर त्यांच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने धडक मारली. यामध्ये गौतम कुमार गंभीर जखमी झाले होते. त्यांना जखमी अवस्थेत डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालयात दाखल करण्यात आले जेथे उपचारा दरम्यान त्यांची मृत्यू झाला. पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

## बारावी निकालः राज्यात

शाखानिहाय निकालाची टक्केवारीत विज्ञान ९७.४८ टक्के, वाणिज्य ८९.८७ टक्के, कला ८१.३३ टक्के,व्यवसाय अभ्यासक्रम ७५.८७ टक्के आणि आयटीआय ९०.४०टक्के निकाल लागला आहे.

निकालात मुलींनी पुन्हा एकदा मुलांना मागे टाकले आहे. अमरावती विभागातून ९३.९५ टक्के विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत, तर मुलांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ८८.२९ टक्के इतके आहे.

अमरावती विभागातल्या पाच जिल्ह्यातील १ लाख ४७ हजार ७५४ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी १ लाख ३४ हजार ३५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामध्ये ६९ हजार ६७१ मुलांची तर ६४ हजार ६८१ मुलींची संख्या आहे. अनुक्रमे ८८.२९ व ९३.९५ अशी त्यांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी आहे.

अमरावतीत वाणिज्य शाखेतून केशरबाई लाहोटी महाविद्यालयाचे सिद्धांत राकेश बत्रा प्रथम आहे. विज्ञान शाखेतून ब्रजलाल बियाणी महाविद्यालयाची यशश्री संतोष राजा ९७.३३ टक्के घेऊन अव्वल राहिली तर कला शाखेतून श्रीदा जोग प्रथम आली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन भव्य स्वागत करण्यात आले.

## जमिनीच्या वादातून मोठ्या

शुक्रवारी रात्री याच कारणावरून तिन्ही भावांमध्ये पुन्हा शाब्दिक चकमक उडाली. वादाचे रूपांतर काही वेळातच हाणामारीत झाले.

रागाच्या भरात ६० वर्षीय अब्दूल तसकीनने धारदार चाकूने धाकटा भाऊ मकसूद याच्या छातीवर वार केला. हा वार इतका भीषण होता की मकसूद रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. त्यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली.

घटनेची माहिती मिळताच नागपुरी गेट पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून पंचनामा केला. पोलिसांनी मुख्य आरोपी अब्दूल तसकीन याला बेड्या ठोकल्या आहेत. मात्र, या गुन्ह्यात त्याला साथ देणारे अन्य दोन साथीदार नाहिद काझी उर्फ रेहमान डेंटर आणि सलेकिन अब्दूल सलीम काझा हे सध्या पसार आहेत.

## बच्चू कडूंचे शहरात जोरदार

अनेक कार्यकर्ता दिसले. जागोजागी ढोल ताशाच्या निनादात त्यांचे स्वागत करण्यात आले. गांधी चौक,अंबादेवी मार्ग, जयस्तंभ चौक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावरून मिरवणूक निघाली. जागोजागी पुष्प वर्षा मिरवणूक वर करण्यात आली. यानंतर बच्चू कडू यांनी सभेला संबोधित केले. बच्चू कडू म्हणाले की, हे स्वागत नाही एक विश्वासाचे प्रतीक आहे. शिवसेनेचा धनुष्यबाण आता त्यांची ताकद बनणार आहे.पुन्हा शेतकरी आणि दिव्यांगाच्या समस्येसाठी रस्त्यावर उतरणार आहे. मिरवणूकमध्ये शिवसेना शिंदे गटाच्या प्रीती बंड, अरुण पडोळे, बंटी रामटेके, छोटू महाराज वसु सह शिवसेनेचे आणि प्रहार चे असंख्य पदाधिकारी कार्यकर्ता सहभागी झाले. राजकमल चौकात भव्य जल्लोष साजरा करण्यात आला.

## ॲड. प्रशांत देशमुख वकील

अध्यक्षपदाची मतमोजणी झाली. शुक्रवारी मध्यरात्री एडवोकेट प्रशांत देशमुख यांच्या रूपात वकील संघाला नवीन अध्यक्ष मिळाले. या निवडणुकीत ॲड. प्रशांत देशमुख यांना ६६३ मतं मिळाली तर ॲड.अनिल विश्वकर्मा यांना ६५६ मतं मिळाली आहे. देशमुख आणि विश्वकर्मा यांच्यात तगडा मुकाबला झाला आणि देशमुख विजयी झाले. ॲड. धनराज सावधानी यांना १५ मते मिळाली.

उपाध्यक्ष पदासाठी ॲड. इमरान नुरानी, ॲड. आर एस भोयर, ॲड.नरेंद्र गजभिये, ॲड. ॲड. धनंजय तोटे यांच्यात मुकाबला होता. ॲड.रमेश भोयर ४२१ मतांनी जिंकले तर धनंजय तोटे यांना ३३२ व नरेंद्र गजभिये यांना ३०४ व ॲड.मोहम्मद नुरानी यांना २५५ मत मिळाली आहे.

महिला उपाध्यक्ष पदावर ॲड.प्राजक्ता वरुडकर ६३६ मंत घेऊन विजयी ठरल्या आहे तर ॲड.भावना ठाकरे खंडारे यांना ४८१ व भूमिका वानखडे १७८ यांना मतं मिळाली आहे.सचिव पदासाठी ॲड. गिरीश धर्माळे, ॲड.सचिन पंडितकर यांच्या मध्ये लढत झाली. यामध्ये ॲड. गिरीश धर्माळे ७३४ मतांनी विजय ठरले,विजय पंडितकर यांना ५५२ मतं मिळाली. ग्रंथालय सचिव पदासाठी ॲड.चेतन बुंदेले ,ॲड.सुमीत शर्मा मैदानात होते ,परंतु नामांकणाच्या अंतिम दिवशी चेतन बुंदेले यांनी आपले नामांकन वापस घेतल्याने सुमित शर्मा अविरोध निवडून आले. कार्यकारणी सदस्य म्हणून ॲड. आदित्य गुप्ता (९००), ॲड.श्रीधर अकोलकर(१०५२) , ॲड.प्रवीण आठवले(९३०), ॲड.गौरव राऊत (९५८) , ॲड.अक्षय खराटे (८५१) तथा महिला मधून ॲड.रश्मी दाऊस्कर (८७२) , ॲड.सुरभी कुर्वे(८४१), ॲड.ऋतुजा पठारे(८५५) विजयी झाले आहे. मुख्य निवडणूक अधिकारी ॲड.रामपाल कलंत्री आणि सहाय्यक अधिकारी ॲड.शोएब खान यांच्या मार्गदर्शनात निवडणूक प्रक्रिया पार पडली.

## सीताबाई संगई कनिष्ठ महाविद्यालयाची

शैक्षणिक परंपरा कायम राखली आहे. विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून एकूण ५८ विद्यार्थ्यांपैकी सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कला शाखेत ५२ पैकी ४९ विद्यार्थी उत्तीर्ण होत ९४.२३ टक्के निकाल लागला, तर एम.सी.व्ही.सी. शाखेचा निकाल ५५ टक्के नोंदविण्यात आला. विज्ञान शाखेत गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये अस्मिता श्रीरंग अस्वार हिने ५२७ गुण (८७.८३%) मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. गौरी राजेश वाघमारे ५०१ गुण( ८३.५०%) द्वितीय, तर जानवी सुधाकर जगनाडे ४८३ गुण (८०.५०%) तृतीय क्रमांकावर राहिली. कला शाखेत वेदांत ओमप्रकाश कबाडे याने ५५६ गुण (९२.६७%) मिळवत प्रथम क्रमांक मिळविला. सायली विनोद गुजर ५४५ गुण (९०.८३%) द्वितीय व नूतन प्रकाश धर्मे ५१४ गुण (८५.६७%) तृतीय क्रमांकावर राहिली. एम.सी.व्ही.सी. शाखेत रेणुका प्रविण मेहेरे हिने ३०२ गुण (५०.३३%) मिळवत प्रथम क्रमांक मिळविला. तसेच एम.सी.व्ही.सी. अंतर्गत इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी शाखेचा निकाल ७३.३३ टक्के लागला आहे. या यशाबद्दल सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. उल्हास संगई, उपाध्यक्ष भरत संगई व विवेक संगई, सचिव प्रसाद संगई, सहसचिव प्रसन्न संगई, अजय संगई, कार्यकारी सदस्य अविनाश संगई, ज्येष्ठ सदस्य मुकुंद संगई व अशोक संगई, तसेच सदस्य आशिष संगई, विनय संगई, अनुप संगई तसेच सर्व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य राकेश डोणगावकर, उपमुख्याध्यापक राजेश वैद्य तसेच पर्यवेक्षक डॉ. निलेश डाहाळे आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## २.३ कोटीचा गांजा, एम.डी,

ठाणे हद्दीतील १६ प्रकरणं, बडनेरा येथील १३, गाडगे नगर ११, खोलापुरी गेट ३, नांदगाव पेठ ६, फ्रेजरपुरा ४, वलगाव २, कोतवाली २, राजापेठ १ असे एकूण ५८ प्रकरणात समाविष्ट असलेला ३६८.४३ किलो गांजा, १.५५१ चरस आणि १.२५३ एमडी हे अंमली पदार्थ बुटीबोरी येथील महाराष्ट्र पावर लिमिटेड मध्ये नेऊन डिस्पोजल कमिटी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, एन्व्हायरो कंपनीचे मॅनेजर, दोन पंच व पोलीस अधिकारी यांच्या समक्ष इन्सिनेटरच्या मदतीने जाळून नष्ट करण्यात आला.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या अध्यक्षतेखाली उपायुक्त श्याम घुगे, रमेश धुमाळ अशी त्रि सदस्य डिस्पोजल कमिटी स्थापित करण्यात आली होती. समितीच्या आदेशाने जप्त माल नष्ट करण्यात आला. पोलीस निरीक्षक सीमा दाताळकर, संदीप चव्हाण, योगेश इंगळे, उपनिरीक्षक कैलास सानप, कॉ. सुधीर गुडधे, भूषण यांच्या उपस्थितीत कार्यवाही पार पडली.

## उष्माघाताचा नेर मध्ये पहिला

पारधी बेडा परिसरात सध्या भीषण पाणीटंचाई जाणवत आहे. चिमुकली अनवी शुक्रवारी रणरणत्या उन्हात पाणी आणण्यासाठी गेली होती. दिवसभर उन्हात तिची पायपीट झाली. त्यानंतर सायंकाळच्या सुमारास तिला अचानक चक्कर आली आणि ती जागीच कोसळली. कुटुंबियांनी तिला तातडीने रुग्णालयात हलवले, मात्र उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. अनवीला आधीपासून काही आजार, ताप किंवा फिट येण्याचा त्रास होता का, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती नाही. बालिकेचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, हे शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्याशिवाय स्पष्टपणे सांगता येणार नाही. मात्र पालकांनी शव विच्छेदनाची परवानगी दिली तरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल', असे जिल्हा आरोग्य अधिकारी सुभाष ढोले यांनी सांगितले आहे.

## पद्मजा कुऱ्हेकर यांचे निधन

परायण कार्यात तेव्हढ्यात निष्ठेने सहभाग दिला.प पु नारायण गुरू महाराज यांच्या त्या शिष्या होत्या.त्यांनी पायी पंढरपूरची वारी केली होती.त्यांच्या निधनाने नारायण गुरू संप्रदाय आज अत्यंत व्यथित झाला आहे. आज दुपारी १ वाजता त्यांच्या पार्थिवावर हिंदू स्मशान भूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांचे ज्येष्ठ पुत्र अजित यांनी मंत्रोच्चारात त्यांना भडाग्नी दिला. बँकिंग वर्तुळातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांसह विविध मान्यवर अंत्यसंस्कारास उपस्थित होते. पद्मजाताईंच्या पश्चात पती श्याम, ज्येष्ठ विवाहित कन्या स्वाती, मुलगा अजित, जावई, स्नुषा, नातवंडे आणि मोठा परिवार आहे.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी

वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापन करण्यामागचा शासनाचा उद्देश आहे. म्हणूनच अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे शहराच्या मध्यवर्ती भागात व सर्व आरोग्य यंत्रणा संलग्न असलेल्या परिसरातच स्थापन करण्यात यावे. अशी ठाम भूमिका अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांनी घेतली आहे. यासाठी मागील अनेक अधिवेशनामध्ये मुद्दा उपस्थित करून अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अमरावती करिता शहरापासून १२ कि.मी. अंतरावर असल्याने मौजे आलियाबाद येथील जागे बाबत पुर्नविचार करून आपण सुचविलेली शहराच्या मध्यवर्ती भागातील जागा निश्चित करण्याची मागणी आ. सुलभा खोडके यांनी रेटून धरली आहे.

सदर जागेवर वैद्यकीय महाविद्यालयाचे व रुग्णालयाचे बांधकाम करण्याकरिता आशियाई विकास बँक (ADB) अर्थसहाय्य करणार आहे. त्यानुषंगाने आशियाई विकास बँकेचे प्रतिनिधी अमरावती वनविभाग कार्यालयात 'एनव्हारमेंट इकोसेफगार्ड सर्व्हे करण्यासाठी आले असता, सदरची प्रस्तावित जागा वनविभागाच्या 'आयडेन्टीफाईड फॉरेस्ट' क्षेत्रात मोडत असल्याचे निदर्शनास आले आहे.

यासंदर्भात उपवनसंरक्षक, अमरावती वनविभाग यांनी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांना संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे की, मौजे अलीयाबाद (ता. जि. अमरावती) येथील गट नं. ९/१ मधील ११.२९ हेक्टर आर. क्षेत्राचा समावेश अमरावती वनविभागाच्या मंजूर कार्य आयोजनेमधील एरिया आयडेंटिफाइड अँज फॉरेस्ट विदिन द डिक्शनरी मिनिंग ऑफ फॉरेस्ट अर्थात वन म्हणून ओळखला जाणारा प्रदेश या यादीमध्ये होतो. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयातील रिट पिटिशन ( सिविल ) नं. १७१/१९९६, आदेश दिनांक १२/१२/१९९६ नुसार, सदर क्षेत्र 'वनसंज्ञे'त येत असल्याने त्यास 'वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८०' च्या तरतुदी लागू होतात. परिणामी, केंद्र शासनाच्या पूर्व मंजुरीशिवाय या जागेवर कोणतेही वनेत्तर (Non-forestry) कामे करता येणार नाहीत. याबाबत सुद्धा आमदार महोदयांनी मुख्यमंत्री महोदयांना पत्राद्वारे अवगत केले आहे.

निश्चित केलेली जागा हि शहरापासून १२ किलोमीटर लांब असल्याने बहुतांश रुग्णांना, विशेषतः मेळघाटसारख्या दुर्गम भागातील नागरिकांना तिथे पोहोचणे अत्यंत गैरसोयीचे व वेळखाऊ ठरेल. तसेच रुग्णांच्या अनुपलब्धतेमुळे विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय शिक्षणावरही प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असल्याने, हे रुग्णालय सर्वसामान्यांच्या दृष्टीने मध्यवर्ती व सोयीच्या ठिकाणी असणे आवश्यक आहे.

सदर कायदेशीर तांत्रिक अडचण आणि जनहित लक्षात घेता, अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकरिता निश्चित केलेली जागा बदलवून शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन पर्यायी जागेसाठी जो प्रस्ताव दिला आहे. तो मान्य करण्यात यावा , अशी मागणी आमदार महोदयांनी पत्राद्वारे केली आहे.

पर्यायी जागा म्हणून स्त्री रुग्णालय व सुपर स्पेशालिटी रुग्णालय परिसरः येथे उपलब्ध असलेली २३ एकर जागा शहराच्या मध्यभागी असून महाविद्यालय उभारणीसाठी अत्यंत योग्य आहे. तसेच पंजाबराव कृषी विद्यापीठ जागा (वेलकम पॉईंट): शहरात उपलब्ध असलेल्या विद्यापीठाच्या ७५ एकर जागेपैकी २५ एकर जागा या प्रकल्पासाठी अधिग्रहित करावी.अथवा मौजे रहाटगाव (सर्व्हे नं. १२१): येथील शहरालगत उपलब्ध असलेली २३ एकर जागा. त्याचबरोबर कापूस पणन महासंघ (मोसीकॉल) ची शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली ही २५ एकर जागा देखील प्रकल्प उभारणीसाठी सोयीची ठरेल. अशा पर्यायी जागांचा प्राधान्याने विचार करण्यात यावा, मौजे आलियाबाद येथील प्रस्तावित जागा बदलून आपण सुचविलेल्या शहराच्या मध्यवर्ती भागातील सुयोग्य जागेस तात्काळ मान्यता देण्याबाबत संबंधितांना आदेशित करावे, अशी मागणी आमदार सुलभा खोडके यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

## श्री समर्थ विद्यालयाचा बारावीचा

धनंजय पाठक , उपप्राचार्य सचिन देवळे , पर्यवेक्षक मधुसूदन वटक,पर्यवेक्षक अमित कापगते यांच्यासह ज्यु कॉलेजचे प्रा.डॉ.मनीषा ठाकरे, प्रा.डॉ. राजेंद्र राऊत,प्रा.समीक्षा ढोले,प्रा.विजय लोखंडे, प्रा. पल्लवी निळकरी,प्रा.कोमल वर्हेकर तसेच समस्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## जानकीबाई देशमुख विद्यालयाची

शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींनी हे यश संपादन केले आहे. या निकालात आयुषी संतोष पनईवाले हिने ८१.५० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. रोशनी दिलीप उघडे हिने द्वितीय, तर खुशी दुर्योधन लोंदे हिने तृतीय क्रमांक मिळवत विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष माधुरी देशमुख, सचिव रंजना नाईक, प्राचार्या मनीषा नाकील, पर्यवेक्षक श्रीकांत पसारकर व जयश्री पाटील यांच्यासह सर्व शिक्षकवृंदांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या

## श्री शिवाजी कला व वाणिज्य

मिळवला आहे. या महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेतून मोनिका रामेश्वरराव डाहे हिने ७६ टक्के तर उत्कर्ष अशोक मेश्राम याने ७५ टक्के गुण मिळवून महाविद्यालयातून प्रथम व दुसरा येण्याचा मान मिळवला आहे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमूख, प्राचार्य डॉ. अंबादास ल. कुलट यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, ३ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# महावितरणच्या मान्सूनपूर्व देखभाल दुरुस्तीच्या कामांवर संकटाचे काळे ढग

■ पप्पू घुगे ■

**वाशिम :** मान्सून अवघ्या काही आठवड्यांवर येऊन ठेपला असताना वीज वितरण व्यवस्थेची कणा मानली जाणारी देखभाल व दुरुस्तीची कामेच ठप्प होण्याच्या मार्गावर असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. महावितरणकडून 'ब्रेकडाऊन मेंटेनन्स' अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटदारांची तब्बल ३ कोटी ६७ लाख रुपयांची देयके थकविण्यात आल्याने संतप्त कंत्राटदारांनी कामांवर बहिष्कार टाकण्याची भूमिका घेतली असून अनेक जण 'नॉट रिचेबल' होण्याच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. गेल्या ऑक्टोबर महिन्यापासून या कामांची बिले रखडलेली असून, आर्थिक कोंडीत सापडलेल्या कंत्राटदारांची अवस्था बिकट झाली आहे. एकीकडे कामे पूर्ण करूनही मोबदला मिळत नसल्याने कंत्राटदार संतप्त झाले आहेत, तर दुसरीकडे महावितरणचा अधिकारी वर्ग मात्र या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.

## कोट्यवधींची देणी थकीत, कंत्राटदार 'नॉट रिचेबल' होण्याच्या तयारीत; अधिका-यांवर गंभीर आरोप

याबाबत संबंधित कंत्राटदारांनी स्थानिक कार्यालयापासून ते मुंबई स्तरापर्यंत पाठपुरावा करत ई-मेलद्वारे तक्रारी केल्या आहेत. मात्र, त्यानंतरही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने संताप आणखी वाढला आहे.

दरम्यान, वाशिम येथील अधीक्षक अभियंता अजय शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर कंत्राटदारांनी थेट बोट ठेवले असून, कमिशनखोरीचे गंभीर आरोप देखील करण्यात आले आहेत. 'कमिशनची पूर्तता न झाल्यामुळेच देयके मुद्दाम रखडवली जात आहेत,'



असा खळबळजनक आरोप कंत्राटदारांच्या पदाधिकारी वर्गाकडून करण्यात आला आहे. या आरोपांमुळे महावितरणच्या प्रतिमेला मोठा धक्का बसला आहे. मान्सून काळात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अत्यावश्यक असलेली पूर्वतयारीच कोलमडण्याच्या मार्गावर असताना, महावितरण प्रशासनाने तातडीने जागे होऊन थकीत देयके अदा करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, पावसाळ्यात वीज खंडित होण्याचे संकट ओढवून नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागतील, यात शंका नाही. या संदर्भात अधिकारी वर्गाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

***कोट्यवधींची वसुली, पण सुविधा ठप्प!***

*वाशिम शहरात वीज ग्राहकांकडून दरमहा कोट्यवधी रुपयांची वसुली केली जाते. बिल वसुलीत कसूर न करणाऱ्या महावितरणकडूनच सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदारांना पैसे देताना मात्र टाळाटाळ केली जात असल्याचे चित्र आहे. परिणामी, वीज यंत्रणेच्या देखभाल-दुरुस्तीची कामे रखडत असून, याचा फटका थेट सर्वसामान्य नागरिकांना बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.*

# १२ वी परीक्षेत जिल्हा विभागात द्वितीय, निकालात मुलींची पुन्हा एकदा बाजी

### जिल्ह्याचा निकाल ९१.१५ टक्के

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्याचा यंदाचा १२ वी परीक्षेचा निकाल ९१.१५ टक्के लागला असून वाशीम जिल्ह्याने अमरावती विभागात दुसरा क्रमांक पटकवला. विशेष म्हणजे यंदाही मुलींनी बाजी मारत मुलांच्या तुलनेत अधिक टक्केवारी मिळवली आहे. जिल्हा अमरावती विभागात दुसरा, जिल्ह्यात वाशिम तालुका अव्वल.

जिल्ह्याचा यंदाचा शैक्षणिक निकाल ९१.१५ टक्के लागला असून अमरावती विभागात दुसरा क्रमांक पटकवला. विशेष म्हणजे यंदाही मुलींनी बाजी मारत मुलांच्या तुलनेत अधिक टक्केवारी मिळवली आहे. आकडेवारीनुसार मुलींचा निकाल लक्षणीयरीत्या अधिक असल्याने त्यांच्या सातत्यपूर्ण प्रगतीचा ट्रेंड कायम असल्याचे



स्पष्ट झाले आहे. तालुकानिहाय निकालाचा आढावा घेतला असता, वाशिम तालुका ९२.६६ टक्क्यांसह आघाडीवर राहिला. मालेगाव (९२.९८ टक्के ) आणि रिसोड (९१.९९टक्के) यांनीही उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्याच्या सरासरीत भरीव योगदान दिले, तर कारंजा तालुक्याने ९१.३४ टक्के निकालासह स्थिर कामगिरी नोंदवली. मात्र, काही तालुक्यांमध्ये अपेक्षेपेक्षा कमी निकाल लागल्याचे दिसून आले. मंगरुळपीर तालुक्याचा निकाल ८८.५८ टक्के नोंदवला गेला, तर मानोरा तालुका ८४.८४ टक्क्यांसह जिल्ह्यात सर्वात मागे राहिला असून या तालुक्यांमध्ये गुणवत्तावाढीसाठी विशेष उपाययोजना राबविण्याची गरज व्यक्त होत आहे. जिल्ह्यात एकूण २१,४०६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यापैकी १९,३६१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. मुलांचा निकाल ८९.१७ टक्के, तर मुलींचा निकाल ९३.९२ टक्के इतका नोंदवण्यात आला आहे. दरम्यान, राज्यातील एकत्रित निकाल ९०.९२ टक्के लागला असून एकूण १,४८,९३१ विद्यार्थ्यांपैकी १,३४,३५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्यात मुलांचा निकाल ८८.२९ टक्के, तर मुलींचा निकाल ९३.९५ टक्के इतका आहे. या निकालातून शैक्षणिक क्षेत्रात सातत्य आणि स्थिरता दिसून येत असली तरी तालुकानिहाय असमतोल कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कमी निकाल असलेल्या भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याची गरज शिक्षण तज्ज्ञांकडून व्यक्त होत असून आगामी शैक्षणिक वर्षात गुणवत्तावाढीसाठी ठोस पावले उचलण्याचा निर्धार प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# महानगरात हिंदुत्वाच्या घोषणांनी वातावरण दणाणले ; वाहनफेरीतून शहर भगवेमय

### हिंदु राष्ट्र-जागृती सभेच्या पार्श्वभूमीवर शेकडो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील श्री एकवीरा मैदान, गोरक्षण रोड येथे रविवारी (दि. ३ मे) सायंकाळी ६ वाजता होणाऱ्या हिंदु राष्ट्र-जागृती सभेच्या पार्श्वभूमीवर शनिवारी काढण्यात आलेल्या भव्य वाहनफेरीने संपूर्ण शहरात हिंदुत्वाचा जयघोष घुमवला. शेकडो धर्मप्रेमींच्या सहभागामुळे शहर भगव्या रंगात रंगून गेले होते. या सभेला प्रमुख वक्ते म्हणून तेलंगणातील आमदार टी. राजासिंह ठाकूर, सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक सद्गुरु स्वाती खाडये तसेच हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड राज्य संघटक सुनील घनवट मार्गदर्शन करणार आहेत. या पार्श्वभूमीवर आयोजित वाहनफेरीने शहरात जनजागृतीचे वातावरण निर्माण केले.



हुतात्मा चौक येथे भारतीय जनता पार्टी, अकोला महानगरच्या वतीने वाहनफेरीचे स्वागत करण्यात आले. भाजपा पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभागी होत या उपक्रमाला पाठिंबा दर्शविला. स्वागताचे नियोजन अर्चना शर्मा यांनी केले होते. वाहनफेरीचा प्रारंभ श्री राजराजेश्वर मंदिर येथे धर्मध्वज पूजन व शंखनादाने झाला. कालीचरण महाराज यांचे गुरुबंधू ईश्वरदासजी महाराज यांच्या हस्ते धर्मध्वजाचे पूजन करण्यात आले. भगवे फेटे परिधान केलेले युवक, हातातील भगवे ध्वज आणि जयघोषामुळे वातावरण भारावून गेले होते.

फेरीचा मार्ग राजराजेश्वर मंदिर, जय हिंद चौक, सिटी कोतवाली, गांधी चौक, टॉवर चौक, सिव्हिल लाईन, नेहरू पार्क मार्गे हुतात्मा चौक असा होता. शेवटी श्री एकवीरा मैदान येथे ध्येयमंत्राने वाहनफेरीची सांगता करण्यात आली. वाहनफेरीचा शुभारंभ उपमहापौर अमोल घोगे, नगरसेविका वैशाली शेळके व मंजुषा शेळके यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ईश्वरदासजी महाराज, अशोक पात्रीकर, सुनील घनवट यांची उपस्थिती होती. तसेच माजी महापौर विनोद मापारी, निखिल ठाकूर, धनंजय धवाडे, पंकज गावंडे, कुणाल शिंदे, निलेश काळे, विजय इंगळे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. समारोपप्रसंगी सुनील घनवट यांनी नागरिकांना संबोधित करत ही वाहनफेरी केवळ सुरुवात असून ३ मे रोजी होणाऱ्या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले. हिंदु राष्ट्र समन्वय समितीतर्फे सर्व नागरिकांना सभेसाठी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# महिला सुरक्षेसाठी क्यूआर कोडची अभिनव प्रणाली; अकोला पोलिसांचा पुढाकार

### पॅनिक बटनसह तत्काळ मदत, तक्रारदाराची ओळख राहणार गोपनीय



■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

राज्यात महिला व युवतींवरील वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर अकोला पोलीस दलाने महिला सुरक्षेसाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत एक अभिनव पाऊल उचलले आहे. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून आणि मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशनचे निरीक्षक अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली 'मुलींची सुरक्षा' या नावाची क्यूआर कोड प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या उपक्रमासाठी 'बझीका इंटरनॅशनल' कंपनीचे तांत्रिक सहकार्य लाभले आहे.

या उपक्रमांतर्गत शहरातील शाळा, महाविद्यालये, बस स्थानक, रेल्वे स्थानक, खासगी शिकवणी वर्ग तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी क्यूआर कोड लावण्यात आले आहेत. कोणत्याही महिला किंवा युवतीला त्रास होत असल्यास त्या आपल्या मोबाईलद्वारे हा क्यूआर कोड स्कॅन करून तत्काळ तक्रार नोंदवू शकतात. विशेष म्हणजे, तक्रारदाराचे नाव व वैयक्तिक माहिती पूर्णतः गोपनीय ठेवण्यात येणार असल्याने महिलांना निर्भयपणे तक्रार करता येणार आहे. या प्रणालीत 'पॅनिक बटन'चीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीत हे बटन दाबताच संबंधित पोलीस यंत्रणा अलर्ट होऊन काही मिनिटांतच पोलीस कर्मचारी घटनास्थळी पोहोचून पीडितेला त्वरित मदत व सुरक्षा प्रदान करणार आहेत. त्यामुळे ही प्रणाली महिलांसाठी संजीवनी ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

महिलांच्या सुरक्षेसाठी अकोला पोलीस दलाने राबविलेला हा उपक्रम राज्यातील पहिलाच असल्याचा दावा करण्यात येत असून विविध स्तरातून या उपक्रमाचे स्वागत व कौतुक होत आहे. या क्यूआर कोड प्रणालीच्या तांत्रिक विकासाची जबाबदारी मूर्तिजापूर येथील अभियंता गौरव संजय कीडे यांनी पार पाडली आहे. या उपक्रमामुळे महिलांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ होणार असून, पोलिसांच्या तपास प्रक्रियेलाही गती मिळणार आहे. मात्र, या प्रणालीचा कोणताही गैरवापर केल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलीस प्रशासनाने दिला आहे.

# पिंजर पोलिसांचा जुगार अड्डयावर छापा, पाच जण ताब्यात



■ प्रतिनिधी | पिंजर ■

अकोला पोलीस दलातर्फे राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत पिंजर पोलिसांनी अवैधरित्या सुरू असलेल्या जुगार अड्डयावर धडक कारवाई करत पाच आरोपींना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम, ताश पत्ते आणि दुचाकींसह एकूण १ लाख ४५ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १ मे २०२६ रोजी पिंजर ते कारंजा रोडलगत जंगल परिसरात काही इसम पैशांच्या हारजितवर 'तीन पत्ती' नावाचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ छापा टाकत आरोपींना रंगेहात पकडले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये हर्षल संजय अजमिरे (वय २७), शेख रसुल शेख हलीम (वय २१), संतोष पुर्णाजी खाडे (वय ४२), किसन सुपाजी बांगर (वय ३५) आणि देवानंद महादेव गवई (वय ४३) यांचा समावेश असून सर्वजण पिंजर (ता. बार्शिटाकळी, जि. अकोला) येथील रहिवासी आहेत.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी ५२ ताश पत्ते, १० हजार ४०० रुपये रोख आणि दोन मोटारसायकली जप्त केल्या. या प्रकरणी पिंजर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# मनसेच्या आंदोलनाला यश : ८१९ शेतकऱ्यांना थकीत मोबदला मिळणार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम तालुक्यातील किनखेडा शेतशिवारातून गेलेल्या वीजवाहिनीसाठीचा मोबदला अखेर शेतकऱ्यांना मिळणार असून मनसेच्या आंदोलनाला मोठे यश मिळाले आहे. तब्बल २०२१ पासून प्रलंबित असलेली ही रक्कम ८१९ शेतकऱ्यांना देण्याचे कंपनीने लेखी आश्वासन दिले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, वाशिम जिल्ह्यातून पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या १२०० के.व्ही. वर्धा–औरंगाबाद लाईनसाठी शेतकऱ्यांच्या जमिनीचा वापर करण्यात आला होता. मात्र या बदल्यात देय असलेला मोबदला गेल्या पाच वर्षांपासून रखडलेला होता. जिल्ह्यातील ८१९ शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे पैसे कंपनीकडे थकीत होते. यामध्ये किनखेडा गावातील ४६ शेतकऱ्यांचा समावेश होता.



यासंदर्भात वारंवार निवेदने देऊनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने अखेर २७ एप्रिल २०२६ रोजी मनसेच्या वतीने 'टॉवर चढो' आंदोलन छेडण्यात आले. महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे तालुकाध्यक्ष रघुनाथ खुपसे यांनी, मा. जिल्हाध्यक्ष मनिष डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली या आंदोलनाचे नेतृत्व केले.

आंदोलनानंतर कंपनीने तातडीने भूमिका घेत २६ एप्रिल रोजी २० शेतकऱ्यांच्या खात्यात मोबदला जमा केला.

उर्वरित २७४ लाभार्थ्यांचे पैसे ३० एप्रिलपर्यंत देण्यात येतील, तर उर्वरित सुमारे ४०० शेतकऱ्यांचे पैसे १५ जूनपर्यंत जमा करण्यात येतील, असे लेखी आश्वासन कंपनीकडून देण्यात आले. यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

या आंदोलनात सरपंच सुनिल लांडकर, रवि वानखेडे, संदीप वानखेडे, फकीरा करडीले, जुम्मा मांजरे, शाहरुख मांजरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस निरीक्षक हिवरकर, बिट जमादार विनोद दामोदर, रवि जवंजाळ आदींचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या यशस्वी आंदोलनामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून मनसेच्या लढ्याची जिल्ह्यात चर्चा रंगली आहे.

# जगाला बुद्धांच्या मानवतावादी विचाराची गरज : तेजराव वानखेडे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

संपूर्ण जगात युद्धाचे सावट असून अशांततेच्या वर्तमान काळात जगाला बुद्धांच्या मानवतावादी विचारांची खरी गरज आहे.असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सवाचे अध्यक्ष तेजराव वानखेडे यांनी केले.

स्थानिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर मैदान येथे शुक्रवार १ में रोजी वैशाख पौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.वैशाख पौर्णिमा हा दिवस भारतीय तसेच जागतिक सांस्कृतिक परंपरेत पवित्र ,चिंतनशील आणि मूल्य प्रधान मानला जातो.या दिवशी मानव जातीला करुणा,अहिंसा,समता आणि प्रज्ञेचा सार्वत्रिक संदेश देणाऱ्या तथागत गौतम बुद्ध यांचा जन्म,ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण हे तिन्ही महत्त्वपूर्ण प्रसंग घडले आहे.त्यामुळे हा दिवस केवळ धार्मिक विधीचा उत्सव नसून मानवी मूल्यांचे पुनरुजीवन करणारा,स्वपरीक्षणाची प्रेरणा देणारा आणि सामाजिक परिवर्तनाला चालना देणारा एक महत्त्वपूर्ण पर्व ठरतो.

# आ. साजिद खान पठाण यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर

## नगरसेवक आकाश कवडे यांच्या पुढाकारातून आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांच्या वाढदिवसानिमित्त महानगर युवक काँग्रेसच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमासाठी नगरसेवक आकाश कवडे यांनी विशेष पुढाकार घेतला होता. शनिवारी (ता. २ मे) स्थानिक स्वराज्य भवन येथे पार पडलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून ५० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले.

उन्हाळ्याच्या कडाक्याच्या उष्णतेतही हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. विशेषतः आकाश कवडे यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी नियोजनबद्ध तयारी करून शिबिराची यशस्वी अंमलबजावणी केली. उन्हाळ्यात भासणारी रक्ताची कमतरता लक्षात घेता, रुग्णांना वेळेवर मदत व्हावी हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. या शिबिरात साई ब्लड बँकेच्या कर्मचारी वर्गाने रक्त संकलनासाठी मोलाचे सहकार्य केले. रक्तदात्यांसाठी आवश्यक त्या सुविधा



उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. शिबिरादरम्यान उत्साही वातावरण पाहायला मिळाले. यावेळी कपिल रावदेव, राहुल सारवान, सोहेल पठाण, मोहम्मद शारिक, अंकुश तायडे, विजय जामनिक, अभिजीत तवर, अंकुश गावंडे, इसराइल खान, शेख हर्षद, मुकुंद सरनायक, संतोष निधाने, ऋषिकेश जामोद्दे, राम कोकाटे, सोहम गवई, तेजस देवबाले, शुभम हिरळकर, अंकुश भेंडेकर, विजय चिरावंडे, सोनू भाई यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्याची समाजाभिमुख परंपरा जपली जात असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली, तर आकाश कवडे यांच्या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १५५ ■ रविवार, ३ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## चॉकलेटच्या आमिषाने चिमुकलीवर अत्याचार; आरोपीला १५ वर्षांची शिक्षा

**वर्धा जनमाध्यम :** अल्पवयीन चिमुकलीला चॉकलेटचे आमिष दाखवून वारंवार अत्याचार करणाऱ्या आरोपीला हिंगणघाट येथील न्यायालयाने १५ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. या निकालामुळे तब्बल अकरा वर्षांपासून सुरू असलेल्या प्रकरणाला अखेर न्याय मिळाला आहे.

अल्लीपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तळेगाव टालाटुले परिसरात घडलेल्या या घटनेत सुशील भीमराव थुल (वय २८, मूळ रा. वायगाव निपाणी) याने गावातील अल्पवयीन मुलीला चॉकलेटचे आमिष दाखवून स्वतःच्या घरी नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. ही घटना २९ जून २०१५ रोजी उघडकीस आली. आरोपीने पीडितेला धमकी देत कुणालाही सांगू नये, असेही बजावले होते.

# बारावीच्या रणांगणात मुलींचा जलवाःवर्ध्याचा निकाल ८७.५२ टक्के

## -विज्ञान शाखेचा झेंडा उंच; नागपूर विभागात वर्धा चौथ्या स्थानी

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावी परीक्षेचा निकाल जाहीर होताच वर्धा जिल्ह्यात यशाचा जल्लोष उसळला. यंदा जिल्ह्याचा एकूण निकाल ८७. ५२ टक्के लागला असून, मुलींनी पुन्हा एकदा बाजी मारत ९१. ८३ टक्क्यांची भक्कम कामगिरी नोंदवली आहे. तुलनेत मुलांचा निकाल ८३. ३० टक्के राहिला.

नागपूर विभागात वर्ध्याने चौथा क्रमांक पटकावत आपले स्थान मजबूत केले आहे. तालुकानिहाय चित्र पाहता देवळी तालुका ९१.२१ टक्क्यांसह अव्वल ठरला, तर कारंजा तालुक्याचा निकाल ८०.८६ टक्के इतका राहून तो शेवटच्या स्थानी आहे.

संख्यानिहाय निकालात विज्ञान शाखेने पुन्हा आपली छाप उमटवत तब्बल ९५.७६ टक्के निकालासह आघाडी घेतली. निकाल जाहीर होताच विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे.

शैक्षणिक गुणवत्तेचा आलेख उंचावत असताना, वर्ध्याने पुन्हा एकदा 'हुशार जिल्हा' म्हणून आपली ओळख अधोरेखित केली आहे.

### भरत ज्ञान मंदिरम्

**वर्धा :** स्थानिक भरत ज्ञान मंदिरम् कनिष्ठ महाविद्यालयाने बारावीच्या परीक्षेत यंदाही उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली असून एकूण निकाल ९६.६१ टक्के लागला आहे. महाविद्यालयातील ५९ विद्यार्थ्यांपैकी ५७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. यंदाच्या निकालात प्रांजल अरविंद राऊत हिने ८९.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावत यशाचा मानकरी ठरली. हर्ष अनिल नागतोडे याने ८७.१७ टक्के गुणांसह द्वितीय स्थान मिळवले, तर वैष्णवी जगदीश बनकर हिने ८५.८३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या उल्लेखनीय यशाबद्दल विमेन्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माधव एम. पंडित, कार्यवाह अँड. संध्याताई पुरेकर, उपाध्यक्ष मकरंद पाठक यांच्यासह संचालक मंडळाने विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्राचार्या मोनाली सालोडकर, पर्यवेक्षिका जया देशमुख तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांच्या यशात मोलाचा वाटा उचलला असल्याचे गौरवोद्गार काढले.



दीपचंद विद्यालय सेलू



प्रथम क्रमांक
प्रांजल अरविंद राऊत
(८९.६७%)



द्वितीय क्रमांक
हर्ष अनिल नागतोडे
(८७.१७%)



तृतीय क्रमांक
वैष्णवी जगदीश बनकर
(८५.८३%)

### वझुरकर नगर कनिष्ठ महाविद्यालय

**सिंदी (रेल्वे) :** येथील स्व. सौ. रमाबाई वझुरकर नगर कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाची गुणवत्ता अधोरेखित केली. कला व विज्ञान या दोन्ही शाखांतील विद्यार्थ्यांनी घवघवीत कामगिरी नोंदवली आहे.

कला विभागात कु. धनश्री भगवान बावणे हिने ७६.८३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. साजिया परवीन शेख (७०.८३ टक्के) हिने द्वितीय, तर कु. अश्विनी धनराज निमजे (६८.३३ टक्के) हिने तृतीय क्रमांक मिळविला. कु. जानवी निकोडे (६७.०० टक्के) व अंजली चाफले (६०.१७ टक्के) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले. विज्ञान विभागात ओम शैलेशराव वडांद्रे याने ७२.१७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. करण सुनील सोनटक्के (६१.८३ टक्के) द्वितीय, तर तनवी आशिष टेंबरे (५९.०० टक्के) हिने तृतीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल विद्यार्थ्यांनी नगर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व संचालक मंडळ, प्राचार्य, शिक्षक तसेच पालकांचे आभार मानले. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

### दीपचंद चौधरी कनिष्ठ महाविद्यालय

**सेलू :** येथील दीपचंद चौधरी कनिष्ठ महाविद्यालयाने बारावी विज्ञान शाखेच्या परीक्षेत यंदा ९७.८२ टक्के निकाल लावत उल्लेखनीय यश संपादन केले. सलग उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत महाविद्यालयाने गुणवत्तेची छाप पुन्हा अधोरेखित केली आहे. विद्यार्थ्यांच्या यशामुळे परिसरात समाधानाचे वातावरण आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. लक्ष्मी रवींद्र तडस हिने ७७.१७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. कु. लावण्या गजानन रघटाटे (७६.६७ टक्के) हिने द्वितीय, तर कु. संजीवनी संजय वांदिले (७२.५० टक्के) हिने तृतीय क्रमांक पटकावला. या विद्यार्थिनींनी सातत्यपूर्ण अभ्यास आणि मेहनतीच्या जोरावर हे यश मिळविले.

या यशाबद्दल प्राचार्या डॉ. कल्पना मकरंदे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पर्यवेक्षक खंडागळे व मुडे यांनीही कौतुक केले. विभागप्रमुख प्रा. मंगेश वडूरकर यांच्यासह प्रा. मेघा चंदनखेडे, प्रा. कानोजिया, प्रा. गौर, प्रा. डायगव्हाणे व श्री बुधे यांच्या मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाल्याचे सांगण्यात आले. पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची जिद्द यामुळेच हा यशस्वी निकाल लागल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

गांधी विद्यालय, आर्वी




वझुरकर नगर कनिष्ठ महाविद्यालय





### गांधी विद्यालय, आर्वी

**आर्वी :** स्थानिक नगर पालिका संचालित पी.एम. श्री. न.प. माध्यमिक व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय (गांधी विद्यालय), आर्वीचा इयत्ता बारावी (एच.एस.सी. नागपूर मंडळ) निकाल यंदा ९३.७९ टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत महाविद्यालयाच्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली.

या परीक्षेसाठी एकूण १२९ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १२१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. अनुष्का प्रकाश माखीजा हिने ८०.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. अनम कौसर मो. इम्तियाज अन्सारी (७२.१७ टक्के) हिने द्वितीय, तर कु. आयेशा फारुख नागोरी (६९.६७ टक्के) हिने तृतीय क्रमांक मिळविला. या यशाबद्दल नगराध्यक्षा स्वातीताई गुल्हाने, उपाध्यक्ष गौरवभाऊ जाजू, मुख्याधिकारी डॉ. किरण सुकलवाड, प्राचार्य विश्वेश्वर पायले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच पर्यवेक्षिका ज्योती अजमिरे, प्रा. नितीन बोडखे, प्रा. विजय शेंडे, प्रा. प्रशांत जळीत व इतर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मरणालाही अपमानः बोरगावच्या स्मशानभूमीत प्रशासन बेजबाबदार

## -विकासाच्या फसव्या घोषणा; अंत्यसंस्कारासाठी ग्रामस्थांची चिखलात फरफट

### -निधी गेला कुठे ग्रामपंचायतीच्या कारभारावर संताप

**सेलू जनमाध्यम :** एकीकडे 'ग्रामीण विकास'च्या गप्पा रंगवल्या जात असताना, दुसरीकडे बोरगाव येथील स्मशानभूमीची भयावह अवस्था प्रशासनाच्या ढिसाळ आणि निष्क्रिय कारभाराची पोलखोल करत आहे. ज्या ठिकाणी माणसाला अखेरचा सन्मान मिळायला हवा, तिथेच ग्रामस्थांना आज 'मरणयातना' भोगाव्या लागत असल्याने संतापाची लाट उसळली आहे.

सन २०२२-२३ मध्ये लाखो रुपयांचा निधी खर्च करून उभारण्यात आलेली स्मशानभूमी आज अक्षरशः समस्यांच्या दलदलीत अडकली आहे. स्मशानभूमीकडे जाण्यासाठी साधा रस्ताही नसल्याने मृतदेह खांद्यावर घेऊन चिखल आणि काट्याकुट्यांतून मार्ग काढण्याची वेळ ग्रामस्थांवर येते. हा विकास आहे की प्रशासनाचा निर्दयी विनोद, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

स्मशानभूमी परिसरात वाढलेल्या झाडाझुडपांनी अक्षरशः जंगलाचे स्वरूप धारण केले आहे. अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्यांना बसण्यासाठी साधी जागा नसल्याने दुःखाच्या क्षणीही तासनतास उभे राहण्याची वेळ येते. स्वच्छतेच्या बाबतीत ग्रामपंचायतीचा कारभार 'शून्य' असल्याचे उघड चित्र समोर आले आहे. नदीकाठी बांधलेल्या सिमेंटच्या पायऱ्यांवर खर्च झालेला निधी हा तर 'पांढरा हत्ती' ठरत आहे. केवळ राख विसर्जनापुरत्याच उपयोगी पडणाऱ्या या पायऱ्यांमुळे शासकीय पैशांचा उघड अपव्यय झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



ग्रामपंचायत आणि ग्रामसेवकांकडे वारंवार तक्रारी करूनही केवळ आश्वासनांची खैरात वाटली जात आहे. आमचे काम झाले, असे म्हणत जबाबदारी झटकणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे ग्रामस्थांचा संताप अनावर झाला आहे. 'विकासाच्या नावाखाली केवळ दिखावा चाललाय. जिथे माणसाला शेवटचा सन्मान द्यायचा, तिथेच ही दुरवस्था पाहून मन सुन्न होते. प्रशासनाला जाग कधी येणार

**संतप्त ग्रामस्थ, बोरगाव**

ज्या गावात माणसाला सन्मानाने अखेरचा निरोप देता येत नाही, त्या गावाला 'स्मार्ट' म्हणायचे का की एखादी मोठी दुर्घटना घडल्यावरच प्रशासन झोपेतून उठणार

बोरगावची ही स्मशानभूमी केवळ दुर्लक्षाची कहाणी नाही, तर ती मानवी अस्मितेचा अपमान आहे. आता तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी डोळे उघडून ठोस कारवाई केली नाही, तर 'विकास' हा शब्द ग्रामस्थांसाठी कायमचा थट्टेचा विषय ठरेल,'

# चार पत्रिका, एकच तमाशाः नालवाडीत प्रशासनाचा भोंगळ कारभार उघड

## कोणते निमंत्रण अधिकृत नागरिकांमध्ये संभ्रम

**वर्धा जनमाध्यम :** नालवाडी येथे ज्येष्ठ नागरिक कम्युनिटी हॉल व विरंगुळा केंद्राच्या लोकार्पण सोहळ्यापूर्वीच प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा भांडाफोड झाला आहे. दिनांक १ मे २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमासाठी तब्बल चार वेगवेगळ्या निमंत्रण पत्रिका बाहेर पडल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, नेमके अधिकृत निमंत्रण कोणते असा प्रश्न सर्वत्र उपस्थित केला जात आहे.

पहिल्या निमंत्रण पत्रिकेत कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पालकमंत्री, तर उद्घाटक म्हणून माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे नाव देण्यात आले आहे. प्रमुख उपस्थितीत विनय सहस्त्रबुद्धे, मायाताई इवनाते, दादाराव केचे, समीर कुणावार, सुमित वानखेडे, राजेश बकाने यांचा समावेश असून, माजी खासदार रामदास तडस व सुरेश वाघमारे यांचीही नावे झळकली आहेत.




मात्र दुसऱ्या पत्रिकेत थोड्याफार बदलांसह वेगळी यादी समोर आली. यात अध्यक्ष व उद्घाटक पदे तीच ठेवली असली, तरी विशेष उपस्थिती व प्रमुख पाहुण्यांमध्ये खासदार-आमदारांची नावे टाकण्यात आली आहेत. यामुळे पहिल्या पत्रिकेच्या अधिकृततेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. दरम्यान, तिसरी पत्रिका थेट प्रशासनाकडून प्रसिद्ध झाल्याचे सांगितले जात असून, त्यात तर संपूर्ण समीकरणच बदलले आहे. या पत्रिकेनुसार उद्घाटक म्हणून पालकमंत्री, अध्यक्ष म्हणून मायाताई इवनाते, तर प्रमुख उपस्थितीत खासदार अमर काळे व आमदारांची नावे देण्यात आली आहेत. विशेष निमंत्रित म्हणून सुधीर मुनगंटीवार व विनय सहस्त्रबुद्धे यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

यावरच न थांबता, चौथी पत्रिका देखील बाहेर आल्याची चर्चा रंगली आहे. मात्र ती अधिकृतपणे नागरिकांपर्यंत पोहोचलेली नसल्याने गोंधळात आणखी भर पडली आहे. एकाच कार्यक्रमासाठी चार-चार पत्रिका प्रसिद्ध होणे ही बाब प्रशासनातील गंभीर समन्वयअभावाची साक्ष देणारी ठरत आहे.

या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. स्वतःच्या कार्यक्रमाचे नियोजन करता येत नाही, तर जनतेच्या समस्या काय सोडवणार असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. लोकार्पणासारख्या महत्त्वाच्या कार्यक्रमातच असा गोंधळ उडत असेल, नालवाडीतील हा पत्रिका गोंधळ केवळ हास्यास्पद नाही, तर प्रशासनाच्या ढिसाळपणाचा आरसा आहे. तातडीने अधिकृत पत्रिका जाहीर करून संभ्रम दूर करणे आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. अन्यथा, प्रशासनावरील जनतेचा विश्वास पूर्णपणे डळमळीत होईल, यात शंका नाही.

## बाजार चौकात भीषण आग; पानठेला जळून खाक, मोठे नुकसान

**पवनार जनमाध्यम :** येथील गजबजलेल्या बाजार चौक परिसरात शनिवारी सकाळी अचानक लागलेल्या आगीने एकच खळबळ उडवून दिली. सदर शाळेच्या खुल्या जागेत अनेक दिवसांपासून पडून असलेला राजू लाडे यांचा पानठेला काही क्षणातच ज्वाळांच्या भक्ष्यस्थानी सापडून पूर्णपणे जळून खाक झाला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र संबंधिताचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास पानठेल्याच्या परिसरातून धूर निघताना दिसताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. पाहता पाहता आगीने भीषण रूप धारण केले आणि ठेल्यावर ठेवलेले साहित्य, फर्निचर तसेच इतर वस्तू काही क्षणांत भस्मसात झाल्या. वाढत्या आगीमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत पाण्याच्या साहाय्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला. नागरिकांच्या सतर्कतेमुळे आणि वेळीच केलेल्या प्रयत्नांमुळे काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.

## समृद्धी महामार्गावर झोपेच्या डुलकीचा घात; तरुणाचा मृत्यू, दोघे गंभीर

**वर्धा जनमाध्यम :** समृद्धी महामार्गावर वेग आणि निष्काळजीपणामुळे आणखी एक भीषण अपघात घडला असून, या दुर्घटनेत एका २४ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना येळकेळी (जि. वर्धा) परिसरातील नागपूर कॉरिडॉरवर शुक्रवारी सकाळी साडेसातच्या सुमारास घडली.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईहून नागपूरकडे येणारी स्विफ्ट डिझायर (क्र.एम एच ४९ बी झेड ४९६७) ही कार समृद्धी महामार्गावरील चॅनेज क्र. ५२/९०० येथे आली असता चालक वेदांत उर्फ दादू (वय अंदाजे २७, रा. नागपूर) याला झोपेची डुलकी लागली. त्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटून कारने समोरील लेनमध्ये धावणाऱ्या दूधवाहू टँकरला (क्र.एम एच १४ के ए ४३९६) मागून जोरदार धडक दिली. या अपघातात समोरील सीटवर बसलेले प्रज्वल मंगेश मेश्राम (वय २४, रा. नागपूर) यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची तीव्रता इतकी होती की कारचा पुढील भाग पूर्णपणे चेंगरून गेला. चालक वेदांत उर्फ दादू याला छातीवर गंभीर दुखापत झाली असून स्नेहा संजू रंगारी (वय २५) हिला देखील गंभीर जखमा झाल्या आहेत. दोघांवर सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, कारमधील अन्य प्रवासी ओम नागोसे (वय २६) व दुर्गेश हनुमंते (वय २१) हे अपघातातून सुदैवाने बचावले. अपघाताची माहिती मिळताच सावंगी पोलीस ठाण्याचे पीएसआय प्रमोद धोटे व पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना तत्काळ रुग्णालयात हलवून मदतकार्य केले. अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. मात्र, क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहन बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. मृतदेह पुढील तपासणीसाठी वर्धा जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या घटनेमुळे समृद्धी महामार्गावरील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. दीर्घ प्रवासात चालकांनी पुरेशी विश्रांती घेणे आणि वेगावर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. पुढील तपास सावंगी पोलीस करीत आहेत.

## पैशाच्या वादातून जीवघेणा हल्ला सकाळी 'अपघात'चा बनाव; आरोपींचा धक्कादायक डाव

**तळेगाव जनमाध्यम :** जागेच्या व्यवहारातून निर्माण झालेल्या वैरातून पतीवर जीवघेणा हल्ला करून त्याला अपघाताचा बनाव देण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार तळेगाव परिसरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी निशा नितेश काकडे यांच्या तक्रारीवरून मनिष पुरुषोत्तम रावलानी (वय अंदाजे ३०, रा. आर्वी) व त्याचे तीन ते चार अज्ञात साथीदारांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, काकडे कुटुंबाने काही महिन्यांपूर्वी त्यांची जुनी मालमत्ता सुमारे ५० लाख रुपयांत रावलानी यास विकली होती. त्यापैकी ४० लाख रुपये देण्यात आले होते, मात्र उर्वरित १० लाख रुपयांवरून वाद निर्माण झाला.

# विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीमध्ये नारीशक्तीचा सहभाग महत्त्वाचा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे आज उद्घाटन

**मुंबई जनमाध्यम :** देशाच्या प्रगतीचा खरा पाया हा नारीशक्तीच्या सहभागात दडलेला आहे, असे ठाम प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील एमएमआरडीए मैदानावर आयोजित महालक्ष्मी सरस प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



महिला केवळ कुटुंबाचा आधार नाही, तर देशाच्या अर्थव्यवस्थेची खरी शक्ती आहे. महिलांचा सहभाग वाढल्याशिवाय विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही, असे स्पष्ट करत त्यांनी राज्यात एक कोटी 'लखपती दीदी' निर्माण करण्याचा संकल्प व्यक्त केला.

राज्यात 'उमेद' योजनेच्या माध्यमातून महिला बचत गटांची मोठी चळवळ उभी राहिली आहे. सध्या ६.६८ लाख बचत गट कार्यरत असून ६४ लाख कुटुंबांना याचा थेट लाभ झाला आहे. महिलांच्या आर्थिक प्रामाणिकतेचे उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, महिलांना दिलेल्या कर्जाचा एनपीए १ टक्क्यांपेक्षा कमी आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.

डिजिटल युगाशी सुसंगत पाऊल टाकत 'उमेद मार्ट' या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर १००० हून अधिक उत्पादने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ग्रामीण भागातील महिलांनी तयार केलेल्या वस्तूंना आता ऑनलाइन बाजारपेठ मिळत असून नागरिकांनी या माध्यमातून खरेदी करून महिला सक्षमीकरणाला चालना द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

महालक्ष्मी सरस प्रदर्शन हे महिला उद्योजिकांसाठी मोठे व्यासपीठ ठरत आहे. हस्तकला, अन्नप्रक्रिया, पॅकेजिंग अशा विविध क्षेत्रातील उत्पादने येथे सादर करण्यात आली असून महिलांची गुणवत्ता आणि व्यावसायिकता अधोरेखित होत आहे. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते. प्रदर्शनातील स्टॉलना भेट देत मुख्यमंत्र्यांनी महिला उद्योजिकांशी संवाद साधला. कार्यक्रमादरम्यान 'उमेद'च्या ६८ यशकथांवर आधारित पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. राज्यभरातून मोठ्या संख्येने महिला उपस्थित राहिल्याने हा सोहळा नारीशक्तीच्या सामर्थ्याचा जिवंत उत्सव ठरला.

## मोहिनी गोंधळे यांचे निधन



**वर्धाः** स्थानिक त्रिमूर्ती नगर येथील मोहिनी मोहनराव गोंधळे यांचे २ मे रोजी शनिवारी सकाळी ८ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. त्या ६६ वर्षाच्या होत्या. त्यांच्यावर स्थानिक हिंदू स्माशानभुमित अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, दोन मुली असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

## पियूष जैन यांचे निधन



**वर्धा :** पत्रकार व संपादक दिलीप जैन यांचा सुपुत्र पियूष उर्फ गोलू दिलीप जैन (वय ४०) यांचे दीर्घ आजाराने सावंगी येथील रुग्णालयात दि. २ मे रोजी सकाळी ११ वाजता निधन झाले. पियूष जैन हे मागील काही दिवसांपासून आजारी होते. त्यांच्यावर उपचार सुरू होते; मात्र प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी व भाऊ असा आप्तपरिवार आहे. स्थानिक हिंदू स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

जनमाध्यम
e paper - www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठीत सवय
■ रविवार ३ मे २०२६

# नसरापूरमध्ये साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून हत्या

## 65 वर्षीय नराधमाला अटक



**पुणे/प्रतिनिधी-** शिक्षणाचे माहेर घर म्हणून ओळखल्या जाणा-या पुणे जिल्ह्यात दिवसेंदिवस धक्कादायक घटना घडत असल्याचे समोर आले आहे. नसरापूर परिसरात माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक घटना समोर आली आहे. एका ६५ वर्षीय नराधमाने साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केली.या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, पोलिसांनी अवघ्या दीड तासात आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना काल १ मे रोजी दुपारी साडेतीन ते चार वाजेच्या सुमारास घडली. मुलगी बेपत्ता झाल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी शोध सुरू केला. दुपारी ४:३० वाजता पोलिसांकडे तक्रार प्राप्त झाली आणि ५:१५ च्या सुमारास पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवली. पोलिसांनी अत्यंत वेगाने हालचाली करत अवघ्या दीड तासात आरोपीला ताब्यात घेतले. नरसापूर येथील चिमुरडीवर अत्याचार आणि तिची निर्घृण हत्येने सर्वच हादरले. ६५ वर्षांच्या विकृताला पोलिसांना तातडीने अटक केली. पण या घटनेने लोकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. काल ग्रामस्थांनी रास्ता रोको केला होता. २ मे रोजी गावक-यांना मोर्चा काढला. या मोर्चाचे रुपांतर आंदोलनात झाले असून आरोपीला ताब्यात द्या, त्याला फाशी द्या या मागणीसाठी ठिय्या आंदोलन सुरू आहे. पोलीस आंदोलकांची समजूत काढत आहे. या घटनेने गावात तणाव वाढला आहे. गावक-यांनी बाजारपेठ बंद ठेवली आहे.

**मृतदेह शेणाच्या ढिगा-याखाली लपवला-** स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित चिमुरडी आपल्या आजीच्या घरी उन्हाळ्याची सुट्टी घालवण्यासाठी आली होती. घरासमोर खेळत असताना, गावातील एका ६५ वर्षीय वृद्धाने तिला आमिष दाखवून गोठ्यात नेले. तिथे तिच्यावर अनन्वित लैंगिक अत्याचार केल्यानंतर, नराधमाने तिची दगडाने ठेचून अत्यंत क्रूरपणे हत्या केली. एवढ्यावरच न थांबता, पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याने चिमुरडीचा मृतदेह गोठ्यातील शेणाच्या ढिगा-याखाली दाबून ठेवला. दुपारच्या सुमारास मुलगी अचानक दिसेनाशी झाल्याने कुटुंबीयांनी तिची शोधाशोध सुरू केली. बराच वेळ शोध घेतल्यानंतर अखेर गोठ्यात तिचा मृतदेह आढळला. या धक्कादायक प्रकारानंतर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले, तेव्हा आरोपी त्या चिमुरडीला गोठ्याच्या दिशेने घेउन जाताना स्पष्टपणे दिसला आणि या भयानक कृत्याचा पर्दाफाश झाला.

**मृतदेह पोलीस ठाण्याबाहेर ठेवून ग्रामस्थांचा रास्ता रोको**

या घटनेची माहिती मिळताच संपूर्ण गाव संतप्त झाले. संतप्त ग्रामस्थांनी आणि पीडितेच्या नातेवाईकांनी चिमुरडीचा मृतदेह थेट स्थानिक पोलीस ठाण्याच्या बाहेर आणून ठेवला आणि तिथेच ठिय्या मांडला. आरोपीला तात्काळ आमच्या स्वाधीन करा, अशी आक्रमक मागणी करत ग्रामस्थांनी तीव्र निदर्शने केली आणि महामार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरू केले.घटनेचे गांभीर्य लक्षात घेउन पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल यांनी स्वतः घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी आंदोलक ग्रामस्थांशी चर्चा करून त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. आरोपीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करून त्याला फाशीची शिक्षा मिळवून देण्यासाठी पोलीस सर्वतोपरी प्रयत्न करतील, असे ठोस आश्वासन त्यांनी दिले. पोलीस अधीक्षकांच्या या आश्वासनानंतर ग्रामस्थांनी आपले रास्ता रोको आंदोलन तात्पुरते मागे घेतले.

**सीसीटीव्ही फुटेज समोर येताच कुटुंबीयांवर कोसळला दुःखाचा डोंगर-**

पीडित मुलगी उन्हाळ्याच्या सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी आपल्या आजीच्या गावी आली होती. आपल्या मुलीसोबत असा काही अघोरी प्रकार घडेल, याची पुसटशी कल्पनाही तिच्या कुटुंबीयांना नव्हती. दुपारच्या सुमारास मुलगी अचानक बेपत्ता झाली. तिचा शोध घेत असतानाच, दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास परिसरातील सीसीटीव्ही फुटेज समोर आले. या फुटेजमध्ये नराधम आरोपी त्या चिमुरडीला फुसलावून गोठ्याकडे घेउन जाताना स्पष्टपणे दिसला. हे भीषण सत्य समोर येताच मुलीच्या कुटुंबीयांच्या पायाखालची जमीनच सरकली. यानंतर पीडितेची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे उघड झाले.

## अतिशय निंदनीय, दुःखद घटना; मुख्यमंत्री फडणवीस संतापले

**मुंबई/प्रतिनिधी-** तीन-साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर ६५ वर्षीय व्यक्तीने अत्याचार करून तिचा खूनही केला आहे. आरोपीला अटक झालेली आहे. आरोपीचे जुने संदर्भ देखील दिसत आहेत. एकूणच या घटनेतून समाजात रोष आहे. मुलगी आणि कुटुंबाबद्दल हळहळ व्यक्त होत आहे. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त करत ही घटना अत्यंत निंदनीय व दुःखद असल्याची टीका केली आहे.

भोर तालुक्यातील नसरापूर येथे तीन ते चार वर्षांच्या दरम्यान असलेल्या बालिकेचा अत्याचार करून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी उघडकीस आली. याप्रकरणी राजगड पोलिसांनी एका ६५ वर्षीय आरोपीला ताब्यात घेतले आहे. चार वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा खून केल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. शुक्रवारी पुणे-सातारा महामार्गावर आंदोलन करण्यात आले होते. तर, शनिवारी (२ मे) रोजीही आरोपीला फाशी व्हावी, या मागणीसाठी नागरिकांनी मोर्चा काढला होता.



याप्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले आहे. ते माध्यमांशी संवाद साधत होते. हे प्रकरण फास्ट स्ट्रॅक कोर्टात घेउन जाउ. स्पेशल फास्ट स्ट्रॅक कोर्ट तयार करायला उच्च न्यायालयालाच विनंती करू . कमीत कमी वेळात नराधमाला मृत्युदंडाची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी आम्ही न्यायालयाकडे करणार आहोत, असे फडणवीसांनी सांगितले. राज्यात महिला असुरक्षित आहेत, अशी टीका विरोधकांकडून केली जात आहे. याबद्दल प्रश्न विचारल्यावर फडणवीसांनी म्हटले, प्रत्येक गोष्टीत राजकारण करू नये. काही गोष्टीत संवेदना बाळगली पाहिजे. ज्या काही गोष्टी करायच्या आहेत, त्या सरकार नक्की करेल.

६५ वर्षीय आरोपीने घरासमोर खेळणा-या चिमुकलीला गोठ्यात नेउन तिच्यावर अत्याचार केला. नंतर तिला दगडाने ठेचून संपवले. तिचा मृतदेह शेणाच्या ढिगा-याखाली झाकून ठेवण्यात आला. दुपारी चिमुकली न दिसल्याने तिचा शोध सुरू झाला. तेव्हा, चिमुकली गोठ्यात मृत अवस्थेत आढळून आली. त्यानंतर परिसरातील सीसीटीव्हीची तपासणी केल्यावर आरोपी चिमुकलीला गोठ्याच्या दिशेने घेउन जाताना दिसला. ही चिमुकली आजीच्या घरी सुटीला आली होती, अशी माहिती मिळत आहे.

## नसरापूर प्रकरण: आरोपीला फाशी द्या..!

### ■ नवले पुलावर हजारोंचा एल्गार ■ मुंबई-बंगळुरू हायवे ठप्प



**पुणे/प्रतिनिधी-** भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात साडेतीन वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आल्यावर मृत बालिकेचा मृतदेह घेउन आलेली रुगणवाहिका नवले पुलाजवळ पोहोचताच संतप्त नागरिक मोठ्या संख्येने महामार्गावर उतरले. मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील स्वरणा हाटेलसमोरील रस्ता दोन्ही बाजूंनी बंद करण्यात आला. आंदोलकांनी आरोपीला फाशी द्या, बाळाला न्याय मिळाल्याशिवाय रस्ता मोकळा होणार नाही अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घटनास्थळी यावे, अशी मागणीही आंदोलकांकडून करण्यात आली. दरम्यान, रास्ता रोकोमुळे मुंबईकडून साता-याकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. सिंहगड रस्त्याकडून नवले पुलाच्या दिशेने जाणारा मार्ग पोलिसांनी बॅरिकेड्स लावून बंद केला. त्यामुळे परिसरात मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली असून, वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. आंदोलकांना शांत करण्याचे प्रयत्न प्रशासनाकडून सुरू आहेत.

**आरोपीविरोधात कठोर कारवाईची मागणी-** घटनेनंतर परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. बालिकेच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी कठोर कायदे आणि जलद न्यायप्रक्रियेची मागणीही ग्रामस्थांनी केली आहे.

## आमची सुरक्षा करता येत नसेल तर लाडकी बहीण योजनेचे पैसे देउन काय ऊपयोग

### चिमुरडीच्या मृत्यूनंतर भोरमधील महिला संतापल्या

**पुणे/प्रतिनिधी-** आमची सुरक्षितता सरकार बाळगत नसेल तर लाडकी बहीण देउन उपयोग काय? असा संतप्त प्रश्न नसरापूर गावातल्या महिलांनी उपस्थित केला आहे. ज्या चिमुकलीसोबत हे अमानवी, राक्षसी कृत्य केलं तिला आम्ही खेळताना, बागडताना बघितलं आहे. त्या नराधमाला आमच्या समोर आणा, त्याला फाशिचीच शिक्षा द्या, अशी आग्रही मागणीही पुण्यातील भोर तालुक्यातील नसरापूर गावातल्या महिलांनी केली आहे






**आम्ही त्या चिमुरडी खेळताना, बागडताना बघितलं-**पुण्यातील भोर परिसरात एका चार वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करुन तिची निर्घृण हत्या करण्याचा अमानवी आणि संतापजनक घटना उजेडात आली आहे. यातील मृत अल्पवयीन मुलगी नसरापूरला तिच्या आजीकडे उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आली होती. त्यावेळी एका नराधमाने तिला जवळच असलेल्या गुरांच्या गोठ्यात नेउन तिच्यावर अमानुषपणे अत्याचार केला, आणि त्यानंतर तिची हत्या करण्यात आली. या घटनेनंतर गावक-यांनी संशयित व्यक्तीला पकडले असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. मात्र, या व्यक्तीने आपण मुलीवर अत्याचार केल्याची बाब नाकारली आहे. दरम्यान, या घटनेनंतर शुक्रवार रात्री नसरापूर येथील वातावरण तापले होते. एकंदरीत या प्रकरणाने राज्यात खळबळ उडाली असून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागली आहे.भोर तालुक्यातील नसरापूर गावात साडेतीन वर्षाच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली आणि त्यानंतर आज गावात कडकडीत बंद पुकारण्यात आला आहे. ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे आणि सोबतच या नराधनाला फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. असे नसेल होत तर तर त्या नराधमाला आमच्या हाती द्या, आम्ही त्यांचं काय करायचं ते बघू, असं म्हणत ग्रामस्थांनी घटनेवर संताप व्यक्त केला आहे.

**वासरू दाखवतो म्हणून हात धरून चिमुकलीला गोठ्यात नेलं-**नराधम आरोपीने वासरू दाखवतो म्हणून हात धरून चिमुकलीला गोठ्यात नेलं आणि तिच्यावर अत्याचार केला. आजीकडे उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आलेल्या या मुलीच्या कुटुंबीयांनी आपल्याच मुली सोबत असं कधी घडेल असा विचारही केला नव्हता मात्र साडेतीन वाजताच ते सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आणि अख्ख कुटुंब हादरलं. या घटनेनंतर गावक-यांनी संताप व्यक्त करत पोलिसांना घेराव घातली, रात्री उशीरापर्यंत पोलिसांनी गावक-यांची समजूत काढली, त्यानंतर गावक-यांनी मोर्चा मागे घेतला, पण आज या अत्याचाराचा विरोधात ग्रामस्थांचा मोर्चा सुरू झाला आहे. गावातील भैरवनाथ मंदिराजवळ हा मोर्चा सुरू झाला.

## पुणे पुन्हा हादरले! नसरापूरनंतर चाकणमध्ये ३ वर्षांच्या बालकावर अत्याचार करून हत्या; मृतदेह सुटकेसमध्ये

**पुणे/प्रतिनिधी-** नसरापूर येथील चिमुकलीच्या तिच्या घटनेने सबंध महाराष्ट्र हळहळत असतानाच, पुण्यातील चाकण औद्योगिक पट्ट्यातील दक्षिण महाळुंगे परिसरातून काळजाचा थरकाप उडवणारी घटना समोर आली आहे. एका अवघ्या तीन वर्षांच्या निष्पाप बालकावर अनैसर्गिक अत्याचार करून त्याची निर्घृण हत्या करण्यात आली. तसेच पुराव्यांची विल्हेवाट लावण्यासाठी आरोपीने मृतदेह सुटकेसमध्ये भरून ठेवल्याचे उघड झाले आहे. यावरून आता पुण्यात एकच खळबळ उडाली असून आता संतापाची लाट उसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित बालक घरातून बेपत्ता झाल्यापासून त्याचे कुटुंबीय त्याचा शोध घेत होते. दरम्यान, दक्षिण महाळुंगे येथील एका निर्जन ठिकाणी या बालकाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला. अज्ञात नराधमाने बालकावर प्रथम अनैसर्गिक अत्याचार केले आणि त्यानंतर गळा चिरून त्याची अत्यंत क्रूरपणे हत्या केली. घटनेची माहिती मिळताच महाळुंगे आणि चाकण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या पोलीस उपायुक्त श्वेता खेडकर यांनी तपासाच्या सूचना दिल्या. तांत्रिक पुरावे आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी अवघ्या काही तासांत बिहार राज्यात पळून जाण्याच्या तयारीत असतानाच आरोपीच्या मुसक्या आवळल्या.महाळुंगे दक्षिण पोलिसांनी त्याला ताब्यात घेतला आहे. आरोपी हा देखील १६ वर्षीय अल्पवयीन मुलगा असून तो मूळचा बिहारचा असल्याचं सांगितलं जात आहे. तसेच पीडित बालकाचे कुटुंब देखील मूळचे मध्य प्रदेशातल्या असून ते या ठिकाणी कामानिमित्त आले होते. या गंभीर घटनेचा पोलीस प्रशासनाकडून सखोल तपास सुरू आहे. तपासासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली होती. तांत्रिक आणि परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारे आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. दरम्यान औद्योगिक पट्ट्यात घडलेल्या या कृत्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. अशा विकृत मानसिकतेच्या गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी सर्वस्तरातून होत आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## टीसीएस प्रकरणातील निदा खानचा अटकपूर्व जामीन फेटाळला




**नाशिक/प्रतिनिधी-**येथील बहुराष्ट्रीय नामांकित टीसीएस (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस) आयटी कंपनीतील महिला कर्मचा-यांच्या लैंगिक शोषण व धर्मांतराचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यातील संशयित निदा खान हिचा अटकपूर्व जामीन अर्ज नाशिकरोड सत्र न्यायालयाने फेटाळून लावल्याने तिच्यासमोरील अडचणी वाढल्या आहेत. दरम्यान, निदा खान हिने मुंबई उच्च न्यायालयात दाद मागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नाशिकरोड सत्र न्यायालयाचे न्या. केदार जोशी यांनी गुन्ह्यातील गांभीर्य लक्षात घेत दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर राखून ठेवलेला निकाल शनिवारी (दि. २) जाहीर केला. त्यानुसार अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर करण्यात आला.टीसीएस कंपनीतील पीडित महिलेच्या तक्रारीवरून देवळाली कॅम्प पोलिस ठाण्यात बलात्कार, धर्मांतराचा प्रयत्न आणि ॲट्रोसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात संशयित दानिश शेख आणि तौसिफ अत्तार यांना अटक करण्यात आली असून ते सध्या मुंबई नाका पोलिस ठाण्यातील गुन्ह्यात एसआयटीच्या ताब्यात आहेत.तर मुख्य संशयित निदा खान गेल्या महिनाभरापासून पसार असून ती अद्याप पोलिसांच्या हाती लागलेली नाही.सरकारी पक्षातर्फे विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी युक्तिवाद करताना निदा खान हिचा प्रत्यक्ष सहभाग असल्याचे पुरावे असल्याचे सांगितले. तिच्या चौकशीशिवाय तपास पूर्ण होउ शकत नाही, त्यामुळे अटक आवश्यक असल्याचे त्यांनी न्यायालयात मांडले.

तर बचाव पक्षाचे वकील राहुल कासलीवाल यांनी महाराष्ट्रात धर्मांतरविरोधी कायदा नसल्याचा युक्तिवाद करत तसेच संशयित गरोदर असल्याने तिच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अटकपूर्व जामीन मंजूर करण्याची मागणी केली होती. या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथक (SIT) करत असून, दानिश शेखचा मोबाइल व लॅपटाप जप्त करून त्यातील माहिती व पासवर्ड उघडण्यात आले आहेत. त्यातून महत्त्वाचे पुरावे मिळाल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.दरम्यान, या प्रकरणात अटक करण्यात आलेले तौसिफ बिलाल अत्तार, दानिश एजाज शेख, शाहरुख हुसेन शौकत कुरेशी आणि रझा रफीक मेमन या चौघांच्या पोलिस कोठडीत न्यायालयाने ४ मेपर्यंत वाढ केली आहे.

## बागेश्वर बाबांच्या कृतीमुळे नवा वाद; शिवप्रेमी झाले आक्रमक

**नागपूर/प्रतिनिधी-** आपल्या वादग्रस्त विधानांमुळे आणि वर्तनामुळे नेहमीच प्रसारमाध्यमांच्या केंद्रस्थानी असणारे बागेश्वर धामचे प्रमुख धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा पुन्हा एकदा एका गंभीर वादात सापडले आहेत. भंडारा जिल्ह्यातील मोहाडी येथे एका धार्मिक कार्यक्रमासाठी आले असताना, त्यांच्या ताफ्यातील एका आलिशान वाहनात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा अत्यंत चुकीच्या पद्धतीने म्हणजेच उलटी ठेवल्याचे छायाचित्रे सोशल मीडियावर प्रसारित झाली आहेत. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर संपूर्ण राज्यातील शिवप्रेमींमध्ये संतापाची तीव्र लाट उसळली असून, बागेश्वर बाबांवर चहूबाजूंनी टीकेची झोड उठत आहे.

**मोहाडी येथील कार्यक्रमादरम्यान घडला प्रकार-** मिळालेल्या माहितीनुसार, बागेश्वर बाबा भंडारा जिल्ह्यातील मोहाडी येथे एका सत्संग सोहळ्यासाठी आले होते. या दौ-यादरम्यान त्यांच्या ताफ्यातील एका आलिशान गाडीच्या दर्शनी भागात (डॅशबोर्डवर) छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा उलटी ठेवण्यात आल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आले. या घटनेचे छायाचित्र समाजमाध्यमांवर वा-यासारखे पसरले आणि त्यानंतर संपूर्ण परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. शिवरायांच्या प्रतिमेचा अशा प्रकारे अनादर झाल्याने शिवप्रेमींनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

**वादग्रस्त विधानांची पार्श्वभूमी आणि आंदोलने-**बागेश्वर बाबा वादात सापडण्याची ही पहिलीच वेळ नाही.अवघ्या काही दिवसांपूर्वीच त्यांनी नागपूर येथील एका कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल बोलताना अत्यंत वादग्रस्त आणि ऐतिहासिकदृष्ट्या चुकीचे विधान केले होते. त्या विधानानंतर संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र पडसाद उमटले होते आणि विविध राजकीय व सामाजिक संघटनांनी त्यांच्याविरोधात निदर्शने केली होती. त्या प्रकरणाची शाई अद्याप वाळत नाही, तोच आता थेट महाराजांच्या प्रतिमेचा अशा प्रकारे अनादर झाल्याने राज्यातील शिवभक्तअधिकच आक्रमक झाले आहेत. शिवप्रेमी आणि राजकीय स्तरावरून तीव्र संताप; गुन्हा दाखल करण्याची मागणी-छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा अनादर झाल्याच्या भावनेतून विविध शिवप्रेमी संघटनांनी बागेश्वर बाबांचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे. ज्या छत्रपती शिवरायांनी अठरापगड जातींना एकत्र करून हिंदवी स्वराज्य स्थापन केले, त्यांच्या प्रतिमेची साधी काळजी घेता येत नसेल, तर हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा घोर अपमान आहे, अशा संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहेत. भंडारा जिल्ह्यात बागेश्वर बाबांच्या दौ-यात शिवरायांच्या



**प्रतिमेचा अवमान; गाडीत उलटी प्रतिमा ठेवल्याने शिवप्रेमींमध्ये तीव्र संताप-**आपल्या वादग्रस्त विधानांमुळे नेहमीच वादाच्या भोव-यात सापडणारे बागेश्वर धामचे प्रमुख धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांच्या भंडारा दौ-यात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. भंडारा जिल्ह्यातील मोहाडी येथे आयोजित एका सत्संग सोहळ्यासाठी बागेश्वर बाबा आले असताना, त्यांच्या ताफ्यातील एका महागड्या आलिशान वाहनातील छायाचित्र समोर आले आहे. या छायाचित्रात वाहनाच्या दर्शनी भागात म्हणजेच डॅशबोर्डवर महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा अत्यंत चुकीच्या आणि अवमानकारक पद्धतीने, म्हणजेच चक्क उलटी (शीर्षासन स्थितीत) ठेवल्याचे स्पष्ट दिसत आहे. हा गंभीर प्रकार उघडकीस आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे.

**सोशल मीडियावर छायाचित्र व्हायरल; वादाला तोंड-**मिळालेल्या माहितीनुसार, मोहाडी येथील कार्यक्रमादरम्यान बागेश्वर बाबांच्या ताफ्यातील एका वाहनाचा हा फोटो काही सजग नागरिकांनी आणि शिवभक्तांनी आपल्या कॅमे-यात कैद केला.

**अनादराचा प्रकार:** या छायाचित्रात छत्रपती शिवरायांची प्रतिमा डॅशबोर्डवर उलटी ठेवलेली दिसत असून, हा महाराजांच्या सन्मानाला ठेच पोहचवणारा प्रकार असल्याचे बोलले जात आहे. हे छायाचित्र समाजमाध्यमांवर वा-यासारखे पसरले आणि त्यानंतर राज्यभरातून बागेश्वर बाबांच्या विरोधात संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या. शिवरायांच्या प्रतिमेचा अशा प्रकारे घोर अनादर केल्यामुळे शिवप्रेमी संघटनांनी यावर तीव्र आक्षेप घेतला आहे.

**शिवभक्तांच्या भावना दुखावल्या; जाहीर माफीची मागणी-**महाराष्ट्राच्या अस्मितेचे सर्वोच्च प्रतीक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा असा अवमान शिवभक्त कधीही सहन करणार नाहीत, अशा भावना विविध सामाजिक आणि राजकीय स्तरातून व्यक्त केल्या जात आहेत.

**महाराष्ट्राच्या अस्मितेला वारंवार ठेच;**बागेश्वर बाबांच्या जुन्या वादग्रस्त विधानांनंतर आता प्रतिमेच्या अवमानामुळे शिवप्रेमी अधिक आक्रमक- आपल्या वादग्रस्त विधानांमुळे आणि वर्तनामुळे नेहमीच चर्चेत राहणारे बागेश्वर धामचे प्रमुख धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांच्या कारभारावरून महाराष्ट्रात पुन्हा एकदा रणकंदन माजले आहे. बागेश्वर बाबा गंभीर वादात सापडण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी देखील त्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी वादग्रस्त आणि चुकीची विधाने केली होती, ज्यावरून संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली होती. त्या जुन्या प्रकरणाचे पडसाद अद्याप शांत झालेले नसतानाच, आता थेट शिवरायांच्या प्रतिमेचा अनादर झाल्याचे उघडकीस आल्याने शिवप्रेमींचा संताप अनावर झाला असून ते अत्यंत आक्रमक झाले आहेत. काही महिन्यांपूर्वी बागेश्वर बाबांनी एका जाहीर कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल बोलताना ऐतिहासिक तथ्यांची मोडतोड करत अत्यंत आक्षेपार्ह वक्तव्य केले होते.

**जुना वाद शमला नाही, तोच नवा धक्का-**

जुन्या वादग्रस्त विधानाचा रोष अद्याप पूर्णपणे शांत झालेला नसताना, भंडारा जिल्ह्यातील मोहाडी येथील ताज्या घटनेने आगीत तेल ओतण्याचे काम केले आहे. बागेश्वर बाबांच्या दौ-यातील आलिशान वाहनात छत्रपती शिवरायांची प्रतिमा चक्क उलटी ठेवल्याचे छायाचित्र समोर आल्यामुळे शिवभक्तांच्या भावना पुन्हा एकदा दुखावल्या गेल्या आहेत.

## पतीच्या रागात आईने 4 चिमुकल्यांना विटेने ठेचून केले ठार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**उत्तर प्रदेशातील अंबेडकरनगर जिल्ह्यातून एक अत्यंत खळबळजनक अन् अंगावर शहारा आणणारी घटना समोर आली आहे. एका मातेने आपल्याच चार चिमुकल्यांना विटेने ठेचून ठार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या कृत यानंतर आरोपी महिला फरार



झाली आहे. पोलीस तिचा शोध घेत आहेत. शनिवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास मीरानपूर मोहल्ल्यातील एका घरातून ही घटना समोर आली.

**पतीच्या दुस-या निकाहचा राग मुलांवर काढला -**

प्राथमिक पोलीस तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, या महिलेचा पती नियाज, हा गेल्या काही वर्षांपासून सौदी अरेबियामध्ये नोकरी करतो. त्याने तेथेच एका पाकिस्तानी महिलेशी दुसरा निकाह (लग्न) केला. यासंदर्भात माहिती मिळताच, संबंधित महिलेला मोठा धक्का बसला आणि मानसिक तणावात गेली. याच वैफल्यातून तिने आपल्या पोटच्या चार मुलांची ठेचून हत्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

**चिमुकल्यांचे मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात -** घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. घराचा दरवाजा आतून बंद होता, तो उघडल्यानंतर, बेडवर चारही मुले रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती. शफीक, सउद, उमर आणि मुलगी बयान, अशी या चार चिमुकल्यांची नावे आहेत. यासंदर्भात, पोलीस अधीक्षक प्राची सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मृत मुलांचे वय १४, १२, १० आणि ८ वर्षे होते. घटनेची माहिती मिळताच फॉरेन्सिक टीम घटनास्थळी दाखल झाली असून पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. ३५ वर्षीय आरोपी महिलेच्या अटकेसाठी पोलिसांनी पथके तयार केली असून, तिचा शोध घेतला जात आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## बिनविरोध शिलेदार

महाराष्ट्र विधान परिषदेच्या नऊ जागांची निवडणूक अखेर सहमतीने बिनविरोध झाली. सहमतीसाठी सगळ्या पक्षांचे नेते एकत्र बसले आणि त्यातून त्यांनी सहमती घडवली, असे झाले नाही. कॅरमच्या खेळात पटावरच्या आपल्याच सोंगट्या 'खिशा'त ढकलण्यासाठी जशा समोरच्याच्या सोंगट्यांना धक्का द्यावा लागतो, त्यांची मदत घ्यावी लागते, तशी मदत घेऊन; पण कुठलाही कटू डाव न खेळता ही निवडणूक बरोबरीत सुटली, असे म्हणता येईल. उदाहरणार्थ, काँग्रेसने उबाठाचे उमेदवार म्हणून अंबादास दानवे यांना न स्वीकारता आपला उमेदवार दिला असता, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजितदादा गटानेही आपल्या अधिकृत उमेदवाराशिवाय आणखी एक उमेदवार अपक्ष म्हणून देण्याची तयारी ठेवली होती. पण, काँग्रेसमधल्या निर्णय प्रक्रियेत एकवाक्यता आणण्याची किमया उबाठाकडून झाली आणि त्यामुळे पुढची लढाई टळली. अर्ज दाखल करण्याच्या मुदतीत जेवढ्या जागा, तेवढेच अर्ज दाखल झाल्याने निवडणूक बिनविरोध झाली. अर्थात् या 'बिनविरोध'च्या टप्प्यापर्यंत पोहोचायला प्रत्येक पक्षात मोठ्या नाट्यमय घटना घडल्या. तीव्र स्पर्धेतून पुढे जाण्यासाठी उमेदवारांनी नेत्यांपुढे अनेक पर्याय ठेवले. त्यात गोडीगुलाबीपासून इशारे दमबाजीपर्यंत सगळं काही झाले. आपल्या केल्या, न केल्या कार्याची उजळणी झाली आणि स्वामिनिष्ठेच्या प्रासंगिक याद्याही देऊन झाल्या! इच्छुकांची मांदियाळी झाल्याने नेत्यांसाठी हा खरोखर कसोटीचा काळ होता, सगळ्या नेत्यांनी आपसात न बोलूनही सहमती घडवल्याने उमेदवारांना इकडून तिकडे जाणंही ऐनवेळी नाही अशक्य होते. त्यामुळे, आता ज्यांची संधी गेली, ती गेली. संधी न मिळालेले हे नाराज यानंतर काय करतात ते येत्या महिनाभरात कळेल. भारतीय जनता पक्षाला ही भीती नाही. कारण सध्या सरकार हाती असल्याने, चालत्या गाडीतून उडी मारण्याचे धाडस कोणी करणार नाही. आपल्याकडून उमेदवारी देतानाही या पक्षाने सुनील कर्जतकर यांच्यासारख्या हाडाच्या संघटकाला न्याय दिला. विवेक कोल्हे हे नांव महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रातून, विशेषतः साखर पट्ट्यातून, अहिल्यानगर जिल्ह्यातून निवडले. विधानसभा निवडणुकीवेळी दिलेला शब्द पाळला. माधवी नाईक या पक्षाच्या ठाण्यातील ज्येष्ठ नगरसेवक, चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व. ठाण्यात पक्षाचा आणखी एक आमदार वाढवून पक्षाची तिथली आगामी वाटचालच त्यातून जाहीर झाली. प्रमोद जठार यांची निवड तळकोकणातून, तर संजय भेंडे यांची निवड विदर्भातून झाली. प्रादेशिक आणि पक्षांतर्गत प्रभावी गटांचा समतोल त्यातून साधला गेला. उबाठातून उमेदवारी कोणाची? याची चर्चा राज्यसभेच्या निवडणुकीपासूनच सुरू झाली होती. शरद पवार यांच्या नांवासाठी खासदार सुप्रिया सुळे यांनी कंबर कसली, तेव्हा त्याला काँग्रेस आणि उबाठा या दोन्ही पक्षांतून सहमती नव्हती. या दोन्ही पक्षांनी शेवटपर्यंत ताणून धरले होते. उबाठा गटात तर त्यावरून झालेल्या वादात युवराज आणि प्रवक्त्यांनी एकमेकांवर धाऊन जाण्यापर्यंत अनावस्था प्रसंग उद्भवले, असे अनेक छातीठोकपणे सांगत आहेत. अखेर राज्यसभा पवारांना आणि विधान परिषद उबाठाला, अशी देवाणघेवाण झाल्याचे सांगितले गेले. ही तडजोड महाविकास आघाडीतली होती. त्याला महायुतीची संमती असण्याचे काही कारण नव्हते. जेव्हा विधान परिषदेची उबाठाची वेळ आली, तेव्हां शिवसेनेने उचल खाल्ली. उबाठा उमेदवार असतील, तर आम्ही तीन उमेदवार देऊ आणि निवडणूक घडवून आणूच असा पवित्रा त्यांनी घेतला, तेव्हा खरा धोका उबाठाच्या लक्षात आला. जिथे आपल्याच मतांची शाश्वती नाही, तिथे महाविकास आघाडीच्या अन्य पक्षांच्या मतांची खात्री कोणी द्यायची? राज्यसभा आणि विधान परिषदेची निवडणूक झाली, तर महाविकास आघाडीची मत फुटतातच फुटतात, हा गेल्या दहा वर्षांतला अनुभव आहे. त्यामुळे, उबाठाने शहाणपणाने मैदानातून पळ काढला आणि अंबादास दानवे यांना पुढे केले. दानवे यांनी यापूर्वी विरोधी पक्षनेता म्हणून सतत चर्चेत राहण्यात यश मिळवले आहे. शिवसैनिक असल्याने त्यांच्या विरोधात अधिकचा उमेदवार न देण्याचे शिवसेनेने ठरवले. उबाठा विधिमंडळातून बाद, काँग्रेसची संख्या विधान परिषदेत एकाने कमी आणि पुन्हा दानवेंवर उपकाराचे ओझे हे यश महायुतीच्या फडणवीस शिंदे या नेतृत्वाच्या रणनीतीचे. शिवसेनेने उमेदवारी देताना डॉ. नीलम गोऱ्हे यांची पुन्हा निवड करताना सोबत बच्चू कडू यांना पक्षात घेऊन विधान परिषदेत पाठवले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेनेचे बंडखोर आमदार घेऊन गुवाहाटीला गेले, तेव्हा शिवसेनेत नसूनही कडू गुवाहाटीत पोहोचले होते. तिथल्या सगळ्या डावपेचांत त्यांचा सक्रिय सहभाग होता. 'फ्री स्टाइल' कडू यांचा उपयोग यानंतर कसा करून घ्यायचा, याचे आडाखे शिंदे यांनी मनात बांधले असणारच. त्याची काहीशी कल्पनाही दिली असणार आणि त्याबाबतचा शब्दही घेतला असणार. 'प्रहार' ही आपली संघटना कायम ठेवून मला आमदार करणे शिंदेसाठी भविष्यात कसे फायद्याचे ठरू शकते, हे शिंदेंना पटवून देण्यात कडू यशस्वी ठरलेले दिसतात. या निवडणुकीसाठी आश्चर्यचकित केले, राष्ट्रवादी काँग्रेसने. अखेरच्या दिवसापर्यंत आनंद परांजपे, नजीर काझी, उमेश पाटील, सूरज चव्हाण आणि झिशान सिद्दिकी ही नांव अंतिम फेरीत पोहोचली असताना सिद्दिकी यांच्या नांवावर नाट्यमयरीत्या शिक्कामोर्तब झाले. पक्षाच्या कोअर कमिटीत नावावर एकमत न झाल्याने सर्वाधिकार प्रथेप्रमाणे पक्षाच्या नेत्या, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे गेले. त्यांच्यावतीने पार्थ पवार यांनी चर्चा करून झिशान यांचे नाव नक्की केले. झिशान यांच्यासाठी अन्य क्षेत्रातील बऱ्याच दिग्गजांनी शब्द टाकल्याचे कळते. झाले ते झाले. आता चर्चा काहीही झाल्या, तरी नेत्यांकडून त्यांचे दिव्य कर्तव्य पार पडले आहे. सगळीच नाव ताकदीची दिसत असल्याने विधान परिषदेतील कामकाजाला अधिक दर्जा आणि रंगत यावी, एवढीच अपेक्षा.

# अर्थव्यवस्थेवरील झाकोळ

**येत्या आर्थिक वर्षात भारताच्या आर्थिक वाढीचा दर मोठ्या प्रमाणात घसरणार असल्याचे इशारे जागतिक पतमानांकन संस्था आणि अर्थतज्ज्ञांकडून दिले जात आहेत. यामागची नेमकी वस्तुस्थिती काय आहे, याचा ऊहापोह...**

भारताच्या आर्थिक वाढीचा दर २०२६-२७ या वर्षात लक्षणीय पद्धतीने कमी होण्याचे भाकीत आज अनेक पतमानांकन संस्था आणि तज्ज्ञ-गट करत आहेत. इराण व अमेरिकेची फूस असलेल्या इस्त्रायल या देशांतील चिघळत चाललेला संघर्ष, 'एल निनो'मुळे भारतीय मान्सूनवर होऊ घातलेला नकारात्मक परिणाम आणि कोव्हिड-१९ तसेच जकात-युद्धामुळे कमी लवचीक बनलेली भारताच्या वित्तीय-परराष्ट्रीय क्षेत्रातील परिस्थिती अशी अनेक कारणे यामागे आहेत.

आखातामधील युद्धामुळे जागतिक ऊर्जापुरवठ्यात मोठ्या प्रमाणात व्यत्यय निर्माण झाला आहे; विशेषत: होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे होणाऱ्या पुरवठ्यात. परिणामे कच्चे तेल आणि वायूच्या किंमतीत प्रचंड वाढ झाली आहे. भारताला लागणाऱ्या एकूण कच्च्या तेलापैकी, ८५ ते ९० टक्के एवढे तेल भारत आयात करतो तर एकूण गरजेच्या ५० टक्के नैसर्गिक वायू आयात करतो. साधारणपणे ५० टक्के कच्च्या तेलाची आयात व ७५ टक्के एलपीजी (द्रवरूप पेट्रोलियम वायू) होर्मुझच्या सामुद्रधुनीमधून भारतात येतात. त्यामुळे भारताचे आयातबिल सातत्याने वाढत आहे व त्याची 'व्यापारी तूट'देखील रुंदावत आहे.

प्रश्न फक्त पेट्रोल, डिझेल, एलपीजी यांच्यातून उद्भवणाऱ्या भयंकर महागाईचा नसून, भारतीय अर्थव्यवस्थेतील इतर अनेक क्षेत्रांसाठी आवश्यक अशा कच्च्या मालाचे भावदेखील आखाती युद्धामुळे वाढू लागले आहेत. उदाहरणार्थ, कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या युरिया व डीएपी (डायअमोनियम फॉस्फेट) या खतांच्या निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात नैसर्गिक वायू वापरला जातो व 'एलएनजी'च्या तुटवड्यामुळे ही खते चांगलीच महागली आहेत. टेक्सटाइल क्षेत्राला लागणारे पॉलिएस्टर असो की स्टील क्षेत्राला लागणारा लाइमस्टोन फ्लक्स असो; या सर्वांची आयात प्रामुख्याने आखाती देशांमधून होते. त्यामुळे या क्षेत्रांना आता कच्च्या मालाच्या चढ्या भावांचा सामना करावा लागत आहे.

त्यात लाल समुद्र किंवा सुएझ कालवा हे भारतीय वस्तूंच्या निर्यातीसाठी महत्त्वाचे मार्ग असल्यामुळे, या युद्धामुळे निर्यातदारांसाठीही मोठ्या प्रमाणात अनिश्चितता निर्माण झाली आहे. या युद्धामुळे जहाज-वाहतूक विम्याचे भावदेखील खूप वाढले आहेत; जे निर्यातीसाठी हानीकारक ठरत आहे. भारतीय निर्यातीला बसणारा फटका अव्वाच्या सव्वा वाढू घातलेला आयातखर्च यांमुळे भारताच्या चालू खात्यातील तूट रुंदावत आहे. यामुळे युद्ध सुरू झाल्यापासून (२८ फेब्रुवारी) फक्त एका महिन्याच्या अवधीत भारतीय रुपयाचे अमेरिकी डॉलरच्या तुलनेत ४.५ टक्के एवढे अवमूल्यन झाले. मात्र, रिझर्व्ह बँकेच्या परकीय चलन बाजारातील हस्तक्षेपामुळे




थोड्या काळासाठी का होईना रुपयाच्या घसरणीला आळा बसला. पण जसजसे हे युद्ध लांबत चालले आहे, तसतसा रुपयावरील दबावदेखील वाढत चालला आहे. २७ फेब्रुवारीला अमेरिकी डॉलरच्या तुलनेत जो रुपया ९०-९१ होता तो आता ९४-९५ पर्यंत घसरला आहे. यांमुळे भारताचा आयातखर्च अजूनच वाढतो आहे.

इंधनाच्या वाढलेल्या किमती व त्यामुळे वाढलेला प्रवास; तसेच वाहतूकखर्च, खतांचे व इतर कच्च्या मालाचे वाढलेले भाव आणि घसरलेला रुपया या सर्वातून जी महागाई बोकाळणार आहे, त्याचा विपरीत फटका भारतीय अर्थव्यवस्थेतील मागणी, गुंतवणूक व उद्योगांची वाढ यांच्यावर निश्चितपणे होणार आहे. महागाईला काबूत ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेला व्याजाचे दर चढे ठेवावे लागतील. परिणामी, आर्थिक वाढीला खीळ बसेल. हे विसरून चालणार नाही, की १९७९ मध्ये जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढल्या होत्या तेव्हा भारताचा जीडीपी ५.१ टक्क्यांनी घसरला होता.

सामान्य माणसांना महागाईचा फटका विशेष बसू नये, म्हणून सरकारने काही कर कमी केले आहेत. उदाहरणार्थ, अतिरिक्त अबकारी कर, पण ही सवलत एका वर्षासाठी चालू ठेवली तर सरकारला रु. १.३ ते १.७ लाख कोटींचे नुकसान सोसावे लागेल. कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि खतांच्या वाढलेल्या किमतींमुळे, अनुदानांमध्ये बरीच वाढ करावी लागेल. त्यामुळे वित्तीय तूट व सरकारी ऋण (जे अगोदरच जीडीपीच्या ८१-८३ टक्के आहे) आणखी वाढण्याचा धोका आहे.

आजमितीला जवळपास ९० लाख भारतीय आखाती देशांमध्ये काम करत आहेत. परदेशातून येणाऱ्या पैशांत आखातातून येणाऱ्या पैशांचे प्रमाण ३८-४० टक्के आहे. हे युद्ध चालू राहिले, तर या लोकांच्या नोकऱ्यांवर व त्यांच्याकडून येणाऱ्या पैशांवर विपरित परिणाम होऊ शकतो. यामुळे चालू खात्यातील तूट वाढण्याची शक्यता आहे. या तुटीमुळे रुपयाच्या आधीपासूनच सुरू असलेल्या अवमूल्यनात भर पडण्याची शक्यता आहे.

महत्त्वाच्या खतांचा तुटवडा व अवाच्या सवा वाढलेल्या किमती, उर्जेसंबंधीची अनिश्चितता व 'एल निनो'चा मान्सूनवरील संभाव्य नकारात्मक परिणाम यांचा चांगलाच फटका २०२६-२७ मध्ये कृषी क्षेत्राला बसू शकतो. तेल विपणन कंपन्या तसेच ऊर्जेच्या वापरावर अवलंबून असलेले उद्योग जसे की स्टील, सिमेंट, अॅल्युमिनियम, बांधकाम वगैरेंवर या युद्धाचा निश्चितपणे विपरीत परिणाम दिसू लागला आहे. अनेक इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे भाव वाढणार आहेत, उदा. टीव्ही, एसी इत्यादी ज्यांच्या निर्मितीत पॉलिमर, प्लास्टिक वगैरे वापरले जाते, जे बनविण्यात क्रूड वापरले जाते.

तेल विपणन कंपन्यांची 'प्रलंबित वसूली' प्रतिदिन रु. १५००-२००० कोटी एवढी वाढली आहे. त्यात सरकार त्यांना इंधनाची किंमत वाढवू देत नाही आहे. त्यामुळे या कंपन्या तोट्यात जाणार आहेत व या तोट्याचा भार सरकारला उचलावा लागणार आहे. यामुळे भारत सरकारची 'वित्तीय तूट' जबरदस्त प्रमाणात वाढणार आहे. या सर्वांचा विचार करूनच जागतिक पत मानांकन संस्थांनी भारत सरकारला इशारा दिला आहे. २०२६ या वर्षाच्या सुरुवातीपासून ते २३ एप्रिलपर्यंत परदेशी गुंतवणूकदारांनी रु १.७४ लाख कोटी एवढे पैसे भारतीय वित्तीय बाजारांमधून काढून घेतले आहेत. निश्चितपणे याचा विपरीत परिणाम 'स्थिर उत्पन्न' मिळविणाऱ्या (उदा. सेवानिवृत्त लोक) व्यक्तींच्या बचतीवर झाला आहे. २५-२६ मधील ११ महिन्यांत भारतात येणारी विदेशी थेट गुंतवणूक काही प्रमाणात वाढली असली. तरीही स्वदेशप्रत्यावर्तनामुळे व भारतीय उद्योजकांचा विदेशांत 'गुंतवणूक' करण्याचा कल वाढल्यामुळे, भारतात होणारी निव्वळ गुंतवणूक खालावलेलीच आहे. हे रोजगारनिर्मितीसाठी मुळीच अनुकूल नाही.

आजमितीला रिझर्व्ह बँकेने जमविलेला परकीय चलनाचा साठा व सरकारने वित्तीय शिस्तीला बाजूला ठेवून रोखलेली किंमतवाढ यांमुळे भारताचे आर्थिक स्थैर्य कसेबसे टिकून आहे. पण हा असा पाठिंबा धोरणकर्त्यांना अजून किती दिवस देणे झेपणार आहे, हा कळीचा मुद्दा आहे.

या पार्श्वभूमीवर 'बर्नस्टीन' या आर्थिक सल्लागार संस्थेने नुकताच भारतीय धोरणकर्त्यांना व भारतात गुंतवणूक करण्यास उत्सुक असणाऱ्यांना दिलेल्या इशाऱ्याचा गंभीरपणे विचार होणे गरजेचे आहे. या संस्थेने म्हटले आहे, की भारतीय सरकारने भांडवली खर्च वाढवून, अर्थव्यवस्थेस चालना देण्याचा केलेला प्रयत्न स्तुत्य आहे; मात्र पायाभूत सुविधा, नवप्रवर्तनाची क्षमता, कृषी क्षेत्राची उत्पादकता वाढविणाऱ्या सुधारणा आणि 'कृत्रिम बुद्धिमत्ते' सारख्या महत्त्वाच्या तंत्रज्ञानाकडे भारताचे लक्षणीय दुर्लक्ष झाले आहे. 'चायना-प्लस' धोरणानुसार, चीनपासून भारताकडे गुंतवणूकदारांना आकृष्ट करण्यात भारत बराचसा अपयशी ठरला. याचा दुष्परिणाम रोजगारनिर्मितीवर झाला आहे. महत्त्वाचे प्रकल्प पूर्ण करण्यातील दिरंगाई, उथळ पुरवठासाखळ्या, उत्पादनक्षेत्राची मर्यादित क्षमता आणि 'संशोधन आणि विकासा'कडे दुर्लक्ष अशा अनेक कारणांमुळे विदेशी गुंतवणूकदार भारताऐवजी दक्षिण कोरिया व तैवानकडे आकृष्ट होत आहेत. राज्यांच्या वाढत्या रोख हस्तांतरण योजनांमुळे फक्त उपभोगखर्च वाढतो; पण कायमस्वरूपी आर्थिक क्षमता वाढविणारा रोजगार निर्माण होत नाही. आर्थिक संकटाच्या काळात, या योजना राबविणे सरकारांना अशक्य होणार आहे. संरचनात्मक सुधारणांअभावी भारताची अर्थव्यवस्था निम्न समतोलाच्या सापळ्यात अडकून बसली आहे. बाह्य क्षेत्रातील आणि नैसर्गिक क्षेत्रातील संकटांमुळे या वर्षात, भारतीय आर्थिक धोरणातील त्रुटी स्पष्टपणे अधोरेखित होणार आहेत.(साभार म.टा)

**डॉ. रुपा रेगे नित्सुरे**

# आमची शिवी-संस्कृती आणि नारीशक्ती वंदन

दुर्योधनासोबत जुगार खेळताना युधिष्ठिराने स्वतःला पणास लावले व हारला. त्यानंतर त्याने पत्नीला-द्रौपदीला- पणास लावले व पुन्हा हारला. जिंकलेल्या दुर्योधनाने भावास आज्ञा देऊन द्रौपदीला फरफटत राजसभेत आणविले आणि तिला विवस्त्र करण्यास सांगितले. कौरवांच्या राजसभेत भीष्मासारखे वयोवृद्ध धर्मज्ञ आणि द्रोणासारखे ज्ञानी गुरु बसले होते. दुर्योधनाच्या या आदेशाविरुद्ध ते काहीच बोलले नाहीत, तेव्हा द्रौपदीने भीष्माला विचारलेला प्रश्न गेली काही हजार वर्षे तत्वचिंतनाचा विषय होऊन बसला आहे. स्वतःला पणाला लावून हारल्यानंतर पत्नीला पणास लावण्याचा युधिष्ठिराला (म्हणजे कोणत्याही पतीला) हक्क असू शकतो का ? हा तिचा प्रश्न होता. त्यावर भीष्माने इतकेच उत्तर दिले की 'धर्माची गती सूक्ष्म असते'. त्याने दुर्योधनाला त्यावेळी समज दिली नाही. किंवा धर्म काय सांगतो हे देखील सांगितले नाही. श्रीकृष्णाने अधिकची वस्त्रे पुरवून द्रौपदीचे लज्जारक्षण तर केले, परंतु त्यानेही तिच्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. त्यामुळे पत्नीवर पतीची मालकी असते आणि तो मालक या नात्याने तिच्यासोबत व्यवहार करू शकतो, ही समजूत हिंदू धर्मात पसरली. तीच समजूत अगदी अलीकडील काळापर्यंत कायम राहिली आहे. आणि केवळ हिंदूच नव्हे तर सर्वच धर्मांमध्ये अशी समजूत रूढ झाली आहे.

### विनाश्रया न शोभन्ते पंडिता वनिता लता

विद्वान पंडित, स्त्रिया आणि वेली या आधाराशिवाय शोभून दिसत नाहीत असे एक सुप्रसिद्ध संस्कृत सुभाषित आहे. कौमार्यावस्थेत पिता, यौवनावस्थेत पती तर वृद्धावस्थेत पुत्र हे स्त्रीचे रक्षणकर्ते असतात, तिची स्वातंत्र्याची पात्रता नाही, असे मनुस्मृती म्हणते. पुरुषांचा वंश वाढविणे हे स्त्रियांचे महत्वाचे कर्तव्य मानले गेले. त्यामुळे तिचे शीलरक्षण करणे हे तिच्या कुटुंबातील पुरुषांची जबाबदारी ठरली.

सोने, चांदी, जडजवाहीर, जमीन यांच्या प्रमाणेच स्त्रियांना जिंकणे हा कोणत्याही धर्मातल्या लढवय्या पुरुषांचा धर्मच मानला गेला आहे. पती हा पत्नीचा मालक असतो, ही भावना खोलवर रुजलेली आहे. 'तुझ्या मालकाचे नाव काय ?' हा प्रश्न महिला साक्षीदारास विचारताना मी कोर्टात अनेक वकिलांना पाहिले आहे आणि ती महिला साक्षीदार देखील सहजतेने आपल्या पतीचे नाव सांगत असे. यात काही गैर आहे असे कोणालाच वाटत नसे.

लढाईमध्ये विरुद्ध पक्षाला नामोहरम, खजील व अपमानित करण्यासाठी स्त्रियांची लुट, बलात्कार हे सर्वसामान्य वास्तव राहिले आहे. सर्व धर्म पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेचे अपत्य आहेत. त्यामुळे केवळ लढाईतच नव्हे तर अगदी दोन व्यक्तींमधल्या भांडणात सुद्धा एकमेकांना आई बहिणीवरून शिव्या देणे आणि त्यांच्यावर बलात्कार करण्याची धमकी देणे समाजात अजूनही सर्रास सुरु असते. त्याची सवय झाल्यामुळे बहुदा आपल्याला त्या शिव्यांचा त्रास फार होत नाही. कदाचित अश्या शिव्या सवयीने देखील आपोआप दिल्या जात असतील व शिवी देणाऱ्याचा शिवीत असलेली धमकी पूर्ण करण्याचा हेतूही नसेल.

शिव्या फक्त पुरुषच देतात असे नाही. पुरुषसत्ताक पद्धतीत रुळलेल्या अनेक स्त्रिया देखील इरसाल शिव्या देऊ शकतात. याचा अनुभव मी लहानपणी व तरुणपणी सुद्धा नळावरची भांडणं ऐकताना घेतला आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी मी एकदा एका हिंदीभाषक मित्रासोबत त्याच्या मामाच्या गावी गेलो होतो. मित्राला त्याच्या आईच्या वडिलोपार्जित इस्टेटीतला हिस्सा मागायचा होता. आम्ही गेलो तेव्हा हे कारण त्याच्या मामीला माहित नव्हते. त्यामुळे तिने आमचा चांगला आदर सत्कार केला. पण मित्राने हा विषय काढताच मामीने चंडिकेचे रूप धारण केले आणि हिंदीतून अत्यंत अर्वाच्य शिव्या-शाप देणे सुरु केले. तशा शिव्या मी नळावरच्या भांडणातही ऐकल्या नव्हत्या. आपल्या समाजात शिव्यांना जातीचे अथवा धर्माचे बंधन नाही. सोवळे नेसून देवपूजा करत असलेले ब्राह्मण पुरुष पूजेच्या वेळी आवश्यक वस्तू समोर न दिसल्यास शिव्या देतानाही मी पाहिले आहे.

आमदार संजय गायकवाड यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन वरून ज्या धमक्या दिल्या, त्यात आईवर व पत्नीवर बलात्कार करण्याचीही धमकी अनेकदा दिलेली आढळते. ती धमकी प्रत्यक्षात आणण्याचा त्यांचा हेतूही नसेल. परंतु त्यांनी व इतर सर्व



शिवीवीरांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की समाज हळू हळू का होईना, बदलत आहे. शिक्षणात मुली मुलांना मागे टाकत आहेत. स्वयंपाकघराबाहेर पडून स्त्रिया सार्वजनिक क्षेत्रात कर्तृत्व गाजवत आहेत.

नुकताच घडलेला एक वाद नमुन्यादाखल सांगतो. एका आमदार नेत्याने एका माजी महिला खासदारांवर काही टीका केली. उत्तरादाखल त्यांनी ते आमदार 'चिल्लर' आहेत असे म्हटले. पुन्हा प्रत्युत्तर देताना त्या आमदारांनी माजी महिला खासदारांच्या व्यक्तिगत चारित्र्यावरच शिंतोडे उडविण्याचा प्रयत्न केला. त्या महिलेचे पती हे सुद्धा अनुभवी आमदार आहेत. त्यांनी टीका करणाऱ्या नेत्यास असे उत्तर दिले की, 'महाराष्ट्राच्या संस्कृतीत महिलांना नेहमी सन्मानाचे आदराचे स्थान राहिले आहे, महिलांबाबत कसे बोलले पाहिजे हे त्या नेत्याने शिकून घ्यावे'. मला इतकेच म्हणावेसे वाटते की एवढीच तीव्र प्रतिक्रिया आमच्या आमदारांची आणि माजी खासदारांची संजय गायकवाड यांच्या धमकीवरही यायला पाहिजे.

समाजात जगभर एकीकडे प्रचंड हिंसा आणि क्रौर्य वाढताना दिसत असले तरी दुसरीकडे माणसांच्या जाणीवेत अधिकाधिक संवेदनशीलता देखील वाढत आहे. स्त्री ही पुरुषाच्या मालकीची वस्तू नसून ती देखील माणूसच आहे आणि समान वागणुकीचा हक्क सर्व स्त्री-पुरुषांना असला पाहिजे, हे तत्व मान्यता पावत आहे. भारतीय संविधानात 'FRATERNITY assuring the dignity of the individual' म्हणजे 'व्यक्तीची प्रतिष्ठा आश्वासित करणारा बंधुभाव' निर्माण करणे हे देखील एक उद्दिष्ट मानले आहे. व्यक्ती म्हणजे भारतातील प्रत्येक नागरिक, ज्यात ५०% स्त्रियाही आहेत. याशिवाय संविधानाच्या कलम ५१-अ(ई) अंतर्गत स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या सर्व प्रथांचा त्याग करणे, हे प्रत्येक नागरिकाचे मुलभूत कर्तव्य मानले आहे. परंतु आमच्या दररोजच्या संभाषणात शिव्या वापरून आम्ही स्त्रियांची प्रतिष्ठा कळत-नकळत डागाळत असतो, याचे भानही आम्हाला नसते.

आमच्या लहानपणी आणि तरुणपणी हिंदी चित्रपटांचे नायक नायिकांचा पिच्छा करायचे, चित्र-विचित्र अंगविक्षेप करून त्यांची छेडछाड करायचे, त्यांच्याकडे टक लाऊन पहायचे. सर्व प्रेक्षक हे सीन एन्जॉय करायचे. आता मात्र कोणत्याही महिलेच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी शारीरिक सलगी करणे अथवा लैंगिक स्वरुपाची कॉमेंट करणे, तिचा पिच्छा करणे, तिचे खासगी अवस्थेतील फोटो, व्हिडीओ काढणे व ते प्रसारित करणे अथवा पाहणे हे भारतीय न्याय संहितेच्या कलम ७५, ७७ व ७८ नुसार गुन्हे मानले गेले आहेत व त्यासाठी तीन वर्षेपर्यंत शिक्षा होऊ शकते. बलात्कारासाठी तर कलम ६४ नुसार कमीतकमी १० वर्षांची शिक्षा होऊ शकते. परंतु वरील सर्व प्रकार हे प्रत्यक्ष कृतीशी संबंधित आहेत. लोकप्रतिनिधित्व कायद्यांतर्गत सर्व आमदार व खासदार हे संविधानाला स्मरून शपथ घेत असतात. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणारी वागणूक न करणे, हे संविधानांतर्गतच प्रत्येक नागरिकाचे मुलभूत कर्तव्य मानले गेल्याची जाण सर्वप्रथम या लोकप्रतिनिधींना यायला हवी. त्यासाठी लोकप्रतिनिधित्व कायद्यात एक किरकोळ दुरुस्ती करून कोणत्याही आमदाराने अथवा खासदाराने कोणालाही त्याच्या आई, पत्नी, बहिण, मुलगी अथवा अन्य स्त्रीवर अत्याचार करण्याची धमकी असलेली शिवी दिल्याचे सिद्ध झाल्यास त्याची अथवा तिची आमदारकी अथवा खासदारकी तात्काळ रद्द होईल (म्हणजे संबंधित आमदार अथवा खासदार ते पद धारण करण्यास अपात्र ठरेल) अशी तरतूद करणे आवश्यक आहे. कोणत्याही 'सांस्कृतिक' अडचणीमुळे केंद्र सरकार तो कायदा दुरुस्त करण्यास इच्छुक नसल्यास निदान महाराष्ट्राच्या विधीमंडळाने ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगर परिषद, बाजार समिती, सहकारी संस्था, महानगरपालिका इत्यादी आपल्या अखत्यारीतील कायद्यांमध्ये तशी दुरुस्ती करून शिवी देणाऱ्या निर्वाचित सदस्यांना अपात्र ठरविण्याची तरतूद करावी. आमदार गायकवाड यांना मुख्यमंत्र्यांनी व त्यांच्या पक्ष नेत्यांनी नेमकी काय 'समज' दिली ते कळले नाही. परंतु आता ते दिवंगत पानसरे यांच्या विरुद्ध मरणोत्तर गुन्हा दाखल करण्याची मागणी करत आहेत. तसेच पानसरे यांचे पुस्तक छापणाऱ्या, विक्री करणाऱ्यांवर देखील कारवाईची मागणी करत आहेत. म्हणजे त्यांनी स्वतः जी काही शिवीगाळ केली व धमक्या दिल्या, त्याबद्दल त्यांना फारसा पश्चाताप होत असलेला दिसत नाही. 'नारीशक्ती वंदन' किंवा 'नारी ते नारायणी' प्रकरणी जर सत्तारुढ पक्ष आणि त्याचे हिंदुत्ववादी समर्थक खरेच गंभीर असतील तर त्यांनी या व अशा प्रकारच्या शिवीगाळ प्रकरणी कठोर भूमिका घेणे अपेक्षित आहे. सत्तारुढ व विरोधी पक्षातील निदान महिला नेत्यांनी तरी याबाबतीत पुढाकार घ्यावा.

(लेखक नामवंत विधिज्ञ आहेत)

**अॅड. किशोर देशपांडे**
मो.९८८१५७४९५४

# अचलपूरच्या ५ भागात भीषण जलसंकट

## जिल्हाधिकाऱ्यांकडे कारवाईची मागणी

**अचलपूर/वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर नगर परिषद क्षेत्रातील प्रभाग क्रमांक ११ मध्ये सध्या भीषण जलसंकट निर्माण झाले असून नागरिकांचे दैनंदिन जीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. मंजूरपुरा, माहेराबपुरा, नसीबपुरा, एकता नगर आणि महबूब मोठा या भागांमध्ये मागील अनेक दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना विशेषतः त्रास सहन करावा लागत असून, टँकरवर अवलंबून



राहण्याची वेळ अनेकांवर आली आहे.

या गंभीर प्रश्नाची दखल घेत प्रभागातील नगरसेविका सुमैया बख्तियार रऊफ खान यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर करून तात्काळ हस्तक्षेपाची मागणी केली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, यापूर्वीही २१ जानेवारी २०२६ व २० फेब्रुवारी २०२६ रोजी नगर परिषदेकडे लेखी तक्रारी देण्यात आल्या होत्या; मात्र त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आले असून आजपर्यंत कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.

नगरसेविकांनी नगर परिषद प्रशासनावर गंभीर आरोप करताना सांगितले की, पाणीपुरवठा विभागातील संबंधित अभियंते व कर्मचारी जाणीवपूर्वक निष्काळजीपणा करत आहेत. परिणामी, नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा येत आहे. 'महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक नगर अधिनियम १९६५' नुसार नियमित व सुरक्षित पाणीपुरवठा करणे ही प्रशासनाची कायदेशीर जबाबदारी असताना, त्याकडे दुर्लक्ष करणे हे गंभीर स्वरूपाचे कर्तव्यच्युती असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, बाधित भागांमध्ये तातडीने नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा आणि दोषी आढळणाऱ्या अभियंते व कर्मचाऱ्यांवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणीही त्यांनी केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः या भागाचा दौरा करून प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशी मागणीही त्यांनी पत्राद्वारे केली आहे.दरम्यान, परिस्थितीत लवकर सुधारणा न झाल्यास आपल्या नेतृत्वाखाली नागरिकांसह तीव्र आंदोलन, मोर्चा व उपोषण छेडण्यात येईल, असा इशाराही नगरसेविकांनी दिला आहे. तसेच हा प्रश्न शासन दरबारी आणि माध्यमांपुढेही प्रभावीपणे मांडला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.या वाढत्या जलसंकटामुळे परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची भावना तीव्र होत असून, प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## पद्मजा कुर्हेकर यांचे निधन

**अमरावती/का.प्र.**

स्टेट बँकेचे निवृत्त शाखाधिकारी श्याम कुर्हेकर यांच्या सुविद्य पत्नी सौ पद्मजा कुर्हेकर यांचे आज शनिवार,२ मे रोजी पहाटे साडेपाच वाजता, अल्प आजाराने निधन झाले. त्या ७४ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती श्याम उर्फ वासुदेव, मुलगा अजित, मुलगी सौ स्वाती, सून, जावई, नातवंडे व मोठा कुर्हेकर परिवार आहे.त्यांची अंत्ययात्रा आज शनिवार दुपारी १ वाजता, निवासस्थान २२, राजापेठ स्टेटबँक कॉलनी येथून काढण्यात येवून त्यांच्यावर हिंदू स्मशान भूमी अंबाघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी जनसमुदाय उपस्थीत होता.

## उष्मघाताने ७४ वर्षीय इसमाचा मृत्यू

**खल्लार/वार्ताहर**

खल्लार नजिकच्या डोंगरगाव येथिल ७४ वर्षीय इसमाचा उष्मघातामुळे मृत्यू झाल्याची घटना ३० एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास घडली.



जगदेव गुलाबराव उमाळे (७४) असे उष्मघातामुळे मृत्यू झालेल्या इसमाचे नाव असून घटनेच्या दिवशी ३० एप्रिलला ते चष्मा आणण्यासाठी दर्यापूरला गेले होते. दिवसभर उन्हात राहिल्याने त्यांना उन्हाचा तीव्र फटका बसला दर्यापूरवरुन दुपारी अडीच वाजता घरी आले असता काही मिनिटातच त्यांना अस्वस्थ वाटू लागले व त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहीत मुले, दोन विवाहीत मुली असा आप्त परिवार आहे.

## गाडगेनगर पो.स्टे.येथील डि.बी. पथकाने
# देशी विदेशी दारुचा अवैध साठा केला जप्त

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र दिनानिमित्य पो.स्टे. गाडगेनगर येथील डि.बी. स्टाफ सकाळी ०७.०० वा. दरम्यान पेट्रोलिंग करत असतांना स्टाफला मिळालेल्या गोपनिय माहीतीनुसार विलास नगर येथील अशोक महावीर पटेल, वय ६० वर्ष,याच्याकडे पो.नि. गोरखनाथ जाधव यांचे नेतृत्वात रेड टाकली असता आरोपीच्या विलास नगर येथील घरातून मोठ्या प्रमाणात देशी विदेशी दारुचा अवैद्यरित्या विक्री करीता दारु साठा बाळगून असलेला आढळला.

यावेळी आरोपीच्या ताब्यातून घटनास्थळ पंचनामा प्रमाणे एकुण ०२,०४,८१०/- रु. चा प्रोव्ही माल पंचासमक्ष जप्त करुन कार्यवाही करण्यात आली. आरोपीचे कृत्य कलम ६५(ई), ६६ म.दा.का. अन्वये होत असल्याने सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेण्यात आला आहे. वरील कार्यवाही



मा. पोलीस आयुक्त राकेश ओला,पोलीस उपायुक्त गणेश शिंदे,पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, गाडगेनगर विभाग, अमरावती शहर यांच्या सूचना व माहितीनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, गुन्हे पो.नि. विजया पांढरे, प्रशासन पी.एन. मिस्टर. समाधान वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथक प्रभारी पोउपनि सागर ठाकरे, स.पो.पौपनी. अशोक वाटाणे, पोहवा. भरत वानखडे, पो.कॉ. राजेश गुरळे, पो.कॉ. आशिष ठाकरे, पो.शि. सुशांत प्रधान, पो.शि. मतीन शेख, पो.शि. धनराज कुमरे, पो.शि. महेश शर्मा, पो.शि. राज देवीकर, पो.शि. निरज ठाकूर, पो.शि. रणजीत कड्डू इ.ए. गाडगेनगर येथे आहे. सदर गुन्ह्याचा तपस पोउपनि सागर ठाकरे, प.स. गाडगेनगर पोलीस ठाण्याने केली आहे.

## अकोला येथे आज भव्य हिंदू-राष्ट्र जागृती सभा

**अमरावती-**हिंदुत्वाचा आवाज बुलंद करण्यासाठी आणि 'हिंदू राष्ट्राच्या' स्थापनेचा संकल्प करण्यासाठी उद्या रविवार ३ मे २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता,श्री एकविरा मैदान, माधव नगर, अकोला येथे भव्य 'हिंदू राष्ट्र-जागृती सभे'चे आयोजन करण्यात आले आहे.अकोल्यातील या ऐतिहासिक सभेसाठी अमरावती जिल्ह्यातील धर्मप्रेमींमध्ये विशेष उत्साह पहायला मिळत आहे. हिंदू जनजागृती समितीचे अमरावती जिल्हा समन्वयक सचिन वैद्य यांनी जिल्ह्यातील विविध मंदिर संस्थाने, व्यापारी संघटना आणि हिंदुत्वनिष्ठ गटांच्या भेटी घेऊन या सभेला मोठ्या संख्येने उपस्थीत रहाण्याचे आवाहन केले.

या सभेसाठी भाग्यनगर (तेलंगणा) येथील श्रीराम युवा सेनेचे संस्थापक-अध्यक्ष आणि प्रखर हिंदुत्ववादी नेते आमदार टी. राजासिंह यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# ग्राहकांच्या समाधानासाठी काम करा-अशोक साळुंके

## परिमंडळातील ५० तांत्रिक कर्मचारी गुणवंत कामगार पुरस्कार

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनांनिमित्त महावितरणच्या अमरावती परिमंडळातील ८ यंत्रचालक आणि ४२ तंत्रज्ञ अश्या ५० कर्मचाऱ्यांना 'गुणवंत कामगार' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विद्युत भवन येथे झेंडा वंदन झाल्यानंतर मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्याहस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

नियोजन भवन ,जिल्हाधिकारी कार्यालय येथे हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यावेळी अधीक्षक अभियंता प्रविण दरोली, अधीक्षक अभियंता (प्र) प्रफुल्ल लांडे, सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख, कार्यकारी अभियंते राजेश लांडे, प्रदिप अंधारे, राजेश माहुलकर, प्रणाली विश्लेषक नितिन नांदुरकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने, वरिष्ठ व्यवस्थापक शिरीष शहा यांची यावेळी उपस्थिती होती.

परिमंडळातील ५०



पुरस्कारात अमरावती जिल्ह्यातील २७ गुणवंत कामागाराचा समावेश असून यात ४ यंत्रचालक आणि २३ तंत्रज्ञ आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील यात ४ यंत्रचालक आणि १९ तंत्रज्ञ अश्या एकुण २३ गुणवंत कामगाराचा समावेश आहे.प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे यांनी केले, कार्यक्रमाला एका सुत्रात बांधण्याचे काम व्यवस्थापक वित्त व लेखा विकास बांबल आणि विधी अधिकारी आद्यश्री कांबे यांनी केले,तर आभार प्रणाली विश्लेषक नितीन नांदुरकर यांनी केले.

## एचएससी निकालात राष्ट्रीय ज्युनिअर कॉलेजचे सुयश

**अचलपूर/वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या वतीने आज जाहीर झालेल्या १२ वि च्या निकालात शहरातील राष्ट्रीय ज्युनिअर कॉलेज विज्ञानच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट निकालाची परंपरां कायम ठेवली आहे. विज्ञान विभागातील एकूण ९९ विद्यार्थ्यांपैकी ९९ विदयार्थी उत्तीर्ण झाले आहे. राष्ट्रीय ज्युनिअर कॉलेज विज्ञान विभागाचा १०० टक्के निकाल लागला आहे . राष्ट्रीय ज्युनिअर कॉलेज विज्ञान शाखेत खुशी खंडेलवाल या विद्यार्थिनीने ८६.१७ टक्के प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकाविला आहे .दुसरा क्रमांक समृद्धी बुल ८४.१७ टक्के तर वंशिका अडगोकार हिला ७९.५० टक्के प्राप्त केले आहे.पायल उगले ७८.१७ टक्के ,दर्शन लोने ७८.६७ टक्के , जान्हवी शेळके ७५.८३ टक्के , स्वयंम शहाणे ७४.८३ टक्के , कामाक्षा जयसिंगपुरे ७४.५० टक्के ,आरुषी डोंगरे ७४.१७ टक्के , श्रावणी कडू हिला ७४.१७ टक्के यांचा समावेश आहे .एकूण विज्ञान शाखेत प्राविण्य श्रेणीत ६ विद्यार्थी व प्रथम श्रेणीत ३६ विद्यार्थी तसेच द्वितीय श्रेणीत ४१ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. कॉलेज चे अध्यक्ष संजयकुमार



रतनकुमार चौधरी ,सचिव अनिल मदनगोपालजी चौधरी,प्राचार्य सर्वेश राठी, स्वाती सवाई, शिक्षक प्रतिनिधी नेहा ठाकूर, शिक्षक प्रकाश भगत, सचिन घवळे,सांस्कृतिक सचिव दिलीप बोबडे, आशिष जोशी,शिक्षक प्रफुल दातीर,आशिष उपाध्याय, वेदांत तट्टे,शिक्षकेत्तर कर्मचारी अनिल शर्मा,एस.एच.पुरोहित ,विक्रम माकोडेराष्ट्रीय ज्युनिअर कॉलेज चे समस्त शिक्षक - कर्मचारी वृंद कडून अभिनंदन करण्यात आले.

# अमरावतीत जनगणना मोहिमेला प्रारंभ

## मान्यवरांकडून 'स्व-गणना' करून नागरिकांना आवाहन

**अमरावती/का.प्र.**



शहरात जनगणना मोहिमेला प्रारंभ झाला असून, यंदाची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात १ मे ते १५ मे या कालावधीत नागरिकांना 'स्व-गणना' करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, महापौर श्रीचंद तेजवानी, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार सुलभाताई खोडके, आमदार रविभाऊ राणा, उपमहापौर सचिन भेंडे तसेच स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी स्वतः स्व-गणना करून या उपक्रमाची सुरुवात केली आहे. त्यांनी नागरिकांनीही स्वयंस्फूर्तीने पुढे येत स्व-गणना पूर्ण करावी व या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे. जनगणना प्रक्रियेत अचूक व अद्ययावत माहिती नोंदविणे अत्यंत आवश्यक असून, डिजिटल माध्यमामुळे ही प्रक्रिया अधिक सोपी, जलद व पारदर्शक होणार आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी वेळेत स्व-गणना करून प्रशासनास सहकार्य करावे, असेही मान्यवरांनी नमूद केले.

## सुधाकर जुनघरे यांचे निधन



**खल्लार** - लगतच्या बेंबळा खुर्द येथिल रहिवासी तथा श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे आजीवन सदस्य, खल्लार हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालयाचे शाळा समिती सदस्य सुधाकरराव सुखदेवराव जुनघरे (वय.८०) यांचे १ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना,नातू,पणतू असा परिवार आहे.

# महानगरपालिका शाळेतील विद्यार्थिनीची एमपीएससीद्वारे निवड

## मुख्याध्यापक व शिक्षकांतर्फे ऋतिका गायकवाड हिचा सत्कार

**अमरावती/का.प्र.**

सध्याच्या काळात इंग्रजी माध्यमाच्या शाळांची क्रेझ पालकांमध्ये वाढत असून सरकारी शाळांमध्ये प्रवेशा करिता पालकांची अनास्था दिसून येत आहे. परंतु महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थीच स्पर्धा परीक्षा मध्ये सरस असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले असून अमरावती महानगरपालिका उच्च प्राथमिक शाळा क्र. १४ वडाळी येथील विद्यार्थिनी ऋतिका गायकवाड हिने सतत मेहनतीच्या व



जिद्दीच्या जोरावर एमपीएससी परीक्षा पास केली आहे. परीक्षा पास करून तिची निवड मंत्रालया मध्ये झालेली आहे.

ऋतिका गायकवाड हिने महानगरपालिका उच्च प्राथमिक मराठी शाळा क्र. १४ येथे इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत शिक्षण घेतले आहे.वडाळी शाळेचे मुख्याध्यापक योगेश पखाले केंद्रसमन्वयक अनुप भारंबे व शाळेतील शिक्षकांनी नुकताच MPSC गट क मध्ये लेखा व कोषागार विभाग मध्ये निवड झाल्याबद्दल ऋतिका गायकवाड व तिच्या आई-वडिलांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला तसेच भविष्यासाठी व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

महानगरपालिका शाळांमधून शिकून अनेक विद्यार्थी मोठ्या पदावर दिल्याचे आपल्याला दिसून येते यामध्ये शहरातील नामांकित डॉक्टर, नामांकित वकील, शहरातील नामांकित व्यावसायिक, लोकप्रतिनिधी हे सुद्धा महानगरपालिका शाळांमध्ये शिकून प्रगती करत असल्याचे चित्र आहे. सत्कारवेळी शाळेतील शिक्षिका ज्योती सातपुते ,राजश्री सोळंके,पूर्व प्राथमिक शिक्षिका करिष्मा गोफने या उपस्थित होते.

## संक्षिप्त

### नृसिंह जयंती महोत्सव

**अचलपूर-**परतवाडा येथील श्री नृसिंह मंदिर चौक, आठवडी बाजार परिसरात यंदाचा सार्वजनिक श्री नृसिंह जयंती महोत्सव अत्यंत भक्तीमय, उत्साहपूर्ण आणि मंगल वातावरणात संपन्न झाला. भगवान श्री नृसिंहाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. भाविकांच्या श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचा संगम या सोहळ्यात अनुभवायला मिळाला.३० एप्रिल २०२६ रोजी पहाटे ५ वाजता धार्मिक विधींची सुरुवात झाली. यावेळी विधिवत होमहवन, अभिषेक पूजा आणि महाआरती पार पडली. मंत्रोच्चारांच्या गजरात आणि भक्तीमय वातावरणात पार पडलेल्या या पूजाविधीने वातावरण पूर्णपणे आध्यात्मिकतेने भारावून गेले होते. मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांनी दर्शन घेत भगवान श्री नृसिंहाच्या चरणी प्रार्थना अर्पण केल्या.सोहळ्याला स्थानिक नागरिकांसह परिसरातील भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मंदिर परिसरात दिवसभर भक्तांची वर्दळ कायम होती. भक्तांनी श्रद्धेने सहभागी होत महोत्सवाला उत्साहपूर्ण रंगत आणली. हा कार्यक्रम परतवाडा येथील ब्राम्हणसभा मंगल कार्यालय येथे संपन्न झाला असून, यामध्ये भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला



### बुद्ध जयंती उत्सव



**अमरावती-**दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा शालवन विहार,बडनेरा येथे बुद्ध जयंती उत्साहात भंते राजरत्न यांचे सुमधुर वाणीने उपस्थितानी परित्त देसना ग्रहण केली. त्यानंतर भंते राजरत्न यांनी दोन तास वैशाख पौर्णिमे निमित्य धम्म देसना दिली.भन्तेजिनी राग, द्वेष आणि मोह यांचेवर मानवी मनाद्वारे नियंत्रण ठेवून निर्वाण म्हणजे निर्दोष जीवन कसे जगायचे याचा मूलमंत्र उपस्थिताना सांगितले. तसेच भंतेजिच्या च्या हस्ते धम्म ध्वजारोहण करण्यात आले. बुद्ध विहाराला दान देणारे सुरेश वैद्य यांचा सत्कार करण्यात आला. व माझी आई लक्ष्मी बनसोड यांचे ८५ व्या वाढदिवस १ मे. या निमित्ताने त्यांचे सर्वांनी पुष्पगुच्छ देऊन अभिष्टचिंतन केले.यावेळी ऊषा इंगळे, रंजना विलास तायडे, रत्ना वाहने, कीर्ति बनसोड, शोभा सुखदान, पदमा ऊके, तसेच प्रल्हाद इंगळे, मोरेश्वर बोरकर, मदन मेश्राम, अमोल गणवीर प्रकाश बनसोड यांनी मनोगत व्यक्त केले. समारोपीय संबोधन संस्थेचे अध्यक्ष आयुष्यमान सुनील भाऊ टेंभुर्णे यांनी केले. संचालन के. टी. मेश्राम यांनी तर आभार प्रदर्शन पंकज वासनिक यांनी केले.

### जगदंब पब्लिक स्कूलच्या कार्याचा गौरव

**बेलोरा-**जगदंब पब्लिक स्कूल, चांदूर बाजार येथील प्राचार्य



कीर्ती ठाकरे यांना अमरावती ग्रामीण पोलीस विभागाकडून 'स्टुडंट पोलीस कॅडेट' कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.हा सन्मान १ मे २०२६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, अमरावती ग्रामीण अधीक्षक विशाल आनंद यांच्या वतीने प्रदान करण्यात आला.विद्यार्थ्यांनी शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि नागरिक कर्तव्य याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी शाळेचे अभिनंदन करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.यासोबतच, शाळेने केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल जगदंब पब्लिक स्कूल, चांदूर बाजार यांनाही सन्मानित करण्यात आले.

### आरती आमटे- नानकर यांचे समाजकार्य झळकणार दूरदर्शनवर



**अमरावती-**आजी- आजोबा आणि आई वडिलाकडून समाजसेवेचा वारसा घेत तो पुढे चालविणाऱ्या आरती आमटे-नानकर यांच्या सामाजिक कार्याची गाथा छोट्या पडद्यावर झळकणार असून शुक्रवार दि. ८ मे रोजी दुपारी १२ वाजता सह्याद्री वाहिनीवरील 'हॅलो सह्याद्री' या कार्यक्रमातून त्यांच्याकडून तसेच त्यांचे पती उदय नानकर यांच्याकडून ती गाथा ऐकायला मिळणार आहे. महाराष्ट्रातील नामवंत निवेदक नितीन भट त्यांच्याशी संवाद साधणार आहेत. कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी आपले आयुष्य खर्च करणारे पद्मश्री बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांची नात तसेच आदिवासी बांधवांच्या सेवेसाठी आपले आयुष्य समर्पित करणारे रमण मॅगसेसे पुरस्कार प्राप्त डॉ. प्रकाश आमटे आणि मंदाकिनी आमटे यांची कन्या आरती आमटे या आपल्या घराण्याचा वारसा पुढे नेत आहेत. आरती आमटे- नानकर आणि त्यांचे पती उदय नानकर अमरावती शहरातील सिंधूनगरात 'आस्था' या प्रकल्पाअंतर्गत निराधार महिलांना आधार देत असून सोबतच त्यांच्या सक्षमीकरणाचेही काम करत आहेत.आमटे परिवाराच्या तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आरती-आमटे नानकर यांच्या मुलाखतीतून त्यांच्या समाजसेवेचा वारसा उलगडून सांगणार आहेत. या कार्यक्रमाच्या निर्मात्या मीनल पाठराबे आहेत.

# विदर्भातील सत्तासमीकरणाचा नवा अध्याय

## बच्चू कडू, शिवसेना आणि अपूर्ण राहिलेले प्रयोग



✍ॲड. धनंजय देशमुख

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या मोठ्या उलथापालथी सुरू आहेत. विशेषतः विदर्भात नवीन समीकरणांची चाचपणी सुरू असून, बच्चू कडू यांचा तब्बल २७ वर्षांनंतर शिवसेनामध्ये झालेला प्रवेश हा त्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा मानला जातो. आंदोलनातून उभे राहिलेले, आक्रमक शैलीत प्रशासनाला धारेवर धरणारे आणि जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने लढा देणारे नेते म्हणून बच्चू कडू यांची ओळख आहे.

प्रहार जनशक्ती पक्ष या माध्यमातून त्यांनी विदर्भात मजबूत जनाधार निर्माण केला. शेतकरी, दिव्यांग आणि वंचित घटकांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने काम केले. मात्र, अलीकडील निवडणुकीतील पराभव आणि सत्तेपासून दूर राहण्यामुळे त्यांचा प्रभाव काहीसा कमी होत असल्याचे दिसत होते. राजकारणात संघर्ष जितका महत्त्वाचा असतो, तितकीच सत्तेची जवळीकही महत्त्वाची असते. त्यामुळे बच्चू कडू यांचा शिवसेना प्रवेश हा वेळ साधून घेतलेला आणि रणनीतीपूर्ण निर्णय मानला जातो.

सध्याच्या सत्तासमीकरणात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाला पश्चिम विदर्भात विशेष बळकटीची गरज आहे.मराठवाडा, ठाणे आणि मुंबईतील काही भाग वगळता शिवसेनेला अपेक्षित ताकद मिळालेली नाही. अशा परिस्थितीत बच्चू कडू यांच्यासारखा स्थानिक पातळीवर प्रभाव असलेला नेता सत्तेसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतो.

यामध्ये सामाजिक समीकरणाचा मोठा वाटा आहे. बच्चू कडू हे पाटील समाजातील प्रभावी नेतृत्व मानले जाते. विदर्भात मराठा–कुणबी–पाटील हे समीकरण निर्णायक ठरते. या तिन्ही घटकांना एकत्र आणण्याची ताकद बच्चू कडू यांच्यात आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला या समीकरणाचा थेट फायदा होऊ शकतो.

दुसरीकडे बच्चू कडू यांच्यासाठीही सत्तेबाहेर दीर्घकाळ राहणे परवडणारे नाही.आंदोलनातून ओळख निर्माण झाली असली, तरी मतदारसंघातील विकासकामे गतीने करण्यासाठी सत्तेची साथ आवश्यक असते. त्यामुळे त्यांना विधानपरिषदेत पाठवणे हा एक व्यवहार्य पर्याय मानला जात आहे. यामुळे त्यांना अधिकृत व्यासपीठ मिळेल आणि त्यांच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे मांडता येईल.

राजकारणात दबाव तंत्र हेही महत्त्वाचे शस्त्र आहे. बच्चू कडू यांची आंदोलनात्मक शैली आणि प्रशासनावर थेट दबाव टाकण्याची क्षमता सत्तेसाठी फायदेशीर ठरू शकते. ते सत्तेत राहूनही जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवू शकतात, ज्यामुळे सरकार सतत सजग राहते. ‘आतून सहभाग आणि बाहेरून दबाव’ ही त्यांची भूमिका सध्याच्या राजकारणात प्रभावी ठरू शकते.अमरावती परिसरात नवनित राणा व रवी राणा यांचे वाढते आक्रमक राजकारण लक्षात घेतले, तर बच्चू कडू हे सत्तेसाठी एक संतुलक शक्ती ठरू शकतात. स्थानिक पातळीवर ते एक मजबूत पर्याय निर्माण करू शकतात आणि विरोधकांच्या प्रभावाला तोलू शकतात.तथापि, शिवसेनेने यापूर्वीही विदर्भात विविध सामाजिक आणि स्थानिक समीकरणे उभी करण्याचा प्रयत्न केला आहे. अडसूळ पिता-पुत्र आणि जगदीश गुप्ता यांसारख्या नेतृत्वाच्या माध्यमातून संघटन मजबूत करण्याचे प्रयत्न झाले. मात्र, हे प्रयोग अपेक्षेप्रमाणे प्रभावी ठरले नाहीत.

स्थानिक पातळीवर जनाधार निर्माण करण्यात आणि मतदारांशी भावनिक नाळ जोडण्यात या समीकरणांना मर्यादा आल्या. त्यामुळेच शिवसेनेला विदर्भात स्थिर आणि प्रभावी नेतृत्वाची गरज सतत जाणवत राहिली.याच पार्श्वभूमीवर बच्चू कडू यांचा प्रवेश अधिक महत्त्वाचा ठरतो. कारण ते केवळ राजकीय नेते नाहीत, तर आंदोलनातून तयार झालेले जननेते आहेत. त्यांची शैली, त्यांचा थेट संवाद आणि लोकांमध्ये असलेला विश्वास हे घटक त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवतात.

एकंदरीत पाहता, बच्चू कडू यांचा शिवसेना प्रवेश, संभाव्य विधानपरिषद नियुक्ती, सामाजिक समीकरणांची जुळवाजुळव आणि पूर्वीच्या अपयशी प्रयोगांची पार्श्वभूमी हे सर्व मिळून विदर्भातील राजकारणाला नवे वळण देणारे ठरत आहेत. योग्य समन्वय साधला, तर हे समीकरण केवळ शिवसेनेसाठीच नव्हे,तर बच्चू कडू यांच्या राजकीय पुनरुज्जीवनासाठीही निर्णायक ठरू शकते.

अमरावती
मो.९२८४३८२१०२

# नोकरकपातीवर उत्तर कौशल्यविकसनाचे

गेल्या काही महिन्यांमध्ये ओरॅकल, ॲमेझॉन आणि मायक्रोसॉफ्ट यांसारख्या मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झालेल्या कर्मचारी कपातीच्या बातम्यांनी जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले.मात्र, या घडामोडींकडे केवळ उद्योगाची घसरण म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. उलट, हे बदल आयटी उद्योगातील एका मोठ्या संक्रमणाचे आणि परिवर्तनाचे संकेत आहेत. या परिवर्तनात अनेक नव्या संधी दडल्या आहेत.भारतीय आयटी क्षेत्र हे जगाचे पॉवरहाऊस म्हणून ओळखले जाते. या क्षेत्रात अनुभवायला मिळत असलेल्या ताज्या बदलांमुळे भारतीय आयटी उद्योग आकुंचन पावेल, अशी अनेकांना भीती वाटते. परंतु वास्तव याच्या उलट आहे. भारतीय आयटी क्षेत्र कमी होत नाहीये, तर संक्रमित होत आहे. सायबर सिक्युरिटी, डेटा ॲनालिटिक्स, मशीन लर्निंग आणि रोबोटिक्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. या क्षेत्रांसाठी केवळ पदवी पुरेशी नसून विशिष्ट कौशल्ये, विश्लेषणात्मक विचार आणि सतत शिकण्याची तयारी असणे आवश्यक आहे. स्वतःला या बदलांनुसार जुळवून घेणाऱ्या व्यावसायिकांसाठी भविष्यात संधींचे आकाश खुले आहे. त्यानुसार त्यांना परिस्थितीची जाणीव व्हायला हवी. भारतातील पुणे,बंगळुरू आणि हैदराबादसारखी शहरे आता जागतिक स्तरावर ‘इनोव्हेशन हब’ म्हणून नावारूपाला येत आहेत. विशेषतः पुण्यात ‘ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स’ (जीसीसी) मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. पूर्वी ही केंद्रे केवळ बॅक-ऑफिस कामांसाठी वापरली जात होती, पण आता ती जागतिक कंपन्यांची धोरणात्मक संशोधन आणि विकास केंद्रे बनली आहेत. याचा अर्थ असा,की भारतीय प्रतिभा आता मायदेशात राहूनच जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञानावर काम करत आहेत. ही केंद्रे केवळ सेवा देणारी नसून जागतिक स्तरावर नावीन्यपूर्ण शोध लावणारी केंद्रे बनली आहेत. पूर्वी एकदा पदवी घेतली,की आयुष्यभर त्या जोरावर नोकरी करता येत असे, पण आता ती परिस्थिती राहिलेली नाही.तंत्रज्ञान इतक्या वेगाने बदलत आहे की, दर दोन-तीन वर्षांनी तुम्हाला नवीन काही तरी शिकावेच लागेल. सतत शिकणे, नवीन कौशल्ये आत्मसात करणे आणि तांत्रिक प्रगतीशी अपडेट राहणे, हे आता करिअरमधील यशाचे मूलभूत मंत्र बनले आहेत. ऑनलाइन लर्निंग प्लॅटफॉर्म्स, इंडस्ट्री सर्टिफिकेशन आणि प्रत्यक्ष प्रकल्पांवरील कामाचा अनुभव आता नोकरीच्या बाजारपेठेत तुमची कमत ठरवत आहेत.ती ओळखून आपल्या कौशल्यांमध्ये बदल करत राहणे गरजेचे आहे, हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या नव्या पिढीला कळणे आवश्यक आहे. यापुढील काळात फक्त विद्यार्थ्यांनीच बदलून चालणार नाही, तर आपल्या शैक्षणिक संस्थांनाही काळानुसार बदलावे लागेल.

उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ आणि धोरणकर्ते यांनी एकत्र येऊन ‘कौशल्य दरी’ भरून काढण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज करणारे अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. कल्पकता वाढवणे, उद्योजकता जोपासणे आणि डिजिटल साक्षरतेमध्ये गुंतवणूक करणे यामुळेच भारताची जागतिक स्पर्धात्मकता टिकून राहील.नवतंत्रज्ञान रोजगारांची संख्या कमी करत असल्याचा आक्षेप सातत्याने घेतला जात असला तरी हे लक्षात घेतले पाहिजे, की जेव्हा जेव्हा नवीन तंत्रज्ञान आले, तेव्हा सुरुवातीला काही नोकऱ्या गेल्या; पण त्यापेक्षा कैक पटींनी नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या. संगणक आले तेव्हाही अशीच भीती होती,पण संगणकामुळे आज आयटी क्षेत्रात लाखो लोकांना रोजगार मिळाला आहे.मानवाची क्षमता वाढवणारे साधन

एआय हे मानवाचे रिप्लेसमेंट नसून मानवाची क्षमता वाढवणारे एक साधन आहे. एआयचा प्रभावी वापर करायला शिकतील तेच भविष्यातील कामाच्या ठिकाणी सर्वात मौल्यवान असतील. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व आणखी वाढणार, हे निश्चित आहे. महाराष्ट्रात या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. नवी संशोधन केंद्रे, नवउद्योग आणि शैक्षणिक संस्था या विषयावर भर देत आहेत. त्यांना अपेक्षित मनुष्यबळ आणि अस्तित्वात असणाऱ्या कार्यपद्धतीतील बदल लक्षात घेऊन आपल्या कामात बदल करणारे काळाची कसोटी पार करतील, तसेच बदलणाऱ्या अपेक्षांची पूर्तताही करतील. त्यामुळे येणाऱ्या काळात महाराष्ट्र या क्षेत्रात आघाडीवर राहील, अशी अपेक्षा आहे.

नव्या युगात टिकून राहण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी काही गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे जिज्ञासू वृत्ती. नेहमी प्रश्न विचारा आणि नवीन गोष्टी शिकण्यासाठी उत्सुक राहा. या युगात तांत्रिक कौशल्ये आवश्यक आहेतच, पण त्याचबरोबर ‘सॉफ्ट स्किल्स’ ही तेवढीच महत्त्वाची आहेत. संवादकौशल्य, नेतृत्व आणि सांघिक कार्य या बाबी मशीन करू शकत नाहीत. त्यामुळे या कौशल्यांचे महत्त्व कधीच कमी होणार नाही. नवनवीन तंत्रज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करताना प्रत्येकाने बदलांचा धैर्याने स्वीकार करायला हवा.आयटी क्षेत्रात सध्याचा काळ नवनिर्माणाचा आहे. नवसंशोधनाचा आहे. आज प्रत्येक क्षेत्रात जुन्या तंत्रपद्धती नष्ट होत आहेत आणि नव्या अधिक कार्यक्षम पद्धती जन्म घेत आहेत. बदल स्वीकारतील, स्वतःची कौशल्ये अद्ययावत करतील आणि तंत्रज्ञानाच्या प्रवाहाविरुद्ध न जाता त्या प्रवाहाचा भाग बनतील, अशा लोकांचे भविष्य उज्वल आहे. भारत केवळ या बदलाचा साक्षीदार नसेल, तर या जागतिक डिजिटल क्रांतीचे नेतृत्व करेल. आपल्याला केवळ पदवीधर व्हायचे नाही, तर ’कौशल्यवान’ आणि ‘डिजिटल साक्षर’ व्हायचे आहे. ले-ऑफच्या या वावटळीत ज्ञानाचा आणि कल्पकतेचा पाया मजबूत असलेल्यांची नौका नक्कीच सुरक्षित किनाऱ्याला लागेल.

शेवटी, हे लक्षात ठेवले पाहिजे, की तंत्रज्ञान माणसाला पर्याय ठरू शकत नाही, तर ते माणसाला अधिक सक्षम करते. ले-ऑफची भीती बाळगण्यापेक्षा आपण आपल्या ज्ञानाची ’बॅटरी’ सतत चार्ज ठेवली पाहिजे. ही वेळ थांबण्याची नाही, तर अधिक वेगाने धावण्याची आहे. बदल स्वीकारण्याचे धाडस आणि सतत शिकण्याची तहान असलेल्यांसाठी हे ‘एआय’ आणि ‘क्लाउड’चे युग सुवर्णकाळ ठरेल. केवळ कपात नाही, तर बदलपरिवर्तन हाच निसर्गाचा नियम आहे आणि या परिवर्तनाशी जुळवून घेणाराच उद्याचा विजेता असेल. त्यामुळे नव्या युगाचे स्वागत करून तंत्रज्ञानाच्या अथांग महासागरात पोहावे लागणार आहे. त्याला पर्याय नाही. त्यामुळे नोकऱ्यांमध्ये काटछाट होत असल्याच्या बातम्या येणारच, आपल्याला स्वतःला अधिक सक्षम करावे लागणार आहे.

# नद्यांचे पुनरुज्जीवन



✍लीना गाडगीळ

मुळा,मुठा आणि इंद्रायणी या नदीपात्रात सोडलेल्या रसायन मिश्रित आणि मैला युक्त पाण्यामुळे जलपर्णी आणि दास यामुळे हवेली आणि दौंड तालुक्यातील नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांचे आरोग्य, शेती आणि पशुधन यांना धोका निर्माण झाला आहे. यावर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी आरोग्य मंत्री प्रकाश अंबिटकर यांच्याकडे करण्यात आली आहे. त्वरित उपाययोजना न झाल्यास एक मे म्हणजेच महाराष्ट्र दिनी नदीत वाढलेल्या जलपर्णी वर बसून आमरण उपोषण करण्याचा निर्धार नदीकाठच्या गावातील ग्रामस्थ यांनी केला आहे.

सध्या स्थितीत नद्यांचा उपयोग कचराकुंडीप्रमाणे होत आहे. अनेक नद्यांमध्ये पशुवधगृहांचे रक्त मिश्रित पाणी, घराघरांमध्ये सांडपाणी आणि कारखान्याचे रसायन युक्त पाणी सोडले जात आहे. त्यामुळे नद्या मरणासन्न स्थिती पर्यंत पोचलेल्या आहेत. मुंबईतील मिठी नदी पाहिली तर नदी आहे की गटार आहे ही समजत नाही अशी दु:स्थिती झाली आहे. प्रतिवर्षी कोट्यावधी रुपये व्यय करून या नदीतील गाळ काढणे आणि गाळ काढण्याच्या नावाखाली आर्थिक मलिदा लाटणे एवढाच सोपस्कार मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून होत आहे. पंढरपुरात श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्याआधी चंद्रभागेचे दर्शन घेण्याची प्रथा आहे. अनेक संतांचा पदस्पर्श झाल्याने चंद्रभागेची अध्यात्मिक महती मोठी आहे. अशा तीर्थाचेही प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि सरकार संगोपन करू शकले नाहीत. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्यासारख्या थोर संत परंपरेची साक्षीदार असलेली इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा विषय तर विधिमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनामध्ये चर्चेला येतो. अशा नद्यांची गटाराप्रमाणे स्थिती होते हे महाराष्ट्राच्या कर्मदरिद्रीपणाचे लक्षण आहे. या पवित्र नद्या मरणासन्न स्थिती पर्यंत पोहोचणे हे महाराष्ट्राचे पाप आहे. त्यामुळे भविष्यात नद्यांचे पुनरुज्जीवन आणि संवर्धनाचे काम प्रामाणिकपणे करून महाराष्ट्राने पापक्षालन करावे.

राज्यातील नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने अखेर महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण ची स्थापना केली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने वर्ष २०२५ मध्ये सादर केलेल्या अहवालात महाराष्ट्रातील दहा प्रमुख नद्यांमध्ये प्रदूषणाचे ५४ पट्टे आढळले आहेत. या अहवालानुसार मिठी, मुळा,मुठा, भीमा या नद्या अति प्रदूषित म्हणून नोंदवल्या गेल्या आहेत. राष्ट्रीय हरित लवादाने नद्यांमधील प्रदूषण रोखण्यासाठी आणि नद्यांचे पुनरुज्जीवन व्हावे यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने सरकारची कानउघडणी केल्यावर या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. राज्यातील नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा सारखी सक्षम यंत्रणा कार्यरत असताना नद्यांची इतकी दयनीय स्थिती होईपर्यंत हे मंडळ काय झोपा काढत होते का? प्राधिकरण स्थापन झाल्यावर त्याच्या माध्यमातून नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी प्रादेशिक प्रदूषण नियंत्रण मंडळाला दोन हजार कोटी रुपये निधी देण्यात येणार आहे, परंतु यापूर्वी प्रदूषण नियंत्रणासाठी सरकारने जो कोट्यावधी रुपयांचा निधी व्यय केला आहे तो कुठे गेला? राज्यातील नद्यांची इतकी दयनीय स्थिती होईपर्यंत मंडळानी ते रोखले का नाही? जल, वायू, ध्वनी प्रदूषणासाठी स्वतंत्र यंत्रणा असतांना अन्य एक प्राधिकरण निर्माण करण्याची वेळ का आली? याचा अभ्यास व्हायलाच हवा.

एक काळ असा होता की वाटसरू ही नद्यांच्या पाण्याने स्वतःची तहान भागवत होते. आता ही कल्पनाच स्वप्नवत झाली आहे. भावी पिढीला निर्मळ आणि स्वच्छ जलाच्या नद्या पाहायलाही मिळणार नाहीत. हिंदु संस्कृतीमध्ये नद्यांना माता मानले जाते.

गंगा, यमुना, सरस्वती, गोदावरी,नर्मदा,कावेरी,चंद्रभागा,इंद्रायणी, सिंधु या नद्यांच्या नावानेच हिंदूंच्या मनात मातृत्वाची भावना निर्माण होते. नद्यांविषयी असलेल्या पवित्र भावने मुळेच भारतात इतकी वर्ष नद्यांची निर्मळता आणि पवित्रता राखी गेली आहे. त्यामुळे भविष्यकाळात नद्यांच्या पुनरुज्जीवना साठी प्रशासकीय स्तरावरील कारवाईसह नद्यांच्या संवर्धनासाठी हिंदू संस्कृतीचे पुनरुत्थापन यांचा संयोग आवश्यक आहे.

नद्यांना माता म्हणणारी हिंदू-संस्कृती दृढ करणे यातच नद्यांच्या संवर्धनाचे मर्म आहे.

# सावित्रीच्या लेकी, म्हणून ‘लव्ह जिहाद’च्या बळी



✍अतुल कावळे

नाशिकच्या टीसीएस कंपनीत घडलेल्या ‘लव्ह जिहाद’च्या प्रकरणानंतर लागोपाठ परतवाडा, अचलपूर, नागपूर, यवतमाळ, सोलापूर आदि अन्य शहरांमध्ये सुद्धा लव्ह जिहादची अनेक प्रकरणे उघडकीस आली आणि हिंदू समाज हादरून गेला. ह्या घटनांत मोठ्या प्रमाणावर फक्त हिंदू मुलीच बळी पडताना दिसत आहेत.रोज वर्तमानपत्रांत, न्युज चॅनेल्सवर आणि सोशल मीडियावर लव्ह जिहादच्या बातम्या वाचून बघूनही हिंदू मुलींच्या अक्कली कुठे गहाण पडल्या आहेत,अशा प्रतिक्रिया हिंदू समाजातून तीव्रतेने पुढे येत आहेत.हिंदू समाजात ह्या विषयावर विचारमंथन होत आहे पण मार्ग काही सापडत नाही आहे.धर्मशिक्षणाचा अभाव, आधुनिक विचारशैली, अतिरिक्त स्त्री स्वातंत्र्य आदि विविध कारणे सांगितली जातात. ह्या कारणांमुळे हिंदू मुली स्वधर्म आणि संस्कृतीपासून दूर गेल्या आहेत असे निष्कर्ष निघत आहेत. परिणामी हिंदू मुलींना कुणाचाही धाक राहिलेला नाही ह्याबाबतीत मात्र सर्वांचे मतैक्य आहे. पण हा धाक का राहिला नाही त्याच्या मुळाशी असणाऱ्या कारणांचा वेध घेतला तर असे दिसून येईल की हिंदू मुलींना बालपणापासून नको ते आणि नको तेवढे स्वातंत्र्य दिले जात आहे. हे स्वातंत्र्य त्यांना स्त्री पुरुष समानतेच्या नावावर दिले जात आहे. ह्या स्त्री पुरुष समानतेच्या आणि स्वातंत्र्याच्या कल्पनांच्या मुळाशी फुले शाहू आंबेडकर विचारसरणी कारणीभूत आहे. ही विचारसरणी ‘सावित्रीच्या लेकी’ ह्या संकल्पनेच्या आधारे हिंदू मुलींमध्ये पद्धतशीरपणे रुजविली गेली आहे आणि रुजविली जात आहे. ही संकल्पना हिंदू स्त्रियांच्या मुक्तीची आणि स्वातंत्र्याची ग्वाही असल्याची दवंडी पिटली गेली. हिंदू पुरुषांविरुद्ध, हिंदू देवधर्माविरुद्ध, हिंदू प्रथापरंपरांविरुद्ध बंड करणाऱ्या स्त्रियांना ‘सावित्रीच्या लेकी’ अशी उपमा दिली जाऊ लागली. ह्या संकल्पनेला बळी पडून हिंदू स्त्रियांनी अक्षरशः बंड केले आणि तथाकथित स्त्री मुक्ती आणि स्वातंत्र्य मिळवले.

स्वातंत्र्यासोबतच पेहरावात बदल झाला. नऊवारी साडीतल्या स्त्रिया गुडघ्याच्या वर जाणाऱ्या शॉर्ट्सवर आणि पदर नसलेल्या टॉप्सवर आल्या. आपल्यालाच सर्वकाही समजते कारण आपण आधुनिक आणि विज्ञानवादी शिक्षण घेतले आहे असा अभिमान आणि अहंकार हिंदू स्त्रिया बाळगू लागल्या. ह्या अभिमान आणि अहंकाराने स्वातंत्र्य कधी स्वैराचारात बदलत गेले हे कुटुंब, समाज आणि खुद्द स्त्रियांच्याही कधी लक्षात आले नाही. हे सर्व घडत असताना ‘सावित्रीच्या लेकी’ हा उद्घोष मात्र सातत्याने हिंदू स्त्रियांच्या मनीमानसी उतरवणे सुरुच होते आणि सुरू आहे. ह्याचा जो दुष्परिणाम व्हायचा तो झालाच आणि अजूनही होतो आहे. रोज होणारे घटस्फोट, विवाहबाह्य आणि विवाहपूर्व शरीरसंबंध, विवाहास प्रमाणाबाहेर उशीर, करिअरचा हव्यास, आर्थिक आत्मनिर्भरतेचा हव्यास, त्यासाठी बंड करणे, प्रेमात पडणे, पळून जाणे आणि धोके खाणे, लव्ह जिहादला बळी पडणे हे सर्व दुष्परिणाम फक्त ह्या ‘आम्ही सावित्रीच्या लेकी’ ह्या एकमेव संकल्पनेमुळे झाले आहेत.पण हिंदू स्त्रिया ह्या संकल्पनेला कवटाळून घेताना एक गोष्ट मात्र विसरल्या की खुद्द सावित्रीबाई फुले ह्यांनी स्त्री शिक्षणासाठी पुढाकार घेताना, स्त्रियांवरील अत्याचाराविरुद्ध आवाज उठवताना कपाळावरील कुंकू आणि गळ्यातील मंगळसूत्र काढून ठेवले नव्हते.सावित्रीबाईंनी आपल्या पातिव्रत्याचा त्याग नव्हता केला. अंगप्रदर्शन करणारे पाश्चात्य धाटणीचे वस्त्र परिधान नव्हते केले. स्त्रियांना शिक्षणासाठी आवाहन करतानाही त्यांनी देवी सरस्वतीला वंदन करूनच आवाहन केले. पण त्याच सावित्रीच्या लेकी म्हणवून घेणाऱ्या आधुनिक काळातल्या स्त्रिया मात्र नेमके त्याच्या उलट करतात. त्यामुळेच सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणासाठी भलेही कितीही कष्ट घेतले असले तरीही त्यांच्याच नावाने हिंदू स्त्रियांना मात्र भरकटविण्याचेच काम तथाकथित स्त्रीमुक्तीवाल्यांनी आणि पुरोगाम्यांनी केले.

आज परिस्थिती इतकी हाताबाहेर गेली आहे की हिंदू धर्म, संस्कृती, प्रथा परंपरा आणि स्त्रियांच्या संरक्षणासाठी पुन्हा स्त्रियांवर हिंदू समाजाने काही समाजपयोगी बंधने घालण्याचा प्रयत्न केला तर हिंदू स्त्रिया पेटून उठतील आणि स्त्री पुरुषांत प्रचंड संघर्ष होऊन उरलीसुरली संस्कृतीही कायमची लयाला जाईल. हिंदूंच्या शत्रूंनाही नेमके तेच हवे होते आणि हवे आहे. त्यासाठीच हिंदू स्त्रियांना लक्ष्य करण्यात आले होते ज्यात ते आज प्रचंड यशस्वी झाले आहेत.

स्त्रिया ह्या मुळातच भावनाशील असल्याने कोणत्याही चुकीच्या गोष्टी समाजात घडवून आणण्यासाठी त्या सॉफ्ट टार्गेट असतात. हिंदू विरोधकांनी नेमके तेच साधले आहे. हिंदू पुरुषांना खलनायक म्हणून इतके रंगविण्यात आले आहे की तो आता हिंदू स्त्रियांच्या चुकीच्या गोष्टींवरही त्यांचा विरोध करू शकत नाही, त्यांना चार समजुतीच्या गोष्टी सांगू शकत नाही. कुणी तसा प्रयत्न केला तर त्याला लगेच स्त्रीविरोधी ठरवून हिंदू स्त्रिया मोकळ्या होतात.

‘सावित्रीच्या लेकी’ म्हणून हिंदू मुलींचे अगदी लहानपणापासून ब्रेनवॉश करण्यात आले आणि आजही केले जाते. प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत पाठ्यपुस्तकांतूनच हिंदू पुरुषांनी हिंदू स्त्रियांवर किती आणि कसे अत्याचार केले हे शिकवले जाते आणि त्यांचे ब्रेनवॉश केले जाते. अशा शिक्षणातून हिंदू मुलींची हिंदूधर्म आणि हिंदू पुरुषविरोधी मानसिकता तयार केली जाते.

कोवळ्या वयापासून सुरू झालेले हे ब्रेनवॉशिंग पुढे वयात आल्यावर बंडखोरीत बदलते.मागच्या पिढीतील मुलींनी सुद्धा आता आई झाल्यावर आपल्या सुप्त स्वातंत्र्याच्या आकांक्षा मुलींच्या रूपात पूर्ण करणे सुरू केले आहे आणि त्याचेच दुष्परिणाम मुलींच्या स्वैराचारात झाले आहे. म्हणून हिंदू मुली अगदी सहज जिहाद्यांच्या गळाला लागत आहेत. म्हणूनच ‘सावित्रीच्या लेकी’ ही संकल्पनाच आधी समाजातून पूर्णपणे हद्दपार करावी लागेल आणि त्याऐवजी सीता, जिजामाता, अहिल्यादेवी ह्यांच्या लेकी ही संकल्पना समाजात रुजवावी लागेल. तरच पुढील पिढीतील हिंदू मुलींचे होणारे ब्रेनवॉश थांबेल आणि त्या जिहाद्यांना बळी पडणार नाहीत.

मो. क्र.९७३०५३५१९६

# योजनांच्या उत्कृष्ट अंमलबजावणीमुळेच राज्य प्रगतीशिलः पालकमंत्री

## थकीत पात्र शेतकऱ्यांना मिळणार कर्जमाफीचा लाभ, पीएम किसान व सन्मान निधीतून १२९ कोटीचे सहाय्य

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर विकासाच्याबाबतीत राज्याने सर्वच क्षेत्रात आघाडी घेतली आहे. शेती, सिंचन, ऊर्जा, जलसंधारण, रोजगार, उद्योग अशा सर्वच क्षेत्रात भक्कमपणे काम केले. गेल्याकाही वर्षात सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी अनेक योजना आणल्या आणि चांगल्यापणे राबविल्या. त्यामुळेच आज एक प्रगतीशिल राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. जिल्ह्यात देखील विकासाचे विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापनादिनानिमित्त पालकमंत्र्यांच्याहस्ते पोलिस कवायत मैदानात ध्वजारोहण झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीपती मोरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीस पालकमंत्र्यांनी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेसाठी शहीद झालेल्या तसेच राज्य स्थापनेसाठी पुढाकार घेणाऱ्या सर्वांना अभिवादन केले.शेतकरी कर्जमुक्त झाला पाहिजे, या भावनेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली. पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयापर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना देखील ५० हजार रुपयापर्यंत प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे, असे पालकमंत्री म्हणाले.

नुकत्याच संपलेल्या वर्षात ५५ हजार शेतकऱ्यांना ८८८ कोटी रुपयांचे पिककर्ज वाटप करण्यात आले. यावर्षी १ हजार १०० कोटी रुपयांच्या पीककर्ज वाटपाचे आपले उद्दिष्ट आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेप्रमाणेच राज्य शासनाने 'नमो शेतकरी महासन्मान निधी योजना' सुरु केली. या दोनही योजनेतून प्रतिवर्षी १२ हजार रुपयांचे अर्थसहाय्य दिले जात आहे. गेल्यावर्षी जिल्ह्यातील १ लाख २९ हजार शेतकऱ्यांना १२९ कोटी रुपयांचे सहाय्य वाटप करण्यात आले.शेतकऱ्यांचा विजेचा भार कमी करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेद्वारे जिल्ह्यातील ८२ हजारावर पात्र शेतकऱ्यांना १४३ कोटींची वीज बिल माफी देण्यात आली आहे. बोर आणि धाम या प्रकल्पाची सिंचन क्षमता वाढविण्यासाठी शासनाकडून ४२९ कोटी रुपयांचा निधी आपण मंजूर करून घेतला. यातून प्रकल्पाच्या वितरण व्यवस्थेची कामे होणार आहे.

प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे उद्योग उभे राहिले. यातील १ हजार ७२ उद्योगांना २४ कोटी रुपयांचा कर्जपुरवठा करण्यात आला. ८५० पेक्षा जास्त उद्योग कार्यान्वित झाले. या उद्योगांना ९ कोटींचे अनुदान देण्यात आले आहे.बोर व्याघ्र प्रकल्पाला निसर्ग पर्यटनाची जोड देण्यासाठी आपण बोरधरण निसर्ग पर्यटनस्थळ म्हणून विकसित करतो आहे. यासाठी १० कोटी २३ लक्ष रुपयांची विकास कामे मंजूर करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये आपण सीसीटीव्ही कॅमेरे बसवतो आहे. त्यापैकी ९०० शाळांमध्ये कॅमेरे बसविण्यात आले. प्राथमिक शाळा आपण आदर्श शाळा करतो आहे. पहिल्या टप्प्यात ८ शाळांमध्ये आदर्श शाळा उपक्रम राबविला जात आहे. वर्धा येथे लघु न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेसह सुसज्ज निवासी न्याय सहायक वैज्ञानिक प्रशिक्षण केंद्र सुरु करतो आहे. त्यासाठी ११ कोटी ९७ लाखाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. गेल्यावर्षी वर्धा, हिंगणघाट व देवळी शहरात सीसीटीव्ही बसविण्यासाठी १० कोटी ६५ लाख रुपये आपण दिले. यावर्षी पुलगाव व आर्वी शहरासाठी १० कोटी मंजूर



करण्यात आले आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय हिंगणघाट, पोलिस स्टेशन हिंगणघाट व आर्वीच्या इमारत बांधकामासाठी १२ कोटी ९६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून बांधकामे सुरु असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.जिल्ह्यात नव्याने ७ ठिकाणी पोलिस स्टेशनच्या प्रशासकीय इमारतींसह १० ठिकाणी ५१६ निवासस्थाने बांधण्याकरीता मंजुरी देण्यात आली आहे. जिल्हा पोलिस दलाला विविध प्रकारची ३० अत्याधुनिक वाहने खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.देशाच्या १६ व्या जनगणनेची प्रक्रिया सुरु झाली आहे. पहिला टप्पा १ ते १५ मे या कालावधीत पार पडणार आहे. जनगणनेच्या इतिहासात पहिल्यांदाच नागरिकांना जनगणनेच्या प्रक्रियेत सहभागाची संधी उपलब्ध झाली आहे. पहिल्या टप्प्यात डिजीटल स्वरुपात होणाऱ्या स्व-गणनेत नागरिकांनी सहभागी होऊन राष्ट्रीय कार्यात आपले योगदान द्यावे. आरोग्य विभागाच्यावतीने 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' हे अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्याला निरोगी, सशक्त व समृद्ध बनविण्यासाठी प्रत्येकाने अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन देखील याप्रसंगी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.ध्वजारोहणानंतर पालकमंत्र्यांनी पोलिस परेडचे निरिक्षण केले. पोलिस दलाच्यावतीने मानवंदना देण्यात आली. विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा पालकमंत्र्यांच्याहस्ते सत्कार तथा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास अधिकारी, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ३००० रुपयांच्या आमिषातून २२ लाखांचा काळा खेळ!

## खात्याचा गैरवापर, धमक्यांचा थरार; फसवणुकीचा पर्दाफाश

**वर्धा/जनमाध्यम**

फायनान्स कामासाठी खाते लागते, काहीच धोका नाही, या गोड बोलण्यावर विश्वास ठेवणाऱ्या एका निरागस तरुणाला तब्बल २२ लाखांच्या काळ्या व्यवहाराच्या भोवऱ्यात ओढल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बोरगाव (मेघे) येथील तरुणाने शहर पोलीस ठाण्यात धाव घेतली असून, तन्मय भगत व त्याचा साथीदार सनी होलानी यांच्या विरोधात गंभीर आरोप केले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी प्रथम ३००० रुपये मिळतील या आमिषाने तरुणाला जाळ्यात ओढले. त्यानंतर त्याच्याकडून आधार, पॅन कार्ड व इतर कागदपत्रे घेऊन बँकेत खाते उघडण्यात आले. एवढ्यावरच न थांबता एटीएम कार्ड व सिमकार्डही आरोपींनी स्वतःकडे घेत खात्यावर पूर्ण ताबा मिळवला. काही दिवस सर्व काही सुरळीत असल्याचे भासवून आरोपींनी मोठा डाव साधला.दरम्यान, संबंधित खात्यातून अचानक मोठ्या प्रमाणात व्यवहार सुरू झाले. तब्बल २२ लाख ३२ हजार रुपयांची उलाढाल या खात्यातून झाल्याचे समोर आले. विशेष म्हणजे, या व्यवहारांची खातेदाराला कोणतीही माहिती नव्हती. संशयास्पद हालचाली लक्षात येताच बँकेने खाते गोठवले, तेव्हा या संपूर्ण घोटाळ्याचा पर्दाफाश झाला.

या प्रकाराने हादरलेल्या तरुणाने आरोपींकडे जाब विचारला असता, उलट आरोपींनी त्याच्यावरच ४० हजार रुपयांची मागणी करत पैसे दिले नाहीत तर पाहून घेऊ' अशी उघड धमकी दिली. एवढेच नव्हे, तर त्याच्या घरी जाऊन कुटुंबीयांनाही धमकावण्यात आल्याचे समोर आले आहे.या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, 'भाड्याने खाते' देण्याच्या नावाखाली सुरू असलेल्या बेकायदेशीर रॅकेटचा हा भाग असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शहर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे फिरवली असून, आरोपींचा शोध सुरू आहे.दरम्यान, नागरिकांनी आपली बँक खाती, एटीएम व सिमकार्ड कोणालाही देऊ नयेत, अन्यथा अशा फसवणुकीचे बळी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा इशाराही देण्यात येत आहे.

# पटेल चौकात सट्ट्याचा सुळसुळाट, पानपट्टी आड जुगार अड्डा

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई : ६ जणांना अटक

**वर्धा/जनमाध्यम**

शहराच्या मध्यवर्ती पटेल चौकात दिवसाढवळ्या सुरू असलेल्या सट्टा-पट्टीच्या अवैध साम्राज्यावर अखेर स्थानिक गुन्हे शाखेने धाड टाकली. एस. के. पानठेल्याच्या मागील आडोशाला चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर टाकलेल्या धडक रेडमध्ये तब्बल ३६,४९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सहा जणांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस निरीक्षकांच्या आदेशानुसार वर्धा उपविभागात अवैध व्यवसायांवर नियंत्रण मिळवण्यासाठी पेट्रोलिंग करत असताना मुखबिराकडून धक्कादायक माहिती मिळाली.



पटेल चौकातील एका पानठेल्याच्या मागे काही इसम सट्टा-पट्टीचे आकडे लिहून पैशांचा हारजीतीचा जुगार खेळत असल्याचो उघड झाले.मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने सापळा रचत जुनी नगर परिषद इमारतीखालील जागेवर छापा टाकला. तेथे शेख शहजाद उर्फ समीर सलाम शेख हा आपल्या साथीदारांसह सट्टा-पट्टी चालवत असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी क्षणार्धात घेराव घालत रेड केली आणि सर्व आरोपींना जागीच ताब्यात घेतले.या कारवाईत २८,४९० रुपये नगदी, सट्ट्याचे आकडे लिहिलेले कागद, दोन निळे डॉट पेन, एक अँड्रॉईड मोबाईल व एक कीपॅड मोबाईल असा एकूण ३६,४९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पकडण्यात आलेल्या आरोपींमध्ये शेख शहजाद उर्फ समीर सलाम शेख (वय ३५), निशाद अली शौकत अली (वय ३८), नवयुग नामदेव नगराळे (वय ६३), रितेश शत्रुधन नाखले (वय ३६), प्रशांत शंकरराव जामनकर (वय ३६) आणि सुजीत वसंतराव सोनुले (वय ४९) यांचा समावेश आहे.या सर्वांविरुद्ध पोलीस स्टेशन वर्धा (शहर) येथे गुन्हा क्रमांक ५२८/२०२६ अंतर्गत महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १२(अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशीव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक विजय सिंह गोमलाडू व त्यांच्या पथकाने ही मोहीम यशस्वी केली.दरम्यान, शहराच्या मध्यभागी अशा प्रकारे खुलेआम जुगार सुरू असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, पोलीसांची ही कारवाई कौतुकास्पद असली तरी असे अड्डे आधीच कसे फोफावले असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

# पीएम श्री गांधी विद्यालयाचा जिल्ह्यात द्वितीय क्रमांक

## स्टुडंट पोलीस कॅडेट उपक्रमात उल्लेखनीय कामगिरी

**आर्वी/जनमाध्यम**

शैक्षणिक गुणवत्तेसोबतच सामाजिक भान आणि शिस्त यांचा संगम साधणाऱ्या पीएम श्री नगरपरिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक गांधी विद्यालयाने स्टुडंट पोलीस कॅडेट (SPC) उपक्रमात जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळवत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या यशामुळे विद्यालयाच्या कार्याचा जिल्हाभर गौरव होत आहे.

विद्यालयात तालुक्यातील एकमेव एनसीसी युनिट कार्यरत असून, एनसीसीमध्ये सहभागी होऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्टुडंट पोलीस कॅडेट हा उपक्रम प्रभावी पर्याय ठरत आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिस्त, नेतृत्वगुण, तसेच कायदा व सुव्यवस्थेबाबत जागरूकता



निर्माण केली जाते. पोलीस स्टेशन आर्वी व पोलीस अधीक्षक कार्यालय, वर्धा यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर विविध उपक्रम राबवले जातात, ज्यात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग असतो.महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित सन्मान सोहळ्यात कुमारी अदिती अंगाईतकर आणि श्रद्धा कळंबे या विद्यार्थिनींना त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. त्यांच्यासोबत मार्गदर्शिका शिक्षिका स्मिता बिजवे यांचाही गौरव करण्यात आला. पोलीस अधीक्षक वर्धा यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन हा सन्मान करण्यात आला.या यशाबद्दल नगराध्यक्ष स्वाती गुल्हाने, उपाध्यक्ष गौरव जाजू, मुख्याधिकारी डॉ. किरण सुकलवाड, प्राचार्य विश्वेश्वर पायले, पर्यवेक्षिका ज्योती अजमेरे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यालयाच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून, भविष्यातही अशीच कामगिरी करण्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# हिंदी विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहात; कुलगुरूंच्या हस्ते ध्वजारोहण

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनानिमित्त महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठात ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यापीठाच्या वाचस्पती भवन प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकावण्यात आला.

कार्यक्रमाला विद्यार्थी कल्याण व संस्कृती विभागाचे अधिष्ठाता प्रो. अवधेश कुमार, कुलसचिव कादर नवाज खान, वित्त अधिकारी पी. सरदार सिंह यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कार्यक्रमाची सुरुवात 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताने झाली. डॉ. तेजस्वी एच. आर. आणि शिल्पा यांनी राष्ट्रगीत सादर केले. त्यानंतर कुलगुरूंच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यापीठाच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी बँडच्या माध्यमातून राष्ट्रगान सादर करत वातावरण देशभक्तीने भारावून टाकले. यानंतर 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' हे महाराष्ट्र



गीत सादर करण्यात आले.यावेळी कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी उपस्थितांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देत राज्याच्या स्थापनेचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित केले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली असून मराठी भाषा, संस्कृती आणि अस्मिता जपण्याचे ते प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी संविधानातील मूल्ये अंगीकारून देशाची एकता, अखंडता आणि प्रगतीसाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाने देशभक्ती व सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.

# भिवापूर-सारवाडी येथे हातभट्ट्यांवर कारवाई

## २०.१५ लाखांचा मुद्देमाल नष्ट

**तळेगाव (शा.पं.)/जनमाध्यम**

पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या भिवापूर-सारवाडी येथील बेड्यावर स्थानिक गुन्हे शाखा, वर्धा आणि आर्वी उपविभागाच्या पथकाने संयुक्त कारवाई करत गावठी मोहा दारू निर्मितीवर आळा घातला. दारूबंदी कायद्यांतर्गत राबविण्यात आलेल्या 'वॉशआउट मोहिमे'त एकूण २० लाख १५ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला.

पोलीस अधीक्षकांकडे प्राप्त झालेल्या माहितीनुसार, सदर परिसरात मोठ्या प्रमाणात हातभट्ट्या लावून मोहा दारू तयार केली जात असल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुसार संबंधित यंत्रणांना तातडीने कारवाईचे आदेश देण्यात आले.३० एप्रिल रोजी सकाळी



साडेसहा वाजताच्या सुमारास पथकाने छापा टाकून हातभट्ट्यांवर कारवाई केली. या वेळी ६४ ड्रममध्ये साठवलेले १२,८०० लिटर मोहा सडवा रसायन (किंमत १९.२० लाख रुपये), ६४ ड्रम (६४ हजार रुपये) तसेच जर्मन घमेले, जळाऊ लाकूड आदी साहित्य (२१,१०० रुपये) असा एकूण २०.१५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. आवश्यक नमुने रासायनिक तपासणीसाठी जप्त करून उर्वरित साहित्य घटनास्थळीच नष्ट करण्यात आले.या प्रकरणी चार गुन्हे नोंदवून मंगेश पवार, सुतेश भोसले, रवेश पवार, साधना भोसले आणि रुशिता चव्हाण (सर्व रा. सारवाडी बेडा) यांच्याविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.सदर मोहिमेसाठी सात अधिकारी आणि ४० अंमलदारांचा सहभाग होता. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर ढोले, पोलीस निरीक्षक विनोद चौधरी व सहायक पोलीस निरीक्षक मंगेश भोयर यांनी ही कारवाई केली.

# नाफेड'ची दारे बंद शेतकऱ्यांचा चणा अडकला

## मुदतवाढीसाठी खा.अमर काळे आक्रमक

**वर्धा/अमरावती जनमाध्यम**

राज्यातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न ठरलेल्या चणा खरेदीप्रकरणी पुन्हा एकदा प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा फटका बसत आहे. नाफेड मार्फत सुरू



असलेली खरेदी प्रक्रिया अचानक थांबल्याने हजारो शेतकऱ्यांचा चणा विक्रीविना घरात पडून आहे. या अन्यायकारक परिस्थितीविरोधात खासदार अमर काळे यांनी आक्रमक भूमिका घेत तातडीने खरेदी कालावधी वाढवण्याची मागणी केली आहे.

यंदा चन्याचे उत्पादन चांगले झाले, बाजारभावही हमीभावाच्या आसपास पोहोचले; मात्र खरेदी केंद्रांवरील तांत्रिक अडचणी, संथ नोंदणी प्रक्रिया आणि मर्यादित क्षमतेमुळे शेतकऱ्यांना वेळेत माल विकता आला नाही. अनेक ठिकाणी खरेदी प्रक्रिया वारंवार खंडित झाल्याने शेतकऱ्यांचा संयम सुटत चालला आहे. शेवटी नाफेडने खरेदी बंद केल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. दरम्यान, या गोंधळाचा फायदा व्यापाऱ्यांनी उचलत शेतकऱ्यांचा चणा पडत्या दरात खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची उघड लुबाडणूक होत असून त्यांच्या कष्टाचे मोल अक्षरशः मातीमोल होत आहे. हा प्रकार सहन केला जाणार नाही, असा इशारा खासदार काळे यांनी दिला आहे. या मागण्याही त्यांनी ठामपणे मांडल्या आहेत. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर हा प्रश्न अधिक चिघळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.शेतकऱ्यांच्या डोळ्यातील आशा आता प्रशासनाच्या निर्णयावर खिळून आहे; अन्यथा चण्याचे दाणेच त्यांच्या डोळ्यातील अश्रूंमध्ये विरघळण्याची वेळ येईल, अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# पालकमंत्री यांच्याहस्ते फिरत्या विक्री केंद्राचे लोकार्पण

## उमेदच्या ७ प्रभाग संघाना विक्री केंद्राचे वितरण

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत समुहातील महिलांनी तयार केलेल्या उत्पादनाला ग्रामीण भागात तसेच तालुक्यात मोक्याच्या ठिकाणी बाजारपेठ मिळावी यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या नाविण्यपूर्ण योजनेतून ७० लक्ष रुपये खर्च करून तयार करण्यात आलेल्या वर्धिनी फिरते विक्रीय केंद्राचे लोकार्पण व वितरण पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते करण्यात आले.

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने



जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात या फिरते विक्री केंद्राच्या लोकार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी वान्मयी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधिक्षक सौरभ कुमार अग्रवाल. ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक वैशाली रसाळ, उमेदचे अभियान व्यवस्थापन निरज नखाते, प्रभाग संघाच्या महिला उपस्थित होत्या.उमेदच्यावतीने जिल्हा नियोजन समितीच्या नाविण्यपूर्ण योजनेतून ७० लक्ष रुपये खर्च करुन चारचाकी मालवाहनाचा उपयोग करुन ७ फिरते विक्री केंद्र तयार करण्यात आले. या फिरते विक्री केंद्रावर स्वयंसहाय्यता समुहाने उत्पादित केलेल्या वस्तूची विक्री शहर व ग्रामीण भागातील मोक्याच्या ठिकाणी करण्यात येणार आहे.

सदर विक्री केंद्राचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते प्रभाग संघाना हस्तांतरण करण्यात आले.

फिरत्या विक्री केंद्रामुळे महिलांच्या उत्पादनाला बाजारपेठ मिळेल आणि त्यांना अधिक जोमाने काम करण्याची उर्जा मिळेल, असे यावेळी बोलतांना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प संचालक वैशाली रसाळ यांनी केले. लोकार्पणानंतर पालकमंत्र्यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून वाहने प्रभागसंघांना सुपुर्द व प्रभाग संघाच्या ठिकाणी रवाना करण्यात आले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष- १४ अंक १५५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com


जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मोत्सव

**यावली शहीद-** अखिल विश्वाला मानवतेचा संदेश देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्मोत्सव त्यांची जन्मभूमी असलेल्या यावली शहीद गावात ब्रह्ममुहूर्तावर उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे संयोजक डॉ. देवेंद्र यादव तर संचालक श्रीकृष्ण पखाले होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती खा. बळवंत वानखडे, आ.राजेंद्र वानखडे, माजी मंत्री एड यशोमती ठाकूर व अन्य मान्यवर उपस्थित होते. तसेच यात हजारोंच्या संख्येने गुरुदेव भक्त सहभागी झाले. त्यानंतर सकाळी ६ वा. मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम ग्रामनाथांचा सत्कार करण्यात आला. नंतर सकाळी ६. ३० ला भव्य ग्राम प्रदक्षिणा व स्पर्धात्मक पालखी दिंडी सोहळा,१०. ३०ला ह. भ. प.श्री. लक्ष्मण दास काळे महाराज यांची काल्याचे कीर्तन,दुपारी १ वा. महाप्रसाद,रात्री ७. ३० ऐतिहासिक सत्यावर आधारित दोन अंकी नाटक ज्योतिबाची सावली सावित्री माऊली तसेच सोबत ग्राम जयंती महोत्सवाच्या निमित्ताने यावली शहीद मध्ये दिवसभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मोत्सव समिती व सर्व गावकऱ्यांच्या वतीने हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



### पी.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात

**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे १ मे महाराष्ट्र दिन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली त्यानिमित हा दिवस महाराष्ट्र दीन म्हणून दरवर्षी अभिमानाने साजरा केला जातो.कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या प्रशस्त प्रांगणात ध्वजारोहण समारंभ पार पडला. पी आर. पोटे पाटील इंजिनिअरिंग व मॅनेजमेंट कॉलेजचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत गायन करून देशभक्ती व राज्याभिमान व्यक्त केला.या प्रसंगी ग्रुपमधील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेची आणि विकासातील योगदानाची आठवण करून देत एकात्मतेचा संदेश देण्यात आला.



### 'महाराष्ट्र दिना' निमित्त ध्वजारोहण

**अंजनगाव बारी-** ग्रामवासीयांच्या संयुक्त विद्यमाने १ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन साजरा करण्यात आला. ध्वजारोहणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.यावेळी बीएसएफचे जवान संदीप भास्कर वासनिक यांचा शाल व श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. राष्ट्रसेवेमधील योगदानाबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.तसेच जिल्हा परिषद शाळा, वडगाव जिरे येथील विद्यार्थ्यांचा विविध गुणवंत कामगिरीबद्दल सत्कार झाला.कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोहर मारोडकर, शिक्षक शिवलाल बोरकर, निशा सोयाम, किसनराव मात्रे, किसनराव जेवढे, सरपंच घनश्याम ब्राह्मणे, उपसरपंच गोलू मडके, प्रवीण अरक, संदीप वासनिक, दिनेश म्हात्रे, दीपक लहाबर, संदीप म्हात्रे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### अरूणोदय इंग्लिश स्कूल व ज्यू. कॉलेज ऑफ सायन्स येथे महाराष्ट्र दिन

**अमरावती-** व्ही.एम.व्ही. परिसरातील अरुणोदय इंग्लिश स्कूल व ज्यू. कॉलेज ऑफ सायन्स, हर्षराज कॉलनी, अमरावती येथे महाराष्ट्रदिनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. अरूणोदय शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. भारती लुंगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. वंदे मातरम्, महाराष्ट्र गीताचे सामूहिक गायन केले.याप्रसंगी अरूणोदय ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या विशाखा नाफडे, उपप्राचार्या सीमा कुथे, अरुणोदय इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका शिल्पा पाजनकर, उपमुख्याध्यापिका निता काळमेघ, कार्यालयीन अधीक्षिका रेखा राऊत, व शाळेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## निधन

### रामचंद्रजी मारोटकर



**कुऱ्हा** - तिवसा तालुक्यातील मार्डी येथील जेष्ठ नागरिक रामचंद्रजी राघुजी मारोटकर यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, स्नुषा, जावाई, नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्व रामचंद्र मारोटकर यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरातील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.

### सुमन देशमुख



**लेहेगाव-** नजीकच्या धामणगाव (काटपुर) येथील प्रतिष्ठित नागरिक तसेच सेवानिवृत्त पोलीस उपविभागीय अधिकारी विलासराव मधुकरराव देशमुख यांच्या मातोश्री सुमनताई मधुकरराव देशमुख यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले त्यांचे मागे चार मुलं नातवंड सुना असा मोठा आप्तपरिवार होता त्यांचा अंत्यविधी धामणगाव (काटपुर) येथील हिंदू स्मशानभूमी येथे झाला. त्यावेळी समाज बांधव मित्र परिवार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्याच्या कृषी-औद्योगिक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानावर भर-बाबासाहेब पाटील

**अमरावती/का.प्र.**




शेती व उद्योग क्षेत्रात आधुनिकतेची कास धरीत जिल्ह्याने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे आणि त्यांना आर्थिक सुरक्षा मिळावी यासाठी शासनाने अनेक महत्त्वाच्या योजना कार्यान्वित केल्या आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे आणि उद्योग क्षेत्राचा विकास करून जिल्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या निमित्ताने पोलीस मुख्यालय, अमरावती शहर परेड मैदान येथे मुख्य शासकीय समारंभझाला. यावेळी सहकार मंत्रा बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे,विभागीय आयुक्त अजय लहाने, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, पोलीस अधीक्षक विशाल आनंद आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. पाटील म्हणाले, राज्याच्या अर्थव्यवस्थेत शेतकरी हा महत्त्वाचा घटक आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. राज्य शासनाने पीक कर्जासाठी २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केली आहे. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान दिले जाणार असून ही प्रक्रिया लवकरच प्रत्यक्ष सुरू होणार आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित १ लाख १५ हजार ८६२ शेतकऱ्यांना ७४५ कोटी रुपयांची मदत थेट खात्यात जमा करण्यात आली आहे. तसेच प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २२ वा हप्ता २ लाख ७१ हजार ७६२ शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आला आहे. कृषी यांत्रिकीकरणासाठी १४.८५ कोटी रुपये खर्चून २ हजार ९८ शेतकऱ्यांना यंत्र व औजारे खरेदीसाठी मदत केली आहे. मोर्शी आणि वरुड येथील सिट्रस इस्टेटमध्ये आता एआय (AI) आधारित तंत्रज्ञान राबविले जाईल. सिंचनासाठी 'प्रती थेंब अधिक पीक' योजनेत ३ हजार ५५९ आणि मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेत २ हजार १५३ लाभार्थींची निवड झाली आहे.प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेत अमरावती जिल्ह्याने राज्यात दुसरा क्रमांक पटकावला असून ही जिल्हावासियांसाठी अभिमानाची बाब आहे.

अमरावतीमध्ये 'पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क' आणि विमानतळावरील नाईट लँडिंग सुविधेमुळे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. औद्योगिक वसाहतीत आयटी पार्क आणि आशियातील सर्वात मोठे पायलट प्रशिक्षण केंद्र आकारास येत आहे. रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत १ हजार ५५ कर्ज प्रकरणे मंजूर झाली असून, यात ६३३ महिला उद्योजिकांचा समावेश आहे.आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक कल्याण आरोग्य विभागातर्फे महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार आणि आयुष्मान कार्ड वाटप सुरू आहे. मेळघाटातील माता-बालमृत्यू दर शून्यावर आणण्यासाठी 'मेळघाट परिक्रमा' उपक्रम राबविला जात आहे.

महिलांसाठी 'पिंक ई-रिक्षा', 'आई' योजना आणि 'लाडकी बहीण' योजनेद्वारे आर्थिक सक्षमीकरण केले जात असून, जिल्हा 'बालविवाहमुक्त' करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. पर्यटन क्षेत्रात चिखलदरा येथील स्कायवॉक पूर्ण करण्यावर भर दिला जात असून आमझरी गावाची 'मधाचे गाव' म्हणून निवड झाली आहे. तसेच, संत गाडगेबाबांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट' विकसित करण्याची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. देशाच्या पहिल्या डिजिटल जनगणनेत नागरिकांनी अचूक माहिती भरून सहकार्य करावे, असे आवाहन पाटील यांनी यावेळी केले. महाराष्ट्र दिनानिमित्त आणि जागतिक कामगार दिनानिमित्त त्यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

**पुरस्कार वितरण सोहळा**

विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सन २०२४-२५ या वर्षासाठी 'विशेष जिल्हा युवा पुरस्कार' नाळ चित्रपट फेम बालकलाकार श्रीनिवास पोकळे, युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य केल्याबद्दल युवक गटातून अमर वानखडे (तिवसा), युवती गटातून जानव्ही राऊत (नया वाठोडा) तसेच संस्था गटातून श्री. संताजी बहुउद्देशीय शिक्षण संस्था (गुरुकुंज आश्रम) यांना सन्मानित करण्यात आले.

यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा प्रचार, व्यसनमुक्ती, रक्तदान आणि आदिवासी विकास क्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे.सन २०२५-२६ या वर्षासाठी युवक गटात समाजप्रबोधनकार वेदांत मुंदाने (अमरावती), युवती गटात पुजा गुंजरकर (ब्राम्हणवाडा थडी) आणि संस्था गटात स्वामी विवेकानंद विचार मंच (अचलपूर) यांना सन्मानित करण्यात आले. याशिवाय अपर आयुक्त सुरज वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, सहायक ग्रंथालय संचालक राजेश पाटील, सहायक ग्रंथालय संचालक सुरजकुमार मडावी, अधीक्षक अभियंता मंगेश पाटील, महसूल सहायक मनीषा ढोके, शिक्षिका रितू तळमळे, ग्राम महसूल अधिकारी पवन मुंडे, जिल्हाधिकारी कार्यालयाचे संजय अंबाडेकर, जिल्हा महिला व बालविकास कार्यालयाच्या सुमेधा बारलिंगे, मंजिरी महाजन, संध्या साउरकर, कविता पाचघरे,पोलीस निरीक्षक निलेश गावंडे, राखीव पोलीस उपनिरीक्षक श्रीधर गुळसुंदरे, पोलीस उपनिरीक्षक योगेश श्रीवास, अजय मिश्रा, प्रवीण काळे, सहायक पोलीस उपनिरीक्षक विजय पेठे, होमगार्ड सैनिक राजेंद्र शाहाकार, पोलीस हवालदार राजेश कोचे, राजीव बाहेनकर, दीपक सुंदरकर, शंकर बावनकुळे,पंकज गावंडे, उज्ज्वल सामुद्रे, सुरक्षारक्षक शिवकुमार तायडे यांना उत्कृष्ट कार्याबाबत यावेळी गौरविण्यात आले. प्रारंभी विविध शासकीय विभागामार्फत परेड संचलन करण्यात आले. मंत्री पाटील यांनी परेड संचलनाचे निरीक्षण केले. परेडचे संचलन परेड कमांडर उपविभागीय पोलीस अधिकारी सागर भामरे तसेच दुय्यम परेड कमांडर राखीव पोलीस निरीक्षक श्रीधर गुळसुंदरे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन देशमुख यांनी केले.



### जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजवंदन

**अमरावती-** जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या स्थापनानिमित्त आज जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.यावेळी राष्ट्रध्वज वंदन, राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीतानंतर जिल्हाधिकारी येरेकर यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, जिल्हा खनीकर्म अधिकारी प्रणिता चाफले, तहसिलदार निलेश खटके, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### तहसील कार्यालयात आ. सुलभा खोडके यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण

**अमरावता-** महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या वर्धापन दिनानिमित्त तसेच महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाचे औचित्य साधून तहसील कार्यालय, अमरावती येथे उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहण कार्यक्रम झाला.या प्रसंगी अमरावती विधानसभा मतदारसंघाच्या माननीय आ. सुलभा खोडके यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या थोर महापुरुषांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प व्यक्त केला.या कार्यक्रमास अनिल भटकर, उपविभागीय अधिकारी, अमरावती,विजय लोखंडे, तहसीलदार, अमरावती,सुनील रासेकर, नायब तहसीलदार, अमरावती,टीना चव्हाण, तहसीलदार, श्रीकृष्ण गाडेकर, राजेश दवणे तसेच तहसील कार्यालयातील मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि देशभक्तिपर वातावरणात पार पडला. यावेळी उपस्थितांनी महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीसाठी आणि जनसेवेच्या कार्यात अधिक तत्परतेने योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला.

### त्रिवेणी प्री प्रायमरी शाळेत महाराष्ट्र दिन



**अमरावती-** त्रिवेणी प्री प्रायमरी शाळा, अर्जुन नगर, अमरावती या शाळेत महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या वर्धापन दिनोत्सवानिमित्त शाळेच्या संचालिका धनेश्वरी धकाते यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन तिरंग्यास मानवंदना देण्यात आली. धनेश्वरी धकाते यांनी यावेळी उपस्थित सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रध्वज वंदन, राष्ट्रगीत व राज्यगीत झाले. यावेळी शाळेची विद्यार्थिनी स्वरा वानखडे हिने महाराष्ट्र दिनाचे महत्त्व सांगणारे प्रभावी भाषण दिले. कार्यक्रमाचे संचालन मुख्याध्यापिका सृष्टी पाटील यांनी केले, तर आभारप्रदर्शन रोहिणी काकड यांनी मानले. या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते ध्वजारोहण

**अमरावती/का.प्र.**



अमरावती महानगरपालिकेत महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६७ वा थापना दिवसानिमित्त महानगरपालिकेचे महापौर तेजवानी यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन साजरा करण्यात आला.

महापौर श्रीचंद तेजवानी यांनी आपल्या भाषणात सांगीतले की, १ मे १९६० रोजी आपल्या महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि आपल्या सर्वांच्या स्वप्नांना एक नवी दिशा मिळाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाने, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर अनेक महान व्यक्तींच्या विचारांनी आपल्या राज्याला समृद्ध आणि प्रगत बनवले आहे.

आजपासून सुरू होत असलेल्या जनगणना अंतर्गत स्व-गणना (एार्ट हिंल्र्सीूग्दह) उपक्रमाचाही येथे विशेष उल्लेख करावासा वाटतो. ही प्रक्रिया प्रत्येक नागरिकाला स्वतःची माहिती अचूक व पारदर्शक पद्धतीने नोंदवण्याची संधी देते. त्यामुळे शासनाला योग्य नियोजन, सुविधा आणि विकासकामे प्रभावीपणे राबविणे शक्य होते. सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, या स्व-गणना प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवून आपली माहिती प्रामाणिकपणे नोंदवावी आणि या राष्ट्रीय कार्यात सहकार्य करावे.

यावेळी वंदेमातरम, महाराष्ट्र राज्यगीत (समूहगीत) सादरीकरण करण्यात आले. सदर महाराष्ट्र राज्यगीत सादरीकरण विजय खंडारे यांनी केले. यावेळी महानगरपालिका मराठी माध्यमिक मुलांची शाळा वडरपुरा येथील विद्यार्थ्यांच्या बॅन्ड पथकाने यावेळी राष्ट्रगीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय खंडारे यांनी केले.या ध्वजारोहण कार्यक्रमात स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, झोन सभापती स्वाती कुलकर्णी, ईस्माईल कासम लालुवाले, नगरसेवक आशिष अतकरे, सचिन वैद्य, नगरसेविका सुरेखा लुंगारे,सुनिता भेले,विद्या माटे,सुनिता लोणारे,ललिता रतावा, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखापरिक्षक तथा मुख्यलेखाधिकारी श्यामसुंदर देव, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, मंगेश कडू, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, अग्निशमन अधिक्षक अजय पंधरे, कार्यालय अधिक्षक गुलशन मिरानी, उपअभियंता, अभियंता, कर्मचारी उपस्थित होते.



### महाराष्ट्र दिनी विभागीय आयुक्तालयात ध्वजारोहण व मानवंदना

**अमरावती-** महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या वर्धापन दिनोत्सवा निमित्त अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयात प्रभारी विभागीय आयुक्त तथा अपर आयुक्त अजय लहाने यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन तिरंग्यास मानवंदना देण्यात आली. लहाने यांनी यावेळी उपस्थित सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रध्वज वंदन, राष्ट्रगीत व राज्यगीतानंतर पोलीस पथकाव्दारे तिरंग्यास मानवंदना देण्यात आली. यावेळी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे-पाटील, अपर आयुक्त संजय जाधव, सुरज वाघमारे, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, नायब तहसीलदार मधुकर धुळे, श्यामसुंदर देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते.


### शिवाजी बहुउद्देशीय उच्च माध्यमिक शाळेचा १२ वी निकाल शंभर टक्के



**अमरावती-** येथिल शिवाजी बहुउधेशीय माध्यमिक विद्यालय अमरावती चा वर्ग १२ वी २०२६ चा १००% लागला निकाल.प्रथम श्रेणीत विश्वजीत श्रावण चव्हान ८५.१७. द्वितीय श्रेणीत ओम मदन भोपारी ८४.१५,व तृतीय श्रेणीत रुग्वेदा संतोष शिंदे ८२.१७ उत्तीर्ण झाले असून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्राचार्य प्रसाद देशमुख तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंदाकडून सर्व विदयार्थ्यांचे अभिनंदन केले.

### पी.आर.पोटे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाची १२वी निकालात गरुड झेप

**अमरावती/का.प्र.**



पी. आर. पोटे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाने बारावीच्या मार्च २०२५-२६ राज्य मंडळ परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत पुन्हा एकदा उज्ज्वल यश संपादन केले आहे. यावर्षी परीक्षेला बसलेल्या एकूण २३४ विद्यार्थ्यांपैकी सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून महाविद्यालयाच्या गुणवत्तेची साक्ष अधोरेखित झाली आहे.

या निकालात ८० ते ९० टक्के गुण मिळवत एकूण २१ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले. त्यामध्ये रुद्राक्षी रणजीत मोहोड ९५.१७% हिने प्रथम क्रमांक पटकावला असून नंदिनी विनोद साबळे ९०.३३% हिने द्वितीय, तर ईश्वरी हर्षराज डफडे ८८.३३% हिने तृतीय क्रमांक मिळवला. त्यानंतर ऋतुजा नंदकिशोर अनासने ८७.३३%, सौम्या सचिन जमदार ८६.३३%, मिष्टी रवी बसंतवाणी ८६.१७%, ओम अनिल धावक ८५.१७%, शर्वरी राजेश खाजोणे ८५.१७%, मयुरेश चंद्रशेखर पोटे ८५.०, स्वरूपा नितीन देशमुख ८३.५०,श्रेयस राजकुमार जाधव ८३.३३% ,ऋषिकेश मुकुंद काबरा ८३.३३%, यश संजयराव नागपुरे ८३.१७%, मैथिली अजय पाटील ८२.८३%, सिद्धी राजीव राजस ८२.३३% , उत्कर्ष संजय गुल्हाने ८१.८३%, दिपांकर रवींद्र तिखाडे ८१.३३% , साची विकास डोंगरे ८०.६७% , मेघ तुषार वरणगावकर ८०.५०% ,श्रुती शरद गांधी ८०.१७% , शताक्षी विलास सातपुते ८०.००% गुण घेऊन यांनीही उल्लेखनीय यश मिळवले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. महाविद्यालयातील सर्व शाखांतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत संस्थेचा शैक्षणिक दर्जा पुन्हा अधोरेखित केला आहे.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील व उपाध्यक्ष श्रेयश पोटे पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेही कौतुक करण्यात आले. महाविद्यालयाच्या या दैदिप्यमान यशामुळे अमरावती शहरासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# बारावी निकालः राज्यात अमरावती विभाग तिसऱ्या स्थानी

## निकाल ९०.९२ टक्के, बुलढाणा जिल्हा विभागात अव्वल



**जिल्हानिहाय निकाल**

| | |
|---|---|
| बुलढाणा: | ९५.२२ टक्के |
| वाशीम: | ९१.१५ टक्के |
| अकोला : | ९०.१४ टक्के |
| यवतमाळ: | ८९.६९ टक्के |
| अमरावती | ८८.२६ टक्के |
| एकूण : | ९०.९२ टक्के |

**शाखानिहाय टक्केवारी**

| | |
|---|---|
| विज्ञान : | ९७.४८ टक्के |
| वाणिज्य : | ८९.८७ टक्के |
| कला : | ८१.३३ टक्के |
| व्यवसाय अभ्यासक्रम: | ७५.८७ टक्के |
| आयटीआय : | ९०.४० टक्के |

**अमरावती/प्रतिनिधीः- :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने शनिवारी (दि.२) जाहीर केलेल्या बारावीच्या निकालात अमरावती विभागाने उत्तुंग कामगिरी केली आहे. अमरावती विभागाचा एकूण निकाल ९०.९२ टक्के लागला असून, राज्याच्या नऊ विभागीय मंडळांमध्ये विभागाने तिसरे स्थान पटकावले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत टक्केवारीत ०.४१ टक्क्यांची किंचित घट झाली असली, तरी क्रमवारीत पाचव्या स्थानावरून तिसऱ्या स्थानी झेप घेत विभागाने आपला दबदबा निर्माण केला आहे.

अमरावती विभागात जिल्ह्यानिहाय निकालात बुलढाणा जिल्ह्याने ९५.२२ टक्क्यांसह अव्वल स्थान कायम राखले आहे. त्यापाठोपाठ वाशीम (९१.१५ टक्के), अकोला (९०.१४ टक्के) आणि यवतमाळ (८९.६९टक्के) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. अमरावती जिल्ह्याचा निकाल विभागात सर्वात कमी म्हणजे ८८.२६ टक्के लागला आहे.


**शाखानिहाय निकाल, विज्ञान शाखेचा वरचष्मा-** यंदाही विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली आहे. ☞(पान २ वर)

# जमिनीच्या वादातून मोठ्या भावाकडून धाकट्याची हत्या

### छाया नगरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेतजमिनीच्या वादाने रक्ताच्या नात्यात इतका कडवटपणा निर्माण केला की, एका मोठ्या भावाने आपल्याच सख्ख्या धाकट्या भावाचा चाकूने भोसकून खून केला. ही थरारक घटना शुक्रवारी (दि.१) रात्री ११ वाजताच्या सुमारास अमरावती शहरातील नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या हल्ल्यात मध्यस्थी करणारा तिसरा भाऊदेखील गंभीर जखमी झाला असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.





### तिसरा भाऊही जखमी

हा रक्तरंजित संघर्ष थांबवण्यासाठी तिसरा भाऊ मोहम्मद नाजीम मोहम्मद लुकमान (५४, रा. पूर्णानगर) यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, आरोपीने त्यांच्यावरही चाकूने हल्ला केला. नाजीम यांच्या कपाळावर गंभीर जखम झाली असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत मोहम्मद मकसूद मोहम्मद लुकमान (५७, रा. नूर नगर) आणि आरोपी अब्दूल तसकीन मोहम्मद लुकमान (६०, रा. छायानगर) यांच्यात गेल्या अनेक दिवसांपासून शेतजमिनीच्या मालकी हक्कावरून वाद सुरू होता. ☞(पान २ वर)

# बच्चू कडूंचे शहरात जोरदार शक्ती प्रदर्शन

## विधान परिषदेत उमेदवारी मिळाल्याने कार्यकर्त्यांचा जल्लोष

### शिवसेना पदाधिका-यांची उपस्थिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रहार जनशक्ती पार्टीचे संस्थापक अध्यक्ष आणि माजी मंत्री बच्चू कडू यांनी दोन दिवसांपूर्वी शिवसेना शिंदे गटात प्रवेश घेतला आहे. यानंतर त्यांना विधान परिषदेचा उमेदवार घोषित करण्यात आले आहे. उमेदवारी घोषित झाल्यावर आज शुक्रवार २ मे रोजी दुपारी ४ वाजता



पहिल्यांदा बच्चू कडू यांचे अमरावती मध्ये आगमन झाले. यावेळी पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी त्यांचे भव्य स्वागत केले. विशाल मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूकीच्या माध्यमातून बच्चू कडू यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन शहरात केले. नेहरू मैदान



परिसरातून त्यांची मिरवणूक काढण्यात आली. ओपन जीप मध्ये भगवा दुपट्टा घालून बच्चू कडूंसह ☞(पान २ वर)

# ॲड. प्रशांत देशमुख वकील संघाचे अध्यक्ष

## -१५ तासाच्या मतमोजणीनंतर लागला निकाल

### उपाध्यक्ष ॲड. भोयर, सचिव ॲड. धर्माले

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा वकील संघाच्या २०२६-२०२८ द्विवर्षीय कार्यकारणीसाठी घेण्यात आलेल्या निवडणुकीचा निकाल १५ तासानंतर शुक्रवारी मध्यरात्री समोर आला आहे. रोमांचक असा निकाल निवडणुकीचा लागलेला. यामध्ये ॲड. प्रशांत देशमुख





सात मतांनी अध्यक्ष म्हणून नियुक्त झाले आहे. त्यांनी प्रतिस्पर्धी ॲड. अनिल विश्वकर्मा यांचा पराभव केला आहे. शुक्रवार १ मे रोजी सकाळी १० वाजता न्यायालय परिसरातील वकील संघ सभागृहात मतमोजणी सुरू झाली. सर्वात आधी उपाध्यक्ष, सचिव आणि शेवटी ☞(पान २ वर)

# सीताबाई संगई कनिष्ठ महाविद्यालयाची बारावी निकालाची उज्ज्वल परंपरा



**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** सीताबाई संगई कनिष्ठ महाविद्यालयाचा महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२६ चा निकाल अत्यंत उत्कृष्ट लागला आहे. महाविद्यालयाने सर्व शाखांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत आपली ☞(पान २ वर)

# २.३ कोटीचा गांजा, एम.डी, चरस पोलिसांनी केले नष्ट

## ५८ प्रकरणात जप्त केला होता मुद्देमाल

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस ठाणे अंतर्गत ५८ प्रकरणात जप्त करण्यात आलेला ३६८.४३ किलो गांजा, १.५५१ चरस आणि १.२५३ एमडी असा एकूण २ कोटी ३ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल आज शनिवार २ मे रोजी महाराष्ट्र एन्व्हायरो पावर लि. बुटीबोरी एमआयडीसी मध्ये नेऊन



इन्सिनेटरच्या मदतीने जाळून नष्ट करण्यात आला आहे.

माहितीनुसार पोलीस आयुक्तालयात १९९६ पासून दाखल असलेल्या नागपूर गेट पोलीस ☞(पान २ वर)

# उष्माघाताचा नेर मध्ये पहिला बळी?

## नऊ वर्षीय चिमुकलीचा मृत्यू

### सकाळी पाणी भरण्यासाठी गेल्यावर सायंकाळी मृत्यू

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** पाणी टंचाईमुळे उष्माघाताचा पहिला बळी गेल्याची चर्चा आहे. नेर तालुक्यातील अजंती पारधी बेडा येथील एका नऊ वर्षीय चिमुकलीचा शुक्रवार १ मे रोजी सायंकाळी अचानक मृत्यू झाला असून, तिचा मृत्यू उष्माघाताने झाल्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे.



अनवी अनाडी भोसले (वय ९ वर्ष), असे मृत मुलीचे नाव आहे. माहिती नुसार, नेर तालुक्यातील अजंती ☞(पान २

# पद्मजा कुऱ्हेकर यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्टेट बँकेचे निवृत्त शाखाधिकारी श्याम उर्फ वासुदेव अंबादास कुऱ्हेकर यांच्या सुविद्य व धर्मपरायण पत्नी पद्मजा कुऱ्हेकर यांचे शनिवार, २ मे रोजी पहाटे साडेपाच वाजता, खाजगी रुग्णालयात निधन झाले. त्या ७४ वर्षाच्या होत्या.



गेल्या २२ एप्रिल रोजी त्यांना अचानक भोवळ आल्याने खाजगी रुग्णालयात दाखल केले होते.त्यांच्या मेंदूमध्ये काही अडचणी उद्भवल्याने त्यांच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करून पुढील उपचार सुरू होते.पण गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेल्या उपचारांना पुरेसा प्रतिसाद मिळू शकला नाही. आज सकाळी त्यांची प्राणज्योत मावळली.

नागपूरचे ख्यातनाम कीर्तनकार वै.बाबासाहेब साल्पेकर यांची कन्या असणाऱ्या पद्मजाताईंनी आयुष्यभर कुऱ्हेकर घराण्याची मोठी सून व श्यामदादा यांची अर्धांगिनी म्हणून त्यांच्या मर्म, कर्म व धर्म ☞(पान २ वर)

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी निश्चित केलेली जागा वन विभागाच्या अखत्यारीत

## शहराच्या मध्यवर्ती पर्यायी जागा निश्चित करा

### आ.सुलभा खोडके यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र

**अमरावती/प्रतिनिधी:-** अमरावती येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मौजे आलियाबाद येथे प्रस्तावित आहे. मात्र, महाविद्यालयासाठी निवडलेली जागा हि वन विभागाच्या अखत्यारीत असल्याने केंद्र शासनाच्या पूर्व मंजुरीशिवाय या जागेवर कोणतेही वनेत्तर कामे करता येणार नाहीत. सदर कायदेशीर तांत्रिक अडचण आणि जनहित लक्षात घेता सदरची प्रास्तवित मौजे आलियाबाद येथील जागा बदलवून अमरावती येथील नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाकरिता शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी पर्यायी जागा निश्चित करण्याबाबत आ. सुलभा खोडके यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री ना. हसन मुश्रीफ,महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र दिले आहे.



अमरावती जिल्ह्यातील सर्वसामान्य गरजू रुग्णांना वैद्यकीय आरोग्य सुविधांचा लाभ मिळावा हीच शासकीय ☞(पान २ वर)

# श्री समर्थ विद्यालयाचा बारावीचा निकाल १०० टक्के

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक श्री समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी निकाल १०० टक्के लागला. ४ विद्यार्थी प्राविण्य तर २६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

श्री समर्थ कनिष्ठ महाविद्यालयामधून आदित्य बाळकृष्ण पद्मन याने (९१.८३%) प्रथम, धनश्री रामेश्वर दुधे हिने (८६.००%) व्दितीय तर प्रथमेश मनीष सवाई ( ८०.१७%) याने तृतीय क्रमांक पटकावला.



चि.आदित्य पद्मन | कु.धनश्री दुधे | चि.प्रथमेश सवाई

शाळेच्या तसेच विद्यार्थ्यांच्या १०० टक्के यशाबद्दल श्री समर्थ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. विनोद कोलवाडकर, उपाध्यक्ष प्रा. मोहन पुरोहित, सचिव डॉ. देवदत्त बोधनकर , जेष्ठ सदस्य डॉ. प्र.ना.वडोदकर, रमेशपंत डांगे यांनी आनंद व्यक्त करीत शाळेचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. श्री समर्थ ज्यु. कॉलेजचे प्राचार्य ☞(पान २ वर)

# जानकीबाई देशमुख विद्यालयाची उत्कृष्ट निकाल परंपरा कायम

## बारावी कला शाखेत ८२.६९ टक्के निकाल

**परतवाडा/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने आज इयत्ता १२ वीचा निकाल जाहीर केला असून, अचलपूर येथील हायस्कूल एज्युकेशन सोसायटीद्वारे संचलित श्रीमती जानकीबाई देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने यावर्षीही आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली



आहे. यावर्षी कला शाखेतून एकूण ५२ विद्यार्थिनी परीक्षेला बसल्या होत्या. त्यापैकी ४३ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून, विद्यालयाचा एकूण निकाल ८२.६९ टक्के लागला आहे. सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि ☞(पान २ वर)

# श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाची बारावीच्या निकालाची उज्ज्वल परंपरा कायम



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक श्री शिवाजी कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाने उच्च माध्यमिक निकालाची उज्वल परंपरा ह्याही वर्षी कायम राखली आहे.या महाविद्यालयाच्या कला शाखेचा निकाल ८९.१३ टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ६६.१९ टक्के लागला आहे.



कला शाखेत खुशी भीमराव बागडे हीने ८७.१७ टक्के गुण घेऊन प्रथम तर तनुश्री दिनेश सोळंके हिने ८७ टक्के गुण मिळवून दुसरा क्रमांक प्राप्त केला आहे. मनस्वी मनोहरराव कपले हिने ८५.१७ टक्के गुण मिळवून तिसरा, पायल गजानन कोरचाम हिने ८२.८३ टक्के गुण मिळवून चवथा, ऋतुजा देवनाथ कांबळे हिने ८२.६७ टक्के गुण मिळवून पाचवा तर प्रियल सुधीर ठवरे हिने ७५.६७ टक्के गुण मिळवून सहावा क्रमांक ☞(पान २ वर)

# धनश्री थोरात विज्ञान शाखेमधून तालुक्यात प्रथम

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** यशवंत शिक्षण संस्था नांदगाव खंडेश्वर द्वारा संचालित वाय. ई. एस.इंग्लिश मीडियम स्कूल व जुनिअर कॉलेज नांदगाव खंडेश्वर मधील वर्ग १२ वी विज्ञान शाखेची विद्यार्थीनी धनश्री प्रदीप थोरात ९१.१७ टक्के गुण मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याबद्दल तिचे संस्थेचे अध्यक्ष, पदाधिकारी, प्राचार्य ,प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सर्वांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.



सारांश

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

रविवार, ३ मे २०२६ E-paper - www.janmadhyam.com

# सर्वांगीण विकासात महाराष्ट्र अव्वल

**आपल्या सर्वांवर हा महाराष्ट्र धर्म जगभरात वर्धिष्णू करण्याची जबाबदारी आहे. यंदाचा महाराष्ट्र दिन विशेष आहे. हे वर्ष महात्मा जोतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीचे आणि संत गाडगेमहाराज यांच्या १५० व्या जयंतीचे वर्ष आहे, चवदार तळ्याच्या ऐतिहासिक लढ्याचे शताब्दी वर्ष आहे.**

महाराष्ट्र केवळ भौगोलिक सीमांनी बांधलेले राज्य नाही. महाराष्ट्र म्हणजे इतिहास, भूगोल आणि संस्कृतीचा समुच्चय आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी दिलेली स्वराज्याची प्रेरणा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घालून दिलेला न्याय आणि प्रज्ञेचा पाया, संतांच्या अभंगवाणीचा दिव्य वारसा, महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी पेटविलेली शिक्षण आणि समतेची मशाल, लोकमान्य टिळक यांनी जागविलेली राष्ट्रभावना , देशासाठी अनन्यसाधारण यातना सहन करण्याची ताकद देणारे स्वातंत्र्यवीर सावरकर या सगळ्यांच्या विचारांचा एकत्रित संगम म्हणजे महाराष्ट्र. भौगोलिक रचनेत नाही, तर महाराष्ट्र धर्मातून महाराष्ट्र प्रकट होतो.

आपल्या सर्वांवर हा महाराष्ट्र धर्म जगभरात वर्धिष्णू करण्याची जबाबदारी आहे. यंदाचा महाराष्ट्र दिन विशेष आहे. हे वर्ष महात्मा जोतिराव फुले यांच्या २००व्या जयंतीचे आणि संत गाडगेमहाराज यांच्या १५० व्या जयंतीचे वर्ष आहे, चवदार तळ्याच्या ऐतिहासिक लढ्याचे शताब्दी वर्ष आहे. हे वर्ष आपण समता आणि सामाजिक समरसता वर्ष म्हणून साजरे करतो आहोत. आज जग आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या संघर्षाची झळ सोसत आहे. त्याच वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सरकारने ऊर्जा सुरक्षेसाठी, पर्यायी तेल स्त्रोतांसाठी आणि सौरऊर्जेच्या विस्तारासाठी उभारलेल्या कामामुळे जगातील अन्य देशांना ज्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले, तसे भारतात झाले नाही.

**जगातील ३० वी अर्थव्यवस्था**

जगात कितीही आव्हाने असताना महाराष्ट्र खंबीरपणे उभा आहे. महाराष्ट्र देशाच्या जीडीपीमध्ये १३.५ टक्क्यांहून अधिक योगदान देत आहे. २०२४-२५ मध्ये महाराष्ट्राने १,६४,८७५ कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक आकर्षित केली. हे प्रमाण देशात आलेल्या एकूण 'एफडीए'च्या ३९ टक्के आहे. दावोसमधील 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'मध्ये महाराष्ट्राने ३० लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले; ज्यातून ४० लाख रोजगार निर्माण होणार आहेत. जगात आर्थिक समस्या असताना महाराष्ट्राने जगातील ३०वी अर्थव्यवस्था म्हणून झेप घेतली, हेच आपल्या राज्याचे सामर्थ्य आहे. हा विकास समतोल असावा, याचा विचार करून गडचिरोली, धुळे, नंदुरबार यांसारखी शहरेही गुंतवणुकीच्या नकाशावर आली आहेत. या वर्षी 'एल-निनो' परिस्थितीमुळे पाऊस सरासरीपेक्षा कमी असेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. आपला खरीप हंगाम पूर्णपणे पावसावर अवलंबून असल्याने, हा अंदाज गांभीर्याने घेतला पाहिजे. पेरणीची घाई करू नका. कृषी विभागाकडून येणाऱ्या सूचनांकडे लक्ष द्या. त्यातून या संकटापासून बचाव सोपा जाईल. मला शेतकरी बांधवांना आश्वस्त करायचे आहे, की राज्य सरकार म्हणून आम्ही आधीपासूनच पाणी, चारा याचे नियोजन केले आहे. जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवारच्या कामांना गती देऊन, त्यासाठी प्राधान्याने निधी देण्यास सांगण्यात आले आहे. ठिबक सिंचन, तुषार सिंचनाचा जास्तीत जास्त वापर करा. पाण्याची बचत हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. राज्यात खते आणि बियाण्यांची कोणतीही कमतरता नाही. लिंकिंग करणाऱ्या दुकानांवर कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. घाबरू नका, सरकार तुमच्यासोबत आहे.





**शेतकरी कर्जमाफी योजना**

गेल्या वर्षी पूर आणि अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर १५,५७६ कोटी रुपये जमा केले गेले. शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली आहेच. शेतकऱ्यांना मोफत वीज दिली जाते; आता सौरऊर्जेचा मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. कितीही संकटे आली, तरी महाराष्ट्राच्या विकासाचा रथ थांबणार नाही. महाराष्ट्राला २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याचे स्वप्न आणि त्या दिशेने आपण आत्तापासूनच काम सुरू केले आहे.

महाराष्ट्र आज जगातही पायाभूत सुविधांच्या निर्मितीत आघाडीवर आहे. सध्या मुंबई, पुणे आणि नागपूरमध्ये १७३ किलोमीटरच्या मेट्रो मार्गिका कार्यरत आहेत. दर वर्षी ५० किमीची मेट्रो सेवेत येईल, असे नियोजन आहे. 'समृद्धी'च्या साथीला 'शक्तिपीठ' येतो आहे. वाढवण येथे चौथे मुंबई बंदर विकसित केले जाणार आहे; जे जगातील 'टॉप टेन'पैकी असेल. आज महाराष्ट्र दिनी मला एक आनंदाची बातमी सांगायची आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेवरील १३.३ किमीचा 'मिसिंग लिंक' प्रकल्प जनतेसाठी खुला होत आहे. यामुळे दोन शहरांमधील अंतर सुमारे सहा किमीने आणि प्रवासाचा वेळ २५ ते ३० मिनिटांनी कमी होणार आहे. आमच्यासाठी विकास रस्ते आणि मेट्रोपुरता नाही; तर विकास म्हणजे प्रत्येक माणसाचे जीवन उंचावणे हा आहे.

४० लाखांहून अधिक महिला 'लखपती दीदी' झाल्या आहेत. ही संख्या या वर्षी ५० लाखांपर्यंत नेण्याचे नियोजन आहे. 'लाडकी बहीण योजने'तून बहिणींना मदत केली जाते. विविध घटकांसाठी ठोस योजना आहेत. सारथी, बार्टी, महाज्योती, आर्टी, वनार्टी, अमृत अशा संस्थांच्या माध्यमातून समावेशकतेची पायाभरणी केली जाते आहे.

**उद्योजक आणि स्टार्टअप्सला सहाय्य**

युवांसाठी कौशल्य प्रशिक्षणाचा मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. नवी मुंबईत आलेली सहा प्रसिद्ध जागतिक विद्यापीठे, आयआयटीच्या धर्तीवर आयआयसीटीसारख्या संस्था कौशल्यक्रांतीत भर घालणार आहेत. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने कृत्रिम बुद्धिमत्ता आणि 'डेटा सायन्स'सारख्या क्षेत्रांत विस्तार केला आहे. महाराष्ट्राने स्टार्टअप, उद्योजकता आणि नावीन्यता धोरणाद्वारे पाच वर्षांत १.२५ लाख उद्योजक आणि ५० हजार स्टार्टअपना सहाय्याचे लक्ष्य ठेवले आहे. सुप्रशासनासाठी अनेक पावले उचलण्यात आली असून, सरकारच्या सर्व सेवा व्हॉट्सअ?पवर देण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. गडचिरोली नक्षलमुक्त होऊन पोलाद शहर म्हणून नावारूपास येण्यासाठी वेगाने पावले टाकते आहे. महाराष्ट्रातील ११ किल्ले 'युनेस्को' जागतिक वारसायादीत समाविष्ट झाले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची ही जगाने घेतलेली दखल आहे.

महाराष्ट्र अधिक मजबूत आहे; आत्मनिर्भर आहे, महत्त्वाकांक्षी आहे. शेतकरी, कामगार, महिला, तरुण आणि उद्योजक प्रत्येकासाठी सरकारने कटिबद्धता सिद्ध केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७'च्या स्वप्नात महाराष्ट्र सर्वांत पुढे राहील, हे माझे महाराष्ट्र दिनी आपल्याला वचन आहे.

**गेल्या दशकात जगभरातील शिक्षण क्षेत्रात 'डिजिटल क्रांती' नावाचे वारे वेगाने वाहू लागले. मुलांच्या पाठीवरचे ओझे कमी करणे आणि त्यांना 'स्मार्ट' बनवण्याच्या नावाखाली शाळाशाळांमध्ये पुस्तकांची जागा टॅबलेट, लॅपटॉप आणि मोबाइलने घेतली. मात्र ज्या स्कॅन्डिनेव्हियन देशांनी हे 'डिजिटल मॉडेल' जगाला सर्वप्रथम शिकवले, त्याचपैकी एक असलेल्या स्वीडनने आता एक धक्कादायक पण डोळे उघडणारा निर्णय घेतला आहे.**

# स्वीडनचा रिव्हर्स पॅटर्न

स्वीडन सरकारने आपल्या शाळांमधून टॅबलेटवर आधारित शिक्षण पद्धती मोडीत काढून पुन्हा एकदा पारंपरिक पाठय़पुस्तके, लेखी परीक्षा आणि प्रत्यक्ष वाचनावर भर देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय केवळ एका देशाचा धोरणात्मक बदल नसून तो डिजिटल अतिरेकाविरुद्ध पुकारलेले एक युद्ध आहे.

स्वीडनने हा निर्णय घेण्यामागे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेत झालेली घट. 'प्रोग्रेस इन इंटरनॅशनल रीडिंग लिटरसी स्टडी' च्या अहवालानुसार, २०१६ ते २०२१ या काळात स्वीडिश मुलांच्या वाचन आणि आकलन क्षमतेत लक्षणीय घसरण झाली आहे. ज्या मुलांचे बालपण स्क्रीनवर स्क्रोलिंग करण्यात गेले त्यांना एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास करणे कठीण जाऊ लागले. स्वीडनच्या शिक्षणमंत्री लोटा एडहोम यांनी स्पष्टपणे कबूल केले की, तंत्रज्ञानावरच्या अतिअवलंबनामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

स्क्रीनवर वाचताना मेंदू माहिती स्कॅन करतो, प्रोसेस करत नाही. याउलट हातात पुस्तक घेऊन वाचताना मेंदू शब्दांशी आणि संकल्पनांशी जोडला जातो. डिजिटल माध्यमांमुळे मुलांची एकाग्रता कमालीची घटली आहे आणि आकलन क्षमतेचा ?हास झाला आहे. टॅबलेटवर टाईप करण्याची सवय झाल्यामुळे मुलांची हाताने लिहिण्याची क्षमता कमी झाली. लेखनामुळे मेंदूच्या ज्या नसा कार्यान्वित होतात, त्या टॅबलेटच्या वापरामुळे सुस्त झाल्याचे संशोधनातून समोर आले आहे. मुलांनी त्यांचे लेखन कौशल्य गमावले आहे. लॅपटॉप किंवा टॅबलेटवर अभ्यास करताना मुले अभ्यासापेक्षा गेम्स, सोशल मीडिया किंवा अनावश्यक माहितीकडे लवकर आकर्षित होतात.



तंत्रज्ञान हे एखाद्या शिक्षकापेक्षा विचलित करणारा घटक अधिक ठरले आणि त्यामुळे मुलांचे विचलित होण्याचे प्रमाण वाढत गेले. सामाजिक आणि मानसिक परिणाम, दुष्परिणामदेखील जाणवू लागले. स्क्रीनच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये डोळ्यांचे विकार, झोप न येणे आणि एकटेपणा वाढला. वर्गातील प्रत्यक्ष संवाद कमी होऊन मुले एका आभासी जगात जगू लागली.

स्वीडन सरकार आता बॅक टू बेसिक्स धोरण राबवत आहे. यासाठी त्यांनी तब्बल ५०० दशलक्ष क्रोनर (अंदाजे ४०० कोटी रुपये) खर्च करून शाळांमध्ये प्रत्येक विषयाची छापील पाठय़पुस्तके अनिवार्य केली आहेत.

केवळ वाचनच नाही, तर वर्गातील हस्तलेखन आणि प्रत्यक्ष पुस्तकातून शोध घेऊन उत्तरे लिहिण्याच्या सरावावर त्यांनी भर दिला आहे. विद्यार्थ्यांच्या हातातून टॅबलेट काढून तिथे पुन्हा कागद आणि शाई देण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे.

# बच्चू कडूंचा शिवसेना पक्षाप्रवेश

प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून बच्चू कडू यांना विधान परिषदेची उमेदवारी मिळाली आहे. पण बच्चू कडू यांच्या या निर्णयामुळे प्रहार जनशक्ती पक्षाचे काही कार्यकर्ते आणि पदाधिकारी नाराज झाल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे प्रहार जनशक्तीचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधले यांनी बच्चू कडू यांच्या शिवसेना प्रवेशावर नाराजी व्यक्त केली आहे. बच्चू कडू यांच्या शिवसेना प्रवेशाच्या निर्णयावर अनेकांकडून टीका देखील होत आहे. काही जणांकडून बच्चू कडू यांना सोशल मीडियावर ट्रोलही केलं जात आहे. या सर्व ट्रोलर्स आणि टीका करणाऱ्यांना बच्चू कडू यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. आपण शिवसेनेत प्रवेश करण्याचा का निर्णय घेतला? याबाबत बच्चू कडू यांनी स्पष्ट केलं आहे.

'ज्यांना राजकीय काम करायचं ते शिवसेनेत येतील. मात्र काही नालायक असतात ते सुटत नाही. ज्यांना व्यवस्थित राहायचे त्यांनी राहावं. मी कोणाला जबरदस्ती केली नाही. आमच्या राजकीय प्रवासाला सुरुवात शिवसेनेतून झाला. नंतर प्रहारमधून होता. मोठमोठे लोक पक्ष सोडून गेले. पक्ष बदलला. बच्चू कडू १५ वर्षे एकटा लढला. पाच ते सहा निवडणुका लढलो. एकाही पक्षाचा पाठिंबा घेतला नाही. ३०० गुन्हे दाखल करून घेणारा बच्चू कडू शिवाय दुसरा महाराष्ट्रात कोणी सापडणार नाही', असं बच्चू कडू यांनी स्पष्ट केलं.

'राष्ट्रवादी राष्ट्रवादीत विलीनीकरण झालं. भर महानगरपालिकेत मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे सोबत गेले. काँग्रेस, शिवसेना एकमेकांसोबत बसली. त्यांच्यावर टीका होत नाही. टीका करण्यासाठी बच्चू कडू आहे', अशी खंत त्यांनी व्यक्त केली.



'राजकीय परिस्थिती सध्या जात आणि धर्माची झाली आहे. मुद्दे संपले आहेत. म्हणून आम्ही टिकू तर शेतकऱ्यांचा आणि दिव्यांगांचा मुद्दा टिकेल म्हणून हा निर्णय घेतला', असंदेखील बच्चू कडू यांनी स्पष्ट केलं.

'शिवसेनेचे धोरण शेतकऱ्यांचे आहे आणि अजून शेतकऱ्यांसाठी नवीन धोरण तयार करेन. पुन्हा शिवसेना शेतकऱ्यांच्या बाजूने सक्षमपणे उभी राहील. त्यामुळे कोणाची पोटदुखी होत असेल तर आम्ही परवा करत नाही. मी आत्मविश्वासाने चालणार आहे', अशी भूमिका बच्चू कडू यांनी मांडली.

'ट्रोल करणारे ५० पैशाला विकत भेटतात. त्याची आम्ही परवा करत नाही. सर्व पक्षातील केबिन अर्धी याच लोकांनी भरली आहे. ट्रोल करणारे सर्व विकाऊ आहेत. ट्रोल करणाऱ्याचे माय आणि बाप दहाजन आहेत. प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज यांना देखील नाव ठेवलं. मी तर एक छोटा माणूस आहे. हौसे, नवसे, गौसे याला बच्चू कडू घाबरणारा नाही', असं सांगत बच्चू कडू यांनी आपला निर्धार स्पष्ट केला.

'बच्चू कडूवर विश्वास ठेवून बच्चू कडूच्या आत्मविश्वासावर मजबूत राहा. अशा पाखंडी लोकांवर काही चर्चा करू नका. कर्जमाफीची घोषणा करून घेणारा बच्चू कडू व्यतिरिक्त कोणी मायकालाल मैदानात होता का?', असा सवाल बच्चू कडू यांनी केला. 'शेतकरी कर्जमाफीचा जीआर १५ ते २० दिवसात निघणार. त्यानंतर हातातील बंधन सुटणार. अधिवेशनात घोषणा झाल्यावर शेतकरी सोडून कोणी आमचा सत्कार किंवा आभार मानले आहेत का?', असादेखील सवाल त्यांनी केला.'आता शिवसेनेचा नवा चेहरा पाहायला मिळेल.

हा चेहारा शेतकरी आणि दिव्यांगासाठी लढणारा असेल. हातात घेतलेला भगवा हा छत्रपती शिवरायांच्या विचारांचा आहे. त्या विचाराने महाराष्ट्र पिंजून काढत शिवसेनेची ताकद वाढवून शेतकरी आणि दिव्यांगांच्या बाजूने उभी करू. शेवटच्या श्वासापर्यंत शेतकरी, कामगार आणि दिव्यांग सुटणार नाहीत. काही पण सुटलं तरी चालेल. मात्र शेतकरी आणि दिव्यांगांपासून आम्ही अलिप्त राहणार नाही', असं बच्चू कडू बोलले आहे.

# शेतकऱ्यांचा मालकीचा जागतिक ब्रँड

जगातील बाजारात 'किवी' फळाचा वाढता ट्रेंड हा एक कॉर्पोरेट सहकाराचा यशस्वी प्रवास आहे. 'झेस्प्री' ही न्यूझीलंडमधील 'कॉर्पोरेट सहकारी' संस्था शेतकरी, संशोधन, सप्लाय चेन, मार्केटिंग आणि ग्राहक यांना जोडणारी एक आदर्श समन्वित प्रणाली बनलेली आहे.

आज भारताच्या कोणत्याही फळ पोत्याकडे आपण गेलो की, अनेक विदेशी फळे सर्रास मिळतात. प्रामुख्याने न्यूझीलंड आणि काही इतर देशांमध्ये पिकणारे, पण नुकत्याच भारतात ५,४०० हजार कोटींचे पी मूल्य गाठलेले चायनीज गुसबेरी म्हणजेच 'किवी' फळ सध्या खूप जास्त चर्चेत आहे.

जगातील बाजारात 'किवी' फळाचा वाढता ट्रेंड हा एक कॉर्पोरेट सहकाराचा यशस्वी प्रवास आहे, ज्याने शेतकऱ्यांना 'मूल्यसाखळी'तील नफा खऱ्या अर्थाने मिळवून दिला. तो शेतकऱ्यांचा मालकीचा जागतिक ब्रँड म्हणजे 'झेस्प्री'. आता भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील मुक्त व्यापार करार झाल्यामुळे न्यूझीलंडचे वैज्ञानिक किवी फळाची लागवड वाढवणार आहेत आणि त्यासाठी कामदेखील सुरू केले आहे.



जागतिक कृषी क्षेत्रात काही मॉडेल्स अशी आहेत जी केवळ उत्पादनापुरती मर्यादित राहत नाहीत, तर संपूर्ण मूल्यसाखळीवर नियंत्रण ठेवत जागतिक ब्रँड निर्माण करतात. न्यूझीलंडमधील 'झेस्प्री' ही अशीच एक 'कॉर्पोरेट सहकारी' संस्था आहे, जी आज केवळ 'किवी' हे फळ विकणारी कंपनी नसून शेतकरी, संशोधन, सप्लाय चेन, मार्केटिंग आणि ग्राहक यांना जोडणारी एक आदर्श समन्वित प्रणाली बनलेली आहे.

झेस्प्रीचे विशेष वैशिष्टय़ 'कॉर्पोरेटाइज्ड कोऑपरेटिव्ह' म्हणजे कॉर्पोरेट पद्धतीने चालवलेली सहकारी संस्था. आज संपूर्ण 'शेतकऱ्यांच्या मालकीची' संस्था असूनही आज जागतिक पातळीवर 'किवी' फळातील प्रीमियम ब्रँड म्हणून ओळखली जाते. झेस्प्रीने शेतकरी संघटन, पोस्ट-हार्वेस्ट व्यवस्थापन, गुणवत्ता नियंत्रण, ब्रँडिंग आणि सप्लाय चेन यांचा वापर करून जागतिक बाजारपेठेत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे याची ही स्टोरी.

झेस्प्रीचा जन्म न्यूझीलंडमधील 'किवी' फळ उत्पादकांच्या अडचणीतून निर्माण झाला. १९९० च्या दशकात किवी फळ उत्पादकांना जागतिक बाजारात मोठय़ा प्रमाणावर स्पर्धा, किंमत अस्थिरता आणि गुणवत्ता समस्या यांचा सामना करावा लागत होता. त्या काळात प्रत्येक शेतकरी किंवा पी करणाऱ्या स्थानिक कंपनी स्वतंत्रपणे निर्यात करत होत्या, ज्यामुळे बाजारात एकसंध ब्रँड तयार होत नव्हता. या सगळ्या बाबींचा विचार करून शेतकऱ्यांनी एकत्र येऊन एक 'सिंगल-डेस्क मार्केटिंग' मॉडेल स्वीकारले, ज्यातून झेस्प्रीची स्थापना झाली.



# लाराने सांगितला दीपिकाबरोबर कामाचा अनुभव

दीपिका पादुकोण बॉलीवूडमधील आघाडीची अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. आजपर्यंत तिचे अनेक सिनेमे गाजले आहेत. तिने बॉलीवूडमधील लोकप्रिय कलाकारांबरोबर प्रमुख भूमिकेत काम केले आहे. आता अभिनेत्री लारा दत्ताने दीपिकाबरोबर हाऊसफुल सिनेमात काम करण्याचा अनुभव सांगितला आहे. ती नेमकं काय म्हणाली आहे, हे जाणून घेऊ.

लारा दत्ताने नुकतीच एनडीटीव्हीला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने दीपिका पादुकोण तिच्या कामाप्रति किती समर्पित आहे, याबद्दल वक्तव्य केले. लारा दत्ता म्हणाली, 'अनेकांना याबद्दल माहीत नाही. हाऊसफुल सिनेमाच्या शूटिंगदरम्यान दीपिका खूप आजारी पडली होती, तिला मलेरिया झाला होता, तिला खूप ताप आला होता, डॉक्टरांनी तिला औषधे दिली होती.' पुढे ती म्हणाली, 'ताप आल्यामुळे, अशक्तपणा आल्यामुळे ती थरथरत होती. दुसऱ्या दिवशी सकाळी आमचे शूटिंग होते. एकाच सीनमध्ये अनेक कलाकार होते. आजारी असतानाही ती सेटवर आली. तिला अशक्तपणा आला आहे हे कळत होते, पण ती प्रोफेशनल आहे. तिने तिचे काम केले. विशेष म्हणजे आजारी असतानाही तिने ते शूटिंग केले होते, तरीही तिने ते उत्तम केले होते.' लारा दत्ता असेही म्हणाली, 'जेव्हा तुम्ही खूप आजारी असता किंवा अशक्तपणा आलेला असतो तेव्हा काम करणे, शूटिंग करणे किती अवघड असते हे मला माहीत आहे. फक्त ताप आला आहे किंवा सर्दी झाली होती असे नव्हते, तर तिला मलेरिया झाला होता.'



दीपिकाचे कौतुक करत लारा म्हणाली, 'ती लाजरी नव्हती, पण कमी बोलत असे. तिला काय करायचे हे तिला माहीत असायचे. ती तिच्या कामाबाबत एकाग्र असते. जेव्हा प्रत्येक कलाकाराला नेमकं काय करायचं आहे हे माहीत असतं,

# 'कंट्रोल उदय कंट्रोल...'

बॉलिवूडचे अनेक कलाकार त्यांच्या फिटनेससाठी ओळखले जातात. पण आता वयाच्या ७६ व्या वर्षी जीममध्ये वर्कआऊट करतानाचा अभिनेते नाना पाटेकर यांचा



व्हिडिओ पाहून नेटकरीही थक्क झाले आहत.

अभिनेते नाना पाटेकर हे त्यांच्या दमदार अभिनयासाठी आणि स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जातात. मात्र, सध्या नाना त्यांच्या अभिनयामुळं नाही, तर त्यांच्या कमालीच्या फिटनेसमुळं सोशल मीडियावर चर्चेच आहेत. वयाची ७६ वर्षे पूर्ण केल्यानंतरही नानांचा उत्साह आणि फिटनेस पाहून तरुणांनाही घाम फुटेल, अशा प्रतिक्रियाही नेटकरी देत आहेत. नाना पाटेकर यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये नाना चक्क व्यायाम करताना दिसत आहेत. नानांनी कोणत्याही जिमच्या कपड्यांशिवाय, अगदी साध्या सुती कपड्यांमध्ये त्यांनी सलग १५ ट्रायसेप डिप्स मारले आहेत. ७६ व्या वर्षी इतक्या सहजतेनं व्यायाम करताना पाहून चाहत्यांनी त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर नेटकऱ्यांनी नानांच्या शिस्तीचे आणि जिद्दीचं तोंडभरून कौतुक केलं आहे. काही चाहत्यांनी म्हटले आहे की, 'नाना म्हणजे ऊर्जेचा जिवंत झरा आहेत,' तर काहींनी 'वय ही फक्त एक संख्या आहे,' अशी प्रतिक्रिया दिली आहे. तर अनेकांनी मजेत 'कंट्रोल उदय कंट्रोल' असं कमेंट्समध्ये म्हटलंय. नाना पाटेकर हे त्यांच्या साध्या राहणीमानासाठी ओळखले जातात आणि या व्हिडिओमधून त्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केलं आहे की, व्यायामासाठी महागड्या कपड्यांची किंवा जिमची गरज नसते, तर फक्त इच्छाशक्ती लागते.

तर नाना पाटेकर नेहमीच शिस्तबद्ध जीवनशैलीसाठी ओळखले जातात. ते निसर्गाच्या सानिध्यात राहणं आणि घरगुती सकस आहार घेण्यावर भर देतात.

प्रियांका चोप्रा सोशल मीडियावर खूप सक्रिय असते आणि त्यामार्फत तिच्या दैनंदिन जीवनातील घडामोडी शेअर करत असते. अभिनेत्री अनेकदा मुलाखतींमधूनही मनमोकळेपणाने संवाद साधताना दिसते. अशातच आता तिने तिच्या खासगी आयुष्यातील काही गोष्टींबद्दल सांगितलं आहे.

'इंडियन एक्स्प्रेस'च्या वृत्तानुसार प्रियांका चोप्रा हिने २०१९ मध्ये सांगितलं होतं की ती तिच्या पर्समध्ये छोट्या टबॅस्को सॉसचं बाटली ठेवते. हे कळताच तिचे चाहते खूप उत्साहित झाले होते. आता 'वोग'शी संवाद साधताना तिने पुन्हा एकदा तिच्या बॅगेत काय काय असतं याबद्दल सांगितलं आहे. प्रवास करताना आणि इतरवेळीसुद्धा तिच्या पर्समध्ये नेमकं काय असतं याबद्दल सविस्तर जाणून घेऊयात.

मुलाखतीत प्रियांकाने प्रवास करताना ती तिच्या बॅगेत नजर लागू नये म्हणून काळा दोरा, हनुमान चालीसा आणि इतर काही वस्तू ठेवते असं सांगितलं. त्यानंतर तिने तिचं वॉलेट उघडलं आणि २०१८ मधील निक जोनसबरोबरचा तिचा पहिला फोटो दाखवला, जो ती नेहमी तिच्याजवळ ठेवते.

# 'माझ्या बॅगेत हनुमान चालीसा असते'



प्रियांका पुढे म्हणाली, 'आणि हा माझा Tide pen (डाग काढण्यासाठी) मी तो नेहमी बरोबर ठेवते. महागडे कपडे खराब होऊ नये यासाठी मी तो नेहमी माझ्याकडे ठेवते. 'गोल्डन ग्लोब्स'मध्ये अर्दे चा ड्रेस घातला होता, पण पिझ्झा खाताना त्यावर डाग लागला. तेव्हा मी लगेच हा पेन वापरला आणि सगळं ठीक झालं,' कॅमेऱ्यासमोर हनुमान चालीसाचं छोटंसं पुस्तक दाखवत प्रियांका म्हणाली, 'ही माझी हनुमान चालीसा आहे. रोज हनुमान चालीसा म्हणायची असते. मी रोज म्हणत नाही, पण शक्य तितकी म्हणण्याचा प्रयत्न करते आणि मला असंही वाटतं की ती माझ्या प्रवासात माझं संरक्षण करते.' प्रियांका पुढे बॅगेतला लेबल लावलेला पोर्टेबल चार्जर दाखवत म्हणाली, 'यावर लेबल आहे, म्हणजे गडबडीत तो हरवणार नाही किंवा कोणी घेऊन जाणार नाही. मी सगळ्याच वस्तूंवर लेबल लावते ड्रॉवर, कपाट, सगळं काही. कारण नाहीतर माझा नवरा ते त्याच्या बॅगेत टाकतो.'

# 'ती फक्त माझी पत्नी नाही, माझ्या जगण्याचं कारण'

माधुरी दीक्षित बॉलिवूडची 'धक धक गर्ल' म्हणून ओळखली जाते. बॉलिवूडमधील सर्वात लोकप्रिय आणि उत्कृष्ट अभिनेत्रींपैकी ती एक आहे. माधुरी दीक्षित फक्त एक उत्तम अभिनेत्री नाही तर एक उत्कृष्ट नर्तिकासुद्धा आहे. ती एक प्रशिक्षित कथक नृत्यांगना आहे, तिच्या नृत्यात कमालीची अचूकता, शालीनता आहे. विशेष म्हणजे तिचे नृत्यातील हावभाव चाहत्यांना भुरळ घालतात. माधुरी आजही सोशल मीडियावर डान्स व्हिडीओ शेअर करते, जे खूप व्हायरल होतात. काल बुधवार २९ एप्रिल रोजी वर्ल्ड डान्स डे होता. या निमित्ताने माधुरीचे पती डॉ श्रीराम नेने यांनी खास पोस्ट करत माधुरीचं कौतुक केलं आहे.

श्रीराम नेने यांनी इन्स्टाग्रामवर माधुरी दीक्षितबरोबरचे काही रोमँटिक फोटो शेअर केले. या फोटोंसोबत कॅप्शनमध्ये त्यांनी लिहलं, 'ती फक्त माझी पत्नी नाही ती माझी लय आहे, जगण्याचं कारण आहे आणि आयुष्यात असंच पुढे चालत राहण्याची आठवण करून देणारी शक्ती आहे. कारण दीर्घायुष्य मोठ्या क्षणांतून नाही, तर अशा छोट्या-छोट्या, सतत पुनरावृत्ती होणाऱ्या क्षणांतून घडतं.



# एका 'आशिकी'ने रातोरात केले सुपरस्टार

बॉलीवूडमध्ये एका रात्रीत स्टार होणारे अनेक अभिनेते आले, पण राहुल रॉय याची गोष्ट काही वेगळीच आहे. १९९० मध्ये महेश भट्ट यांच्या 'आशिकी' चित्रपटाने त्याला यशाच्या अशा शिखरावर नेले, जिथे पोहोचण्याचे स्वप्न प्रत्येक अभिनेता पाहतो. राहुल रॉयची क्रेझ इतकी होती की, चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर अवघ्या ११ दिवसांत त्याने चक्क ४७ चित्रपट साइन करण्याचा विक्रम केला होता. मात्र, ज्या वेगाने तो वर गेला, त्याच वेगाने त्याचा करिअरचा आलेख खालीही आला. सलग २५ चित्रपट फ्लॉप होण्याचा धक्कादायक टप्पा त्याच्या आयुष्यात आला आणि तो प्रसिद्धीच्या झोतातून अचानक गायब झाला.



बॉलीवूड अभिनेता राहुल रॉय सध्या त्याच्या व्हायरल रील्समुळे चर्चेत आहे. खरं तर एकेकाळी त्याने आपल्या उत्कृष्ट अभिनयाच्या जोरावर सिनेसृष्टीत एक वेगळं स्थान निर्माण केलं, पण काही काळानंतर तो प्रसिद्धीपासून दूर गेला. १९९० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आशिकी' चित्रपटामुळे त्याला प्रचंड लोकप्रियता मिळाली होती. मात्र, त्यानंतर त्याचे चित्रपट फार चालले नाही.

२००७ मध्ये 'बिग बॉस' च्या पहिल्या सीझनचा विजेता ठरल्यानंतर तो पुन्हा एकदा चर्चेत आला होता, पण काही काळाने तो पुन्हा अचानक गायब झाला.

राहुल रॉयने 'आशिकी' चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. महेश भट्ट यांच्या या ब्लॉकबस्टर चित्रपटाने त्याला रातोरात स्टार बनवलं आणि तो तरुणींच्या गळ्यातील ताईत झाला. अनु अग्रवालबरोबरची त्याची जोडी सुपरहिट ठरली होती. या दोन्ही कलाकारांनी पहिल्याच चित्रपटातून प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले होते.

# बिपाशा बासूच्या लग्नाला १० वर्षे पूर्ण!

बॉलिवूडची 'ब्लॅक ब्युटी' अभिनेत्री बिपाशा बासू आणि अभिनेता करण सिंह ग्रोवर यांच्या लग्नाला आज १० वर्षे पूर्ण झाली आहेत. ३० एप्रिल २०१६ रोजी बिपाशा बासू आणि करण सिंह ग्रोवर हे दोघे विवाहबंधनात अडकले होते. या खास निमित्ताने बिपाशाने सोशल मीडियावर पतीसोबतचे काही रोमँटिक आणि जुने फोटो शेअर करत एक भावूक पोस्ट लिहिली आहे. लग्नाच्या वाढदिवसाचे फोटो शेअर करताना बिपाशाने कॅप्शनमध्ये आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ती म्हणाली, 'सर्वात प्रेमळ माणसाबरोबरची आनंदाची १० वर्षे! देवाला माहीत होतं मला



नेमकं काय हवंय'. पुढे ती म्हणाली, 'माझं आयुष्य प्रेम आणि साधेपणाभोवती फिरतं. आयुष्यातले छोटे छोटे क्षण, लहान आनंद तू रोज आमच्या आयुष्यात भरतोस, त्यासाठी धन्यवाद. मी आणि आपली लेक देवी खूप भाग्यवान आहोत'.

बिपाशाने करणसोबतच्या या १० वर्षांच्या प्रवासाला असे गोंडस नाव दिले आहे. बिपाशा आणि करण सिंग ग्रोव्हरची लव्हस्टोरी खूपच इंटरेस्टिंग आहे. 'अलोन' चित्रपटाच्या शूटिंग दरम्यान बिपाशा आणि करण पहिल्यांदा भेटले होते. त्याचेवळी दोघांची चांगली मैत्री झाली. बघता-बघता त्यांच्या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. त्यानंतर दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला होता.

२०१६ मध्ये त्यांनी लग्न केलं लग्नाच्या ६ वर्षानंतर त्यांच्या घरी चिमुकल्या परीचं आगमन झालं. जिचं नाव त्यांनी देवी ठेवलं.

बिपाशा अनेकदा तिचे फोटोही शेअर करत असते. २००१ मध्ये 'अजनबी' चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणाऱ्या बिपाशाने 'राज', 'जिस्म', 'धूम २', 'नो एन्ट्री' आणि 'रेस' यांसारख्या अनेक सुपरहिट चित्रपटांत काम केले आहे. तिने टेलिव्हिजनवर 'डर सबको लगता है' या शोचे सूत्रसंचालनही केले होते.

# 'राजा शिवाजी'वरून सोशल मीडियावर उलटसुलट चर्चा!

***'राजा शिवाजी' हा सिनेमा १ मे २०२६ ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'राजा शिवाजी'चा ट्रेलर जेव्हा आला तेव्हा अनेक छोट्या छोट्या गोष्टींवरुन सोशल मीडियावर उलटसुलट चर्चा रंगल्या. परंतु रितेशने कोणत्याही वादात न पडता सिनेमा जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहचेल याची काळजी घेतली. एकूणच सिनेमातील काही प्रसंगावरुन वाद निर्माण झाले असले तरीही रितेशने काही गोष्टींमध्ये मात्र जरुर बाजी मारली आहे, हेही नाकारुन चालणार नाही.***

'राजा शिवाजी' हा सिनेमा १ मे २०२६ ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'राजा शिवाजी'चा ट्रेलर जेव्हा आला तेव्हा अनेक छोट्या छोट्या गोष्टींवरुन सोशल मीडियावर उलटसुलट चर्चा रंगल्या. परंतु रितेशने कोणत्याही वादात न पडता सिनेमा जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहचेल याची काळजी घेतली. एकूणच सिनेमातील काही प्रसंगावरुन वाद निर्माण झाले असले तरीही रितेशने काही गोष्टींमध्ये मात्र जरुर बाजी मारली आहे, हेही नाकारुन चालणार नाही.

'राजा शिवाजी' सिनेमाचा पहिला टीझर जेव्हा आला तेव्हा सोशल मीडियावर एकच चर्चा रंगली ती म्हणजे छत्रपती शिवराय म्हणून रितेश तितका प्रभावी वाटत नाही. रितेशने 'मस्ती', 'हाउसफुल्ल' सारखे वेगळे सिनेमे केले आहेत त्यामुळे शिवरायांच्या भूमिकेत रितेशला पाहणं योग्य वाटत नाही असे नाराजीचे सूर उमटले. परंतु रितेशने 'राजा शिवाजी' सिनेमासाठी घेतलेली मेहनत आणि त्याच्या आत दडलेली सच्ची भावना त्याच्या अभिनयात झळकतेय.



अफजलखानाला यमसदनी धाडण्यासाठी छत्रपती शिवरायांनी वाघनखांचा वापर केला हे आपल्या सर्वांना माहितच आहे. परंतु काही नेटकऱ्यांनी 'राजा शिवाजी'च्या या प्रसंगावर आक्षेप घेतला. भाजप कार्यकर्ता सुरेख नखुआ यांनी ट्रेलरमधील या दृश्यावर टिप्पणी केली. ते लिहितात, रितेश देशमुखच्या सिनेमाच्या ट्रेलरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज अफजल खानाने वार करण्याआधीच त्याला वाघनखं दाखवत आहेत. मात्र इतिहासात असं नमूद आहे की अफजल खानाने वार केल्यानंतरच महाराजांनी वाघनखांचा वापर केला आहे. रितेश देशमुख छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराष्ट्राचा इतिहास, वारसा आणि अस्मितेची मोडतोड व अपमान का करत आहे?'

यावर उत्तर देताना रितेश म्हणाला, 'आदरणीय सर, कृपया १ मे रोजी सिनेमा बघा. तुम्हाला याचं उत्तर सिनेमातच मिळेल. तुम्हाला आणि तुमच्या मित्रपरिवाराला सिनेमा आवडेल अशी आशा करतो. जय शिवराय.' त्यामुळे एकूणच आपण काय दाखवत आहोत याचं पुरेपुर भान रितेशला आहे. त्याला 'राजा शिवाजी' मध्ये काहीही वादग्रस्त दाखवायचं नाहीये. रितेशला विषयाचा आणि प्रेक्षकांच्या भावनेचा आदर आहे.

# 'मुलगाच हयात नाही तर ८० कोटींचा बंगला काय कामाचा'

दाक्षिणात्य इंडस्ट्रीतील एक प्रसिद्ध अभिनेते डॅनियल बालाजी आता आपल्यात नसले तरी, त्यांनी साकारलेल्या भूमिका लोक अजूनही विसरलेले नाहीत. मल्याळम चित्रपटांमधील नकारात्मक भूमिकांमधून त्यांनी मोठे नाव कमावलं. डॅनियल यांच्या आकस्मिक निधनानंतर त्यांची आई दुःखात बुडाली आहे. २०२४ मध्ये वयाच्या ४८ व्या वर्षी डॅनियल यांचं हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. डॅनियल यांच्या आकस्मिक निधनानंतर त्यांची आई दुःखात बुडाली आहे. डॅनियल बालाजी यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक अविस्मरणीय भूमिका साकारल्या.

डॅनियल हे निर्मात्यांची पहिली पसंती होते. जेव्हा कधी चित्रपटात खलनायकाची गरज भासायची, तेव्हा डॅनियल बालाजी यांच्यापेक्षा उत्तम कोणीही नाही, असा सर्वांचा विश्वास होता. ते आपल्या प्रत्येक भूमिकांमध्ये जीव ओतायचे आणि ती भूमिका पडद्यावर आकर्षकरित्या साकारायचे.

डॅनियल यांच्या अभिनयानं चाहत्यांच्या मनावर एक अमिट छाप सोडली. डॅनियल यांनी २००२ मध्ये 'एप्रिल मथाथिल' या चित्रपटातून चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. त्यानंतर 'वेट्टैयाडू विळैयाडू', 'पोल्लादवन' आणि 'वाडा चेन्नई' यांसारख्या चित्रपटांनी त्यांना मोठी ओळख मिळवून दिली. अभिनयापूर्वी त्यांनी प्रॉडक्शन मॅनेजर म्हणूनही काम केलं होतं. कमल हासन यांचा 'मरुथुनायकम' हा चित्रपट त्यांच्या सुरुवातीच्या कारकिर्दीचा एक भाग होता.

# अठराव्या शतकातील कलाकृतीने २१ व्या शतकात केला विक्रम

**राजा रवी वर्मा यांनी १८९० साली 'यशोदा आणि कृष्णा'चे रंगवलेले चित्र तब्बल १६७.२ कोटी रूपयांना लिलावात विकले गेले. मागील महिन्यात विकले गेलेले हे चित्र भारतातील आतापर्यंतचे सर्वात महागडे चित्र ठरले.**



सामान्यांना परवडेल अशा किंमतीत त्यांनी तैलचित्रांच्या 'ओलिओग्राफ' प्रति तयार करून विकल्या. मुंबईतील त्यांच्या एफ.ए.एल प्रेसच्या माध्यमातून त्यांनी त्यांची कलाकृती सर्वसामान्यांच्या घरापर्यंत पोहोचवली. राजा रवी वर्मा यांनी कोणता वारसा आपल्याला दिला? त्यांनी भारतीय कलेत युरोपीय कलेचे मिश्रण कसे केले? त्याद्वारे त्यांनी त्यांच्या चित्रकलेले, तैलचित्रांना समृद्ध कसे केले? त्यांच्यावर टीका का झाली?

राजा रवी वर्मा यांचा जन्म केरळमधील किलीमनूर येथील एका समृद्ध कुटुंबात झाला. त्यांना लहानपणापासूनच चित्रकलेबद्दल आकर्षण होते. त्यामुळे त्यांनी चित्र रंगवण्यास सुरूवात केली होती. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी त्रावणकोर येथील राजदरबारातील कलाकार रामा स्वामी नायडू यांच्याकडून चित्रकलेचे प्रशिक्षण घेणे सुरू केले. ब्रिटिश चित्रकार थेओडोर जेन्सन यांच्या तैलचित्र (ऑइल पेंटिंग) काढण्याच्या पद्धतींचे राजा रवी वर्मा निरीक्षण करत असत. त्याद्वारे त्यांनी तैलचित्रे कशी काढायची ते शिकून घेतले. रूपिका चावला यांनी 'राजा रवी वर्मा: पेंटर ऑफ कोलोनियल इंडिया' या पुस्तकात नोंद केल्याप्रमाणे राजा रवी वर्मा यांना किलीमनूरमध्ये शिक्षण पूर्ण करण्यासाठी वाव होता. किलीमनूर हे एक समृद्ध गाव होते, ज्यामुळे कला आत्मसात होणे, तसेच कलेकडे ओढा निर्माण होणे साहजिक होते.

**वीणा वादन करणाऱ्या सरस्वतीचे चित्र कसे सुचले असावे?**

किलीमनूर हे कलेने समृद्ध असे शहर होते. त्यामुळे तिथे गायन, संगीत कलांचा प्रभाव होता, आणि विविध प्रकारची वाद्ये तिथे असायची. त्यामुळे एखाद्या संगीत वाद्यावर बोटांनी तारा छेडून मधुर ध्वनी निर्माण करणारे कलाकार रवी वर्मा अर्थात राजा रवी वर्मा यांच्या सहज नजरेत भरले असतील, असे रूपिका चावला यांनी नमूद केले आहे. याच गोष्टींतून वीणा वादन करणाऱ्या सरस्वतीचे चित्र रेखाटावे असे राजा रवी वर्मा यांना सुचले असावे. त्यांनी काढलेले वीणा वादन करणाऱ्या सरस्वतीचे चित्र आज घराघरांत पोहोचले आहे. दरम्यान, त्यांच्यात असलेल्या केवळ प्रतिभेमुळेच त्यांची किर्ती सर्वत्र पसरली असे नव्हे, तर कलेच्या पुढे जाऊन आणखी काहीतरी करता येईल, या त्यांच्या इच्छाशक्तीने त्यांचे कार्य सर्वदूर पसरले.

**देवी-देवतांची चित्रे घराघरांत कशी पोहोचवली?**

१८९४ साली राजा रवी वर्मा यांनी मुंबईत 'राजा रवी वर्मा फाइन आर्ट लिथोग्राफिक प्रेस'ची स्थापना केली. या प्रेसमध्ये त्यांनी भारतीय देवी-देवतांच्या चित्रांच्या 'ओलिओग्राफ' स्वरूपात प्रति छापल्या. इतकेच नव्हे तर त्या परवडणाऱ्या किंमतीत सर्वसामान्यांना उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे भारतीयांना देवी-देवतांना मानवी स्वरूपात चित्रांच्या माध्यमातून पाहता आले. 'त्यांची प्रेस आर्थिक संकटातून जात होती. त्यांना नफा कमावण्याची चिंता नव्हती. त्यांचे खरे ध्येय होते ते म्हणजे प्रभाव पाडणे. काहीतरी ठोस करून दाखवणे. देश त्या चित्रांच्या माध्यमातून एकसंध राहावा अशी त्यांची निर्मळ भावना होती', असे इतिहासकार मनू एस. पिल्लई यांनी म्हटले आहे. 'फॉल्स अलाइज : इंडियाज महाराजाज इन द एज ऑफ रवी वर्मा' या पुस्तकाचे ते लेखक आहेत.

**लोकमान्य टिळक आणि छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमाही छापली**

भारतीय देवी-देवतांची तैलचित्रे काढणे तसेच ती छापणे याच बरोबर राजा रवी वर्मा यांनी त्याकाळी राजकीय प्रभाव पाडणाऱ्या प्रसिद्ध नेत्यांचीही चित्र छापली. या माध्यमातून त्यांनी एक प्रकारे देशकार्यात भर पाडण्याचा प्रयत्न केला. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, छत्रपती शिवाजी महाराज यांचीही चित्रे त्यांनी छापून लोकांपर्यंत पोहोचवली होती, असे पिल्लई म्हणाले. वयाच्या ५८ व्या वर्षी राजा रवी वर्मा यांची प्राणज्योत मालवली.

# इंधन तर मिळेल पण पाण्याचे काय?



इथेनॉल व पेट्रोल यांचे मिश्रण असलेल्या इंधनाची निर्मिती करण्याकडे भारताचा कल वाढला आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती करण्याच्या दिशेने देशात पाऊलं उचलली जात आहेत. परंतु, इथेनॉल निर्मिती करताना पाण्याची गंभीर समस्या निर्माण होऊ शकते. मका, ऊस आणि तांदूळ यांचा वापर इथेनॉल निर्मितीसाठी केला जातो. इतर कोणत्याही पिकांपेक्षा मका, ऊस आणि तांदूळ या पिकांना सर्वाधिक पाणी लागते. 'इथेनॉल मिश्रीत इंधनाची निर्मिती करताना भारतावरील पाणी संकट आणखी गंभीर स्वरूप धारण करू शकते. इथेनॉल निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल हा प्रामुख्याने तांदूळ, मका आणि ऊस आहे. या पिकांसाठी शेतीत सर्वात जास्त पाण्याचा वापर करावा लागतो', असे इंटर गव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंजचे अभ्यासक अंजल प्रकाश यांनी म्हटले आहे.

भारताचे कच्च्या तेलासाठी इतर देशांवर असलेले अवलंबित्व कमी करण्यासाठी इथेनॉल ब्लेंडिंग ही संकल्पना अस्तित्वात आली. शेतातील टाकाऊ मालापासून तयार केलेल्या अल्कोहोलला इथेनॉल म्हटले जाते. हे इथेनॉल पेट्रोलमध्ये मिसळून इंधन तयार केले जाते. यात इथेनॉलचे प्रमाण अधिक असते, तर पेट्रोलचे प्रमाण नगण्य असते.

भारतात इथेनॉल निर्मितीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. तांदूळापासून मोठ्या प्रमाणात इथेनॉलची निर्मिती होत आहे. २०२४-२५ या वर्षात सरकारने ५२ लाख टन तांदूळ इथेनॉल निर्मितीसाठी वापरला होता. तर २०२५-२६ या वर्षात ९० लाख टन तांदूळ इथेनॉल निर्मितीसाठी वापरण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. गरीब कुटुंबांना सरकारकडून सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत तांदूळ वाटप केला जातो. गरीब कुटुंबांना वाटप केला जाणारा १० ते २५ टक्के तांदूळ इथेनॉल निर्मितीसाठी पुरवला जाणार आहे. इथेनॉल ब्लेंडिंगला प्रोत्साहन देण्यासाठी हा तांदूळ थेट डिस्टिलरिजला दिला जाणार आहे.

**इथेनॉल ब्लेंडिंगचा पाण्यावर कसा परिणाम होणार?**

तांदूळापासून इथेनॉल निर्मिती करण्याचे प्रमाण वाढले आहे. एक किलो तांदूळ उत्पादन घेण्यासाठी तांदूळाच्या पिकाला ३००० ते ५००० लिटर पाण्याची आवश्यकता असते. साधारणपणे अडीच ते तीन किलो तांदूळापासून एक लिटर इथेनॉल तयार केले जाते. त्यामुळे एक लिटर इथेनॉलची निर्मिती करण्यासाठी वापरलेल्या तांदूळासाठी दहा हजारांहून अधिक लिटर पाण्याचा वापर केलेला असतो. दिल्लीत २०२४ मध्ये एक जागतिक परिषद पार पडली होती. त्यात फूड सेक्रेटरी संजीव चोपडा यांनी तांदूळापासून एक लिटर इथेनॉल निर्मिती करण्यासाठी जवळपास १० हजार ७९० लिटर पाणी लागते. जे तांदूळाचे पिक घेण्यासाठी सिंचनाच्या माध्यमातून दिले जाते, असे संजीव चोपडा म्हणाले होते.

याच प्रमाणे मक्यापासून एक लिटर इथेनॉल निर्मिती केल्यास ४ हजार ६७० लिटर पाणी, तर ऊसापासून इथेनॉल निर्मिती केल्यास ३ हजार ६३० लिटर पाणी लागते. एक टन (एक हजार किलो) तांदूळापासून फक्त ४७० लिटर इथेनॉलची निर्मिती होते, त्यामुळे इथेनॉल निर्मितीसाठी तांदूळ वापरल्यास पाण्याच्या गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. 'इथेनॉल निर्मिती प्रकल्पांमधून मोठ्या प्रमाणात सांडपाणी बाहेर पडते. ते जमिनीला व जमिनीतील पाण्याला दूषित करू शकते', असे अंजल प्रकाश यांनी म्हटले आहे.

इथेनॉल ब्लेंडिंगला वाढते प्रोत्साहन भविष्यात संकटांना आमंत्रण देऊ शकते. २०३० पर्यंत दिल्ली, बंगळुरू, चेन्नईसह २१ प्रमुख शहरांमध्ये भूजल पातळी शून्य होऊ शकते, असा अंदाज नीती आयोगाच्या कम्पोझिट वॉटर मॅनेजमेंट इंडेक्स (सीडब्ल्यूएमआय) ने वर्तवला. भारताची एकूण इथेनॉल निर्मिती क्षमता १८२२ कोटी लिटर आहे. त्यातही पाण्याची समस्या गंभीर असलेल्या राज्यांमध्ये इथेनॉल निर्मितीचे प्रमाण अधिक आहे.

महाराष्ट्राची एकूण इथेनॉल निर्मिती क्षमता ३९६ कोटी लिटर आहे. परंतु, मराठवाडा व विदर्भात पिण्याच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांचे हाल होतात. उत्तर प्रदेश व कर्नाटकात इथेनॉल निर्मितीचे प्रमाण वाढल्याने भूजल पातळीत लक्षणीय घट झाल्याचे निदर्शनास आले. दरम्यान, इथेनॉल निर्मितीसाठी तांदूळाचा वापर केल्यास समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे इथेनॉल निर्मितीसाठी ऊसाला प्राधान्य दिले जाऊ शकते.

# करोडपती होण्याचे स्वप्न पाहताय?

**जर तुम्हालाही वयाच्या २५ व्या वर्षी पहिली नोकरी मिळाली असेल आणि आता तुम्ही गुंतवणूक करण्याचा विचार करत असाल, तर या वयात सर्वाधिक परतावा मिळवण्यासाठी तुम्ही कुठे गुंतवणूक करावी.**



जेव्हा आपल्याला पहिली नोकरी मिळते आणि पहिला पगार मिळतो, तेव्हा आपली सर्व स्वप्ने पूर्ण झाल्यासारखे वाटते. पण आपण नेहमी एक सर्वात महत्त्वाची गोष्ट विसरतो ती म्हणजे गुंतवणूक (घ्हनेसह). भविष्याचा विचार करता सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे गुंतवणूक आहे. अनेक लोक याचा विचार करत असले तरी, ज्ञानाच्या अभावामुळे ते गुंतवणूक करु शकत नाहीत. जर तुम्हालाही वयाच्या २५ व्या वर्षी पहिली नोकरी मिळाली असेल आणि आता तुम्ही गुंतवणूक करण्याचा विचार करत असाल, तर या वयात सर्वाधिक परतावा मिळवण्यासाठी तुम्ही कुठे गुंतवणूक करावी.

**एसआयपीमध्ये गुंतवणूक**

एसआयपी म्हणजे सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन . ही एक गुंतवणूक योजना आहे जिथे सातत्य महत्त्वाचे असते. गुंतवणूक करण्याचा हा सर्वात सोपा मार्ग आहे. ही काही जादू नसली तरी, सातत्यपूर्ण मासिक गुंतवणूक केल्याने हळूहळू फायदा होतो. कालांतराने, एसआयपी परिपक्व होते आणि त्यावर व्याज जमा होते. तुम्ही जितका जास्त काळ एसआयपी चालू ठेवाल, तितकी ती अधिक फायदेशीर ठरेल. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तुम्ही फक्त ५०० पासून सुरुवात करू शकता.

**क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणूक**

क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणूक करणे लोकांसाठी खूप गोंधळात टाकणारे आहे. हे सर्व वेळेवर अवलंबून असते. क्रिप्टोकरन्सी ही गुंतवणुकीपेक्षा एक प्रकारचा जुगारच आहे, ज्याच्या केंद्रस्थानी बाजारमूल्य असते. तुम्ही तुमच्या एकूण गुंतवणुकीपैकी फक्त एक छोटासा भाग क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवावा. ही एक प्राथमिक रणनीती नाही, उलट ती एक उच्च-जोखीम असलेली रणनीती आहे.

**शेअर बाजारात गुंतवणूक**

शेअर बाजार हे एक डिजिटल व्यासपीठ आहे जिथे सार्वजनिक कंपन्यांच्या शेअर्सची खरेदी-विक्री मागणी-पुरवठ्याच्या तत्त्वावर चालते. भारतात, एनएसई आणि बीएसई हे मुख्य मंच आहेत, जिथे गुंतवणूकदार डिमॅट आणि ट्रेडिंग खात्यांद्वारे गुंतवणूक करतात. या बाजारात गुंतवणूक करणे थोडे जोखमीचे असू शकते, कारण त्यात उच्च जोखीम असते.

**कशात गुंतवणूक करणे सुरक्षित आहे?**

कुठे आणि कशात गुंतवणूक करावी हे पूर्णपणे गुंतवणूकदारावर अवलंबून असते. तज्ञांच्या मते एसआयपा हा सर्वात सोपा आणि सर्वात कमी जोखमीचा गुंतवणुकीचा पर्याय आहे. तज्ञ असेही सुचवतात की, तुमची नोकरी २५००० रुपये पगाराची असली तरी, तुम्ही गुंतवणुकीसाठी किमान ५००० रुपये बाजूला ठेवले .

# कमाईचे आधुनिक मार्ग



नुकत्याच झालेल्या पुणे दौऱ्यात मी एका अशा शहरात होतो, ज्याची शहरी रचना पूर्णपणे बदलली होती. मी अनेक किलोमीटर पसरलेल्या मेट्रोच्या महाकाय खांबांखालून गेलो, तेव्हा त्यांची सावली खाली संथ चालणाऱ्या गाड्यांवर पडत होती. गुदमरवून टाकणाऱ्या ट्रॅफिकमध्ये मी माझ्या मित्राला विचारले, 'इथे आधी जे लोक असायची, त्यांचे काय झाले? कोल्ड ड्रिंकवाले, शहाळे विकणारे आणि फळांचे स्टॉल लावणारे- जे या खांबांच्या आधी इथे उभे असायचे?'

मित्राने उत्तर दिले की, 'एखाद्या शहराच्या विकासासाठी जुन्या गोष्टींना बाजूला व्हावेच लागते.' पूर्णपणे आर्थिक दृष्टिकोनातून पाहिले तर त्याचे म्हणणे बरोबर होते. पुणे महानगरपालिकेला कमाईचा एक फायदेशीर आणि नवीन मार्ग सापडला आहे. या खांबांवरील जाहिरातींमधून पालिकेने दोन वर्षांत ३.४ कोटी रुपयांहून अधिक कमाई केली आहे. ऑक्टोबर २०२४ ते मार्च २०२६ दरम्यान ही कमाई सातत्याने वाढली. जसजसा मेट्रोचा विस्तार होईल, तसतशी ही कमाई आणखी वाढण्याची अपेक्षा आहे. तरीही, जेव्हा महानगरपालिका दरवर्षी शुल्क वाढवत आहे, तेव्हा या 'प्रगती'ची खरी किंमत काय आहे, असा विचार केल्याशिवाय राहवत नाही.

हा बदल मला नागपूरची आठवण करून देतो. ५० वर्षांपूर्वी पुणे आणि नागपूर सायकलींसाठी ओळखले जायचे. आज सायकली खूप कमी दिसतात. अनेक वर्षांनंतर जेव्हा मी नागपूरच्या सीताबर्डीला परतलो, तेव्हा मी लगेच त्या पंक्चर काढणाऱ्याला शोधले, जो कधीकाळी एका कोपऱ्यात बसायचा. माझ्यासोबत असलेल्या व्यक्तीला तो कुठे गेला हे माहीत नव्हते. तो म्हणाला की, आता हा व्यवसाय चालवण्यासाठी सायकलीच फार कमी उरल्या आहेत. मी जुन्या पिठाच्या गिरण्या आणि त्या पत्र्याच्या कारागिरांबद्दल विचारले, जे तेलाच्या डब्यांना किचनच्या डब्यांमध्ये बदलायचे. पण उत्तर तेच होते की, 'आता स्वतः धान्य कोण दळतं?' किंवा 'साठवणुकीच्या पद्धती तर खूप आधीच बदलल्या आहेत.'

मनात जिद्द धरून मी दोन दिवस शोध घेतला आणि शेवटी त्या जुन्या पंक्चर काढणाऱ्या माणसाला शोधून काढले. तो आपल्या कुटुंबासह एका छोट्या झोपडीत राहत होता. शालेय जीवनात माझी सायकल अगदी कमी खर्चात दुरुस्त ठेवल्याबद्दल मी त्याचे आभार मानले. त्या वेळच्या अनेक मोफत दुरुस्त्यांच्या बदल्यात जेव्हा मी काही पैसे त्याच्या खिशात ठेवले, तेव्हा त्याला रडू कोसळले. गल्लीतून परतताना मला जाणवले की, तिथे कधीकाळी जी वर्दळ असायची, ती आता गायब झाली आहे. जर तुम्ही तुमच्या शाळेबाहेर काही नाण्यांमध्ये मीठ लावलेली उकडलेली 'बोरे' देणाऱ्या आजींना भेटला नसाल, तर एकदा त्यांना नक्की शोधा. त्यांना भेटा. त्यांना नाही, तर तुम्हालाच जास्त चांगले वाटेल.

हीच कमतरता मला या वीकेंडला मुंबईत जाणवली. माझ्या गल्लीच्या टोकाला स्नॅक्स आणि फुले विकणारी 'गजरावाली' महिला गायब होती. मला सांगण्यात आले की स्वयंपाकाच्या गॅसच्या वाढत्या किमतींमुळे तिला काम बंद करावे लागले. याच रस्त्यावर दररोज सकाळी एक दूधवाला गेली पंचवीस वर्षे बसतो. संप, पूर किंवा वादळातही तो तिथून कधी एक इंचही हलला नाही. कधीतरी जेव्हा तो येत नसे, तेव्हा केवळ त्याचे ग्राहकच नाही, तर तिथून जाणारा प्रत्येक वाटसरू विचारायचा की, 'आज दूधवाल्याला काय झाले?'

ज्या गोष्टी आपले लक्ष वेधून घेतात, त्या कधीही तात्पुरत्या जाहिराती किंवा नवीन पायाभूत सुविधा नसतात. ती त्या लहान व्यवसायांची अनुपस्थिती असते, ज्यांनी आपल्याला मोठे होताना पाहिले. ही माणसे केवळ दुकानदार नाहीत, तर ते ओळखीचे चेहरे आहेत, जे शहराचा आर्थिक-सामाजिक वेग कायम ठेवतात.

# ४५ दशलक्ष लोक उपासमारीच्या उंबरठ्यावर

जगभरातील अंदाजे ४५ दशलक्ष लोक उपासमारीच्या उंबरठ्यावर ढकलले जाऊ शकतात असा गंभीर इशारा जागतिक बँकेने दिला आहे.

जग एका संकटातून सावरत नाही तोच दुसरे संकट उभे राहत आहे. इराणच्या सभोवतालच्या वाढत्या युद्धतणावाने आता संपूर्ण जगासाठी एक संकट निर्माण केले आहे. जागतिक बँकेने एक गंभीर इशारा दिला आहे की, या तणावामुळे जगभरातील अंदाजे ४५ दशलक्ष लोक उपासमारीच्या उंबरठ्यावर ढकलले जाऊ शकतात.

जागतिक बँकेच्या 'अन्न संकट सूचना' अहवालानुसार, जर इराणमधील आणि त्याच्या आसपासची युद्धाची परिस्थिती आणखी बिघडली, तर जागतिक पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत होईल. इराणजवळ असलेली होर्मुझची सामुद्रधुनी ही जगातील सर्वात व्यस्त सागरी मार्गांपैकी एक आहे. केवळ तेलच नव्हे, तर धान्य आणि खतांचाही एक मोठा हिस्सा यातून जातो. जर या मार्गावर परिणाम झाला, तर अन्नधान्याच्या किमती गगनाला भिडतील.

**कोणत्या देशांवर सर्वात गंभीर परिणाम होणार?**

अहवालातील तज्ज्ञांनी म्हटले की, सर्वात वाईट परिणाम गरीब आणि विकसनशील देशांवर होतील, जे आधीच महागाई आणि हवामान बदलामुळे त्रस्त आहेत. अन्नटंचाई आणि वाढत्या किमतींमुळे कुपोषण आणि सामाजिक अस्थिरता वाढण्याचा धोका आहे. जागतिक बँकेने स्पष्ट केले आहे की, जर युद्ध दीर्घकाळ चालले, तर जागतिक अन्नसुरक्षा अनेक दशकांनी मागे पडेल. जागतिक बँकेने विशेषतः 'ऊर्जा-अन्न संबंधा'बद्दल इशारा दिला आहे. अहवालात म्हटले आहे की, इराण युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यास, त्याचा थेट परिणाम शेतीच्या खर्चावर होईल. खते तयार करण्यासाठी नैसर्गिक वायूची गरज असते आणि पिकांची कापणी व वाहतुकीसाठी डिझेलची आवश्यकता असते. जेव्हा ऊर्जा महाग होते, तेव्हा शेतकऱ्यांना शेती करणे कठीण होते, ज्यामुळे जागतिक धान्य उत्पादनात घट होऊ शकते.



**तेलाच्या वाढत्या किमतींमुळे शेती आणि वाहतुकीचा खर्च वाढतो**

जागतिक बँक याकडे केवळ एक प्रादेशिक तणाव म्हणून नव्हे, तर एक 'जागतिक वस्तू-दरवाढीचा धक्का' म्हणून पाहते, जो विकसित आणि विकसनशील दोन्ही अर्थव्यवस्थांना हादरवून टाकू शकतो. युद्धे केवळ सीमांवरच लढली जात नाहीत; त्याचे पडसाद सामान्य माणसाच्या स्वयंपाकघरापर्यंत पोहोचतात. तेलाच्या वाढत्या किमतींमुळे शेती आणि वाहतुकीचा खर्च वाढतो, ज्यामुळे सर्व काही महाग होते.